यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला - १९८९

'महात्मा फुले सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ'

प्रा. बा. ह. कल्याणकर
औरंगाबाद

नगरपालिका नगरवाचनालय, कराड

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

923.60954
NAG
G04282

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04282
DATE: 8/6/2015

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष १७ वे १९८९

Y.C.P
923.60954/NAG
G04282
LIBRARY

किंमत साडेबारा रुपये

□

प्रकाशन –

डॉ. राम जोशी, मुंबई

यांच्या शुभहस्ते

दि. १३ मार्च १९९०

□

प्रकाशन स्थळ –

यशवंतराव चव्हाण स्मृती सदन

कराड नगरपालिका, कराड

□

प्रकाशक

श्री. पांडुरंग दादासाहेब पाटील

अध्यक्ष.

कराड नगरपालिका, कराड ४१५ ११०

□

मुद्रक –

श्री. गजानन रामचंद्र गिजरे

४०४/४०५ गुरुवार पेठ, कराड.

फोन नं. २१५६

□

मुद्रण स्थळ –

लोकमान्य मुद्रणालय

४०४/४०५ गुरुवार पेठ, कराड ४१५ ११०

जि. सातारा

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.

ग्रंथविश्वात रमणारे यशवंतराव

मनोगत

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत सन १९८९ मधील साहेबांच्या जयंतीदिनी महाराष्ट्राच्या तरुण पिढीतील, सामाजिक परिवर्तनाच्या आणि प्रबोधनाच्या चळवळीवर भक्कम असा विश्वास असलेले तसेच महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांची मोठी छाप असलेले एक व्यासंगी विचारवंत प्रा. बा. ह. कल्याणकर, औरंगाबाद, यांनी 'महात्मा फुले सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ' या विषयावर दोन प्रभावी व्याख्याने दिली आणि त्या विषयासंबंधीचे आपले सुस्पष्ट, परखड विचार कराडकरांना ऐकविले. त्याबद्दल आम्ही प्रा. कल्याणकर यांचे आभारी आहोत.

आदरणीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी चालविलेले समाज प्रबोधनाचे व परिवर्तनाचे कार्य सतत तेवत रहावे या जाणिवेने १९७३ साली 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' सुरु करण्यांत आली. पुढे काही सज्जनांच्या सूचनेवरून व्याख्यानमालेतील अभ्यासपूर्ण व्याख्याने पुस्तकरूपाने प्रकाशित होऊ लागली. ही व्याख्यानमाला याही पुढे अधिक जोराने सुरू ठेवण्याचा आणि त्यांतील निवडक व्याख्याने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करीत राहण्याचा मनोदय आहे.

१९९० हे जोतिराव फुले यांच्या पुण्यतिथी शताब्दीचे वर्ष असून याच वेळी प्रा. कल्याणकर यांचे 'महात्मा फुले सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ' या विषयावरील व्याख्यानांचे हे

पुस्तक प्रकाशित होत आहे, हा एक योगायोगच म्हणावा लागेल. हे पुस्तक लोकमान्य मुद्रणालयाचे संचालक श्री. गजानन गिजरे आणि त्यांचे कुशल व मेहनती कामगार यांनी वेळेवर तसेच सुबकपणे छापून दिले याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेच्या निमित्ताने जयंतीदिनी त्यांच्यासंबंधी ' उदंड आयुरारोग्य लाभो ' अशी करुणा भाकावयाची ते सर्वांचे प्रिय यशवंतरावजी आज आपल्यात नाहीत, सर्वसामान्याविषयी अखंड आत्मियता बाळगणारा सर्वगुणसंपन्न नेता कृष्णाकाठी कायमचा विसावला ! त्यांच्याच पवित्र स्मृतीला हे पुष्प सादर समर्पण! !

कराड **पी. डी. पाटील**

१२ मार्च १९९० नगराध्यक्ष

' अंतरंग '

दि. १२ मार्च १९८९ (व्याख्यान पहिले)

दि. १३ मार्च १९८९ (व्याख्यान दुसरे)

विषय : महात्मा फुले सामाजिक विचार
आणि आजचे सामाजिक संदर्भ

मा. प्रा. बा. ह. कल्याणकर
औरंगाबाद

'महात्मा फुले सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ'

प्रा. बा. ह. कल्याणकर
औरंगाबाद

महात्मा जोतिराव फुले महाराष्ट्राच्या क्रांतीविचाराचं भारतीय विद्यापीठ आहे. चार्वाक, बुद्ध, तुकाराम यांच्या निर्भय, मानवतावादी विचारांच्या वटवृक्षाला आलेलं मधुर फळ म्हणजे जोतिराव फुले आणि त्यांची सत्यशोधक चळवळ होय. जोतिराव फुले यांनी जाती संस्थेविरुद्ध बंड पुकारले. कोणताही धर्म ईश्वरप्रणीत नाही आणि कोणताही धर्मग्रंथ देवनिर्मित नाही. असे ठणकावून सांगून जोतिराव फुले यांनी ईश्वरशाहीला हादरा दिला. भौतिकवाद्यांना आणि समाजवाद्यांना भिडावेत आणि जुळावेत असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानात सामाजिक नीतिमत्तेवर मुख्य भर आहे. जणू नीति हाच त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्राण आहे. धर्माच्या नावावर चालत आलेल्या पोटार्थी रूढींची नीतिशी झालेली फारकत पाहून त्यांनी हिंदूधर्मावर अक्षरशः कोरडे ओढले. अनीतिमान ब्राह्मणांवर त्यांनी जितक्या कठोरपणाने कोरडे ओढले तितक्याच कणखरपणे अनीतिमान ब्राह्मणेतरांवर घांव घातले.

सार्वजनिक 'सत्यधर्म' हे त्यांचे पुस्तक हा निव्वळ ग्रंथ नसून तो मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे. धार्मिक व सामाजिक सहिष्णूता, सामाजिक समता आणि समानता, व्यक्तिस्वातंत्र्य व मानवी प्रतिष्ठा या त्या जाहीरनाम्यातील मूलाधार प्रेरणा आहेत. माणूस हाच सामाजिक मुल्याची मापकाठी आहे. समाज क्रांतीचा आधारही माणूसच आहे.

'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहुन जोतिरावांनी जुन्या समाज रचनेवर आणि कालबाह्य अवतार कल्पनेवर, दांभिक जुनाट मुल्यांवर त्यांनी घणाघाती हल्ला केला व सत्यशोधक चळवळीचा पाया घातला. बुद्धीप्रामाण्य, सामाजिक समता, मानवता, सामाजिक नीतिमत्ता, वैज्ञानिक चिकित्सतेचा आग्रह, ब्राह्मण-धर्माला सुरूंग इत्यादी बाबी जोतिराव फुल्यांनी उभ्या केलेल्या चळवळीचे वैशिष्ट्य होय.

पुढील वर्षी जोतिराव फुले यांची पुण्यतिथी शताब्दी आहे आणि १९९१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीशताब्दी आहे. या पार्श्वभूमीवर या दोघांचे विचार, जो मूलभूत मानवी हक्कांचा विचार आहे, शाश्वत, नैतिक सत्यावर एक सुंदर समाज निर्माण करणारे विचार आहेत. ते सत्य मानवी जीवनाचे नैतिक सत्य मानून त्यांच्या विचारांना कृतीत उतरण्यासाठी त्यांच्या विचारांचं आकलन करून घेणे गरजेचे आहे.

पत्ता :
प्रा. बा. ह. कल्याणकर
१३ 'शिवनेरी' सेक्टर एफ. एन्- ५
श्रीनगर, सिडको
औरंगाबाद - ४३१००३

प्रा. बा. ह. कल्याणकर

गरीब शेतकरी कुटुंबात जन्म, शिक्षण एम्. ए. (राज्यशास्त्र) मराठवाडा विद्यापीठात या विषयात सर्वप्रथम.

सामाजिक परिवर्तनाच्या व प्रबोधनाच्या चळवळीवर भक्कम असा विश्वास, मराठवाड्यातील एक तरुण विचारवंत म्हणून सर्व-परिचित.

मराठवाडा विकास आंदोलनात, आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या चळवळीचे नेतृत्व. मराठवाडा कृषी विद्यापीठ स्थापनेसाठी झालेल्या चळवळीचे नेतृत्व. कल्याणकर यांचे विचार आणि व्यक्तिमत्व चळवळीतच वाढलेले आहे. त्यामुळे त्यांच्या सर्व विचारात धार व गतिमानता दिसून येते.

ग्रंथसंपदा -

' उठाव ', ' जागल ', ' माळझरे ', ' तांबडं फुटलं ', ' शिलालेख ' हे कवितासंग्रह. ' जागल ' या काव्यसंग्रहास सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार. ' सूर्यपंख ' ' दिशा आणि दृष्टी ' ही वैचारिक निबंधाची पुस्तके. ' अराजक ' व ' कंदील ' या दोन कादंबऱ्या. तसेच ' युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण ' हा संपादित ग्रंथ.

- महाराष्ट्र शासन उत्कृष्ट वाङमय पुरस्कार.
- पत्रपंडित पां. वा. गाडगीळ हा पत्रकारिता पुरस्कार (महाराष्ट्रात प्रथम १९८८-८९)
- सोव्हियत लँड नेहरू पुरस्कार - १९८८.
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचे सभासद.
- महाराष्ट्र राज्य मराठी रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षक मंडळाचे सभासद.
- महाराष्ट्र राज्य एस्. एस्. सी. व एच्. एस्. सी. मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य.
- मराठी साहित्य सभेचे अध्यक्ष.

- मराठवाडा विद्यापीठ संचालित महात्मा फुले प्रतिष्ठानचे सदस्य.
- मराठवाडा विभागीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.
- समाज विज्ञान प्रबोधिनीचे संचालक.
- ' युगकर्ता ' नियतकालिकाचे संपादक.
- देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्राध्यापक म्हणून काम पाहतात.



'महात्मा फुले सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ'

प्रा. बा. ह. कल्याणकर
औरंगाबाद

१२ मार्च १९८९

प्रारंभी मी स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या पावन स्मृतीला अभिवादन करतो. कराड नगरपालिकेचे अध्यक्ष आदरणीय श्री. पी. डी. पाटील, यशवंतरावजी चव्हाण यांचे सहकारी आणि आमचे काका श्री. संभाजीराव थोरात. ज्यांचा आज आपण ' यशवंतराव चव्हाण पुरस्कार ' देऊन गौरव केला ते माझे मित्र प्रा. केशव मेश्राम, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आमचे स्नेही श्री. शांताराम पुरोहित, प्रा. गो. मा. पवार सर, या मंडळाचे सचिव श्री. विद्याधर गोखले, कराड शहरातील पुजाण, जाणत्या रसिक बंधू आणि भगिनींनो !

खरं म्हणजे पी. डी. पाटील साहेबांना मला या पूर्वीच भेटायचं होतं. कारण गेल्या सतरा वर्षांपासून अव्याहतपणे यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला नगर-पालिकेच्या वतीने त्यांनी चालू ठेवलेली आहे. नगरपालिकेचे काम शहराचे रस्ते स्वच्छ ठेवणं, सांडपाण्याची व्यवस्था करणं, लोकांच्या नागरी सुविधा यांची पूर्तता करणं इतकंच मर्यादित न मानता, लोकांची मनं, बुद्धी, भावना, कल्पना स्वच्छ करण्याचं काम, येथे ही यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या सुसंस्कृत नेत्याच्या नांवाने त्यानी जे चालू ठेवलेलं आहे. त्याबद्दल मी महाराष्ट्रातल्या सर्व विचार-वंतांच्या व साहित्यिकांच्यावतीने त्यांचे अभिनंदन करतो. त्याच बरोबर ज्यांनी १९४८ साली कविता लिहिली त्या वेळेला माझा जन्म झालेला होता त्यांचा सत्कार

व पुरस्कार माझ्या हस्ते देऊन (वितरण करून) माझा जो आपण सन्मान केलेला आहे आणि त्याचा भाग म्हणून माझे मित्र प्रा. केशव मेश्राम यांचे महाराष्ट्रातल्या सबंध साहित्यिकांचेवतीने मी अभिनंदन करतो.

आमचे मित्र श्री. विठ्ठलराव पाटील, नगरपालिकेच्या ग्रंथालयाचे फार सुजाण असे मुख्य ग्रंथपाल त्यांनी मला एक वर्षापूर्वीच कळविलं होतं की, तुम्ही यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत आलं पाहिजे. मध्यंतरी शारदीय व्याख्यानमालेत आलो, शिवाजीमहाराजांचे संबंधी विचार मी मांडले होते. त्यावेळीसुद्धा त्यांनी सांगितलं होतं. त्यावेळी श्री. पी. डी. पाटील साहेबांना भेटायची इच्छा होती. पण ते त्यावेळी कामाचे गडबडीत होते त्यामुळे भेट होऊ शकली नाही.

यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने आपण ही व्याख्यानमाला चालू ठेवलेली आहे. आणि कराड पुरस्कारचं नांवही आपण 'यशवंत पुरस्कार' केलेलं आहे. आणि आपली सामान्य स्तरातील, खालच्या तळातील माणूस केवळ स्वतःच्या कष्टावर, स्वतःच्या बौद्धिक पराक्रमावर एक उत्कृष्ट साहित्यिक होऊ शकतो अशा प्रा. केशव मेश्राम यांचा आपण इथं सत्कार केलेला आहे, गौरव केलेला आहे. यशवंतरावजी साहित्यिक होते, विचारवंत होते, राजकारणी होते, मुत्सद्दी होते, आधुनिक महाराष्ट्राचा पाया रचणारे ते शिल्पकार होते. त्यांच्या नावाने हा जो पुरस्कार त्यांना दिला तो पुरस्कार मिळवून त्यांनी फार मोठं काम केलेलं आहे. त्यांच्यावरची आता जबाबदारी वाढलेली आहे. हा पुरस्कार आपल्या समोर त्यांना देण्यात आला हे जोतिराव फुल्यांच्या विचारांनी आणि यशवंतरावांच्या डोळ्यांनी आपण हे पाहायला पाहिजे. त्यांनी किती मोठं काम केलेलं आहे.

यशवंतराव चव्हाण ही व्याख्यानमाला मी गेल्या ६-७ वर्षापासून तिच्यासंबंधी वाचतोय, ऐकतोय. ही व्याख्यानमाला केवळ व्याख्याने घडवून आणत नाही तर या व्याख्यानमालेच्या व्यासपीठावर जे विचार मांडले जातात त्या विचारांचे संकलन करून एक पुस्तक सुद्धा आपण काढता आहात आणि या व्याख्यानमालेत जे सहभागी असे श्रोते होऊ शकले नाहीत. जे आमच्या सारखे सर्वदूर असलेल्या रसिकांच्या हातात ते पुस्तक आपण देत आहात. पाटील साहेब आपण हे फार मोठं चांगलं काम करता आहात. प्रबोधनाचं हे काम आहे. तुमचं राजकारण तुमच्या राजकारणाच्या अंगानं चालत राहील, पण राजकारणाच्या धकाधकीत राहूनसुद्धा तुम्ही ही जी समाजाची विवेकबुद्धी वाढविण्याचे काम करता आहात ते मला फार मोलाचं वाटतं आणि ते तुम्ही यशवंतराव चव्हाणांच्या नांवानं करता ते फार मोलाचं आहे. यशवंतरावजी आज आपल्यात नाहीत, पण त्यांचा वैचारिक वारसा, त्यांचे अनेक विषयावरचे चौफेर विचार यशवंतरावांचा प्रत्येक प्रश्नासंबंधीचा स्वतःचा विचार होता. तळातल्या माणसांच्या प्रश्नांची त्याना समज होती. त्यांची स्वतःची त्या

प्रश्नाकडे बघण्याची दृष्टि होती. माझं दुर्दैव असं आहे की मी त्यांच्या सहवासांत फार उशीरा आलो तो वयाचाही भाग आहे. पण यशवंतराव गेल्यानंतर आज आम्हाला असं वाटतं की ज्यांच्याकडे अपेक्षेने बघावे, आशेने बघावे, वडीलकीच्या आधाराने बघावं असा माणूस महाराष्ट्रात दिसत नाही. आता वसंतरावदादाही गेलेले आहेत.

मी सातारा जिल्ह्याकडे जेव्हा पाहतो तेव्हा हा जिल्हा कर्तृत्वशाली माणसांची एक मोठी खाणच वाटतो, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नांव माझ्यासमोर येतं. आण्णाभाऊ साठे, कर्मवीर भाऊराव पाटील या जिल्ह्यामधले, जोतिराव फुले या जिल्ह्यामधले, सावित्रीबाई फुले यांचे माहेर या जिल्ह्यामधले, वसंतदादा पाटील जुन्या सातारा जिल्ह्यातले, बाळासाहेब देसाई या जिल्ह्यातले, यशवंतराव चव्हाण या जिल्ह्यातले. किती मोठी, आणखीन नांवे विसरली असतील. अशी एक मालिकाच आहे . महाराष्ट्राचा ' रोल ऑफ ऑनर ' या जिल्ह्याने दिलेला आहे. आणि म्हणून या जिल्ह्यातलं जे कर्तृत्व आहे, वक्तृत्व आहे, कला-साहित्य-संगीत जे सगळं हे या जिल्ह्यानं महाराष्ट्राला दिलंय. आणि त्या रसिक माणसांच्या समोर तुमच्या सारख्या जाणत्या मंडळीसमोर एक माझ्यासारखा तरुण माणूस या विषयाकडे जो पाहतो आहे स्वतःच्या कुवतीने, स्वतःच्या विचाराने पाहातो. यासाठी पाहतोय की या चळवळीमुळं मी तुमच्यासमोर इथं उभा आहे.

जोतिराव फुले नसते तर आंबेडकरांचा विचार फार जोरात पुढे आला असता की नाही मला ठाऊक नाही, जोतिराव फुल्यांना डॉ. आंबेडकरांनी आपला गुरु मानलेलं आहे. जोतिराव फुले डॉ. आंबेडकर यांचा सबंध विचार उचलून धरला कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराजांनी आणि राजदंड हा केवळ भूषण नाही तर ते सेवेचे साधन आहे, तो केवळ मानदंड नाही, लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारे एक प्रभावी हत्यार आहे. म्हणून हा लोकांचा राजा राजवाड्या-तून महारवाड्यात गेला, मांगवाड्यात गेला, झोपड्यात गेला, त्यांच्या सोबत कांदाभाकर खात होता. मग ही चळवळ अशी पुढे पुढे येत कर्मवीर भाऊराव पाटील पुढे येतात. कर्मवीर भाऊराव पाटील सबंध महाराष्ट्राला सांगतात की नांगर आणि लेखणीचा संबंध मला जोडायचा आहे. नांगराच्या सोबत मला लेखणी आणायची आहे. जो पर्यंत नांगर हाकणाऱ्या माणसाकडे आम्ही कोणत्या भूमिकेने पाहात होतो, दोन बैलं आणि त्याच्या पाठीमागे नांगर हांकणारा तिसरा बैल म्हणून. निरक्षर अडाणी, अनपढ असा माणूस म्हणून. आमच्या डायनिंग टेबला-वरल्या स्टेनलेसस्टीलच्या ताटामध्ये जी गरमगरम पोळी येवून पडते, जे तूप येवून पडते, त्या त्या अन्नाला तो निर्माण करतो. त्या निर्माण होणाऱ्या अन्नाला त्याच्या घामाचा वास असतो. हे आम्हाला कळायला सुद्धा साहित्यच वाचावं लागतं. विचारच ऐकावे लागतात. म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सांगीतल की

माझ्या दाढीच्या केसात जेवढे केस आहेत तेवढे मी ग्रॅज्युएट उभे करीन महाराष्ट्रात. महाराष्ट्राच्या काळ्याशार शेतामध्ये नांगराच्या पाठीमागे मी एक पदवीधर उभा करेन. मुलांना ते सांगू लागले मुलांनो " स्वावलंबनातूनच उद्धार आणि तेच शिक्षण असते " गिट्टी फोडा हाच तुमचा उद्याचा डॉलर आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, सयाजीराव महाराज पुढे येतात. पंजाबराव देशमुख पुढे येतात. आणि सबंध महाराष्ट्र असा ढवळून निघतो.

महाराष्ट्र भारतीय जनतेचं क्रांतीपीठ आहे. चार्वाक आणि बुद्धानंतर म. जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजातल्या तळातल्या माणसांचा विचार मांडला. समाज जीवनात अतिशय शोषित सामाजिक स्तरामधून क्रांती निर्माण केली. कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांनी राजवस्त्र हे शोभेसाठी नसून गोरगरीब जनतेच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचं साधन आहे. या जाणीवेनं आपल्या कोल्हापूर संस्थानात सामाजिक आणि आर्थिक क्रांतीची बीजे पेरली. शाहू महाराजांचा गौरव करतांना एक शाहीर म्हणतो -

" दीनांचा पालनवाला । तो शाहू नृपती गेला ।।
बुद्धासम् उदार नेता । जनकासम सूतत्ववेत्ता ।।
शिवछत्रपती सम कुशल राज्य कार्याला ।
तो शाहू नृपती गेला ।।१।। "
धाडसात नेपोलियन । शक्ती भीम की जाण ।।
गुणीजनांस भोजासम् जो राजा झाला ।
तो शाहू नृपती गेला ।।२।।

या शब्दात शाहू महाराजांचा गौरव शाहीराने केला आहे. महाराष्ट्रामध्ये सामाजिक क्रांतीच्या चळवळीचा असा गजर झाला. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या सामाजिक क्रांतीच्या चळवळी सुरू झाल्या त्या चळवळीचे अग्रणी म्हणून म. जोतिराव फुले, लोकहितवादी देशमुख, गोपाळ गणेश आगरकर हें या नवजीवनवादी चळवळीचे अग्रणी होते. या सामाजिक क्रांतीकारकांच्या चळवळीनी अख्खे एकोणिसावे शतक हादरत होते. म. जोतिराव फुले, शेतकरी कामगार, दलित आणि स्त्रीया यांचे कृतिशील कैवारी होते, रयतेचे ते क्रांतीकारी तत्त्वज्ञ होते. शुद्रादी शुद्रांना आणि स्त्रीयांना ज्ञानाचे दरवाजे खुले करणारी चळवळ त्यांनी सुरू केली. भारतातील शूद्र आणि अतिशूद्र आणि स्त्रीयांच्या शिक्षणाचे ज्ञानपीठ म्हणजे म. जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले हें होत.

म. जोतिराव फुले यांनी धर्म, संस्कृती आणि इतिहास यांचे टीकात्मक आकलन करून घेऊन हिंदुधर्मातील चातुर्वण्य, अस्पृश्यता, जन्मजात वर्चस्व आणि गुलामगिरी अशी जीवनरचना या विरुद्ध प्रखर हल्ला केला. स्त्रीदास्य त्यांना दिली

जाणारी पशुतुल्य वागणूक या विरुद्ध त्यांनी क्रांतीकारी आंदोलन सुरू केले. त्यांच्या विचारांत नवी मानवतावादी ध्येय्ये होती. माणूस हा माणसांचा मापदंड हा माणूसच असला पाहिजे हा त्यांचा विचार होता. बहुजन समाजाची दुःस्थिती आणि त्यातून बाहेर पडण्याचे उपाय या संबंधी त्यांचा विचार शास्त्रीय होता. सामान्य माणसाविषयी अपार तळमळ हे जोतिराव फुले यांच्या विचारांचं मुख्य सूत्र होतं. जोतिराव फुले यांचा विचार सर्व मानवव्यापी होता. मानवजातीतील सर्व वास्तव विचार हा त्यांचा सत्यधर्म होता. गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, इशारा, छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, सत्यशोधक समाजोक्त पूजाविधी, ब्राह्मणी कसब, शेतक-याचा आसूड, सत्सार, हंटर शिक्षण आयोगासमोर सादर केलेले निवेदन, अखंडादी काव्य रचना इत्यादि ग्रंथांची निर्मिती करून भारतातील परंपरागत समाज संस्थांच्या विरुद्ध बंड पुकारणारे जोतिराव फुले हे पहिले भारतीय होत.

जोतिराव फुले यांचा विचार हा मानवी स्वातंत्र्याकडे, नवमानवतावादाकडे आणि सामाजिक समतेच्या निर्मितीकडे समाज उभा करणारा होता. जोतिराव फुल्यांचा सार्वजनिक सत्यधर्म म्हणजे ईश्वरव्यापी मानवतावादाचा जाहीरनामा आहे. भारतीय समाजवादी लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे आग्रहाने मांडणारा तो जाहीरनामा आहे.

जोतिराव फुले यांच्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी सबंध महाराष्ट्रामध्ये सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे नेतृत्व केलं. त्यांचे कार्य पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शाहू महाराजांना भारतातील सामाजिक आणि आर्थिक क्रांतीचे आधारस्तंभ असे म्हटलेले आहे.

" अजून देशातल्या सगळ्या रयतेला कोंड्याची भाकरी मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही. असं सांगणारा हा राजा लोकांना सुखी करून मी स्वतःहून पेन्शन घेईन असा ठणकावणारा राजा आज कुठे दिसत नाही. उपाशी लोकांना कोंड्याच्या भाकरीची सोय करण्याअगोदर या दहांच्या पोळीवर साजूक तूप वाढा असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कळकळ कितपत आहे हे उघड आहे " असे सांगणारे शाहू महाराज भारतीय लोकशाही येण्याच्या कितीतरी वर्षे अगोदर ठणकावून सांगत होते. " राजवैभव थोर असो, पण मी रयतेशी वचनबद्ध आहे. ती वचनबद्धता त्या वैभवाहूनही थोर आहे " हे राजर्षी शाहू महाराजांच्या विचारातलं मुख्य सूत्र होय. भारतात पांचशेच्यावर राजेलोक होते. पण लोकांचा राजा म्हणून शाहूमहाराजांचाच उल्लेख करावा लागतो. " ज्या सनदा मी महार-मांग-चांभार इत्यादि लोकांना दिल्या. त्याच जर ब्राह्मण, कायस्थ, सारस्वत अशा लोकांना दिल्या असत्या तर काहीच गवगवा झाला नसता व तशा दिल्या तेव्हा झालाही

नाही. मॅट्रिक पास झालेले व इंग्रजी चांगले शिकलेले महार-मांग यास वरिष्ठ दर्जाच्या धंद्यात आणताच ब्राह्मणी समाज खवळून गेला " असं प्रतिपादन शाहू महाराजांनी नागपूर येथे भरलेल्या बहिष्कृत समाजाच्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलतांना केले होते.

अस्पृश्यता निवारण, मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वसतीगृहांची व्यवस्था, गंगाराम कांबळे या अस्पृश्य व्यक्तिला काढून दिलेले हॉटेल, धरणे बांधून हरितक्रांतीचा केलेला आरंभ, राज्यकारभारात कामगारांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून रशियन राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमिवर कामगार संघटना काढण्यासाठी कामगारांना त्यांनी दिलेली प्रेरणा, दत्तोबा पोवार या पहिल्या अस्पृश्य व्यक्तीस कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्षपद, ज्ञानोबा घोलप या अस्पृश्य समाजातील व्यक्तीस मुंबई असेंब्लीत प्रतिनिधित्व, मल्ल विद्येला दिलेले उत्तेजन, चित्र-संगीत-ललितकलांना आणि कलावंताना दिलेला आश्रय, रंगभूमिच्या विकासासाठी केलेले प्रयत्न ही सर्व कार्ये पाहाता राजर्षी शाहू महाराज समग्रक्रांतीचे पुरस्कर्ते होते.

राजर्षी शाहू महाराजानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीच्या चळवळीला अधिक मूलगामी सर्वव्यापी अन् खोलवर रुजविण्याचा प्रयत्न केला. दलितांच्या मुक्तीचा खरा मार्ग त्यांनी दाखविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजात आत्मतेज, आत्मविश्वास आणि स्वाभिमान व माणुसकीचे नवचैतत्य निर्माण केले.

बुद्धकालापासून तो फुले पूर्वकालापर्यंत शूद्र-अतिशूद्र, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्या अमानुष गुलामगिरी बद्दल बंड करणारे कोणी थोर पुरुष झालेच नव्हते. बुद्धाने जाती संस्थेला पहिला हादरा दिला होता. ब्राह्मणांनी बुद्धी प्रामाण्यवाद गाडून वेद प्रामाण्यवाद केवळ आपल्या पोटाचे साधन म्हणून निर्माण केला होता. संतांनी सुद्धा आध्यात्मिक लोकशाही निर्माण करण्यापुरतीच हालचाल केली होती. इतर माणसाप्रमाणेच माणूस असलेला ब्राह्मण श्रेष्ठ कां ईश्वरभक्त श्रेष्ठ असा जो लढा होता. ब्राम्हण श्रेष्ठ की शूद्र माणूस श्रेष्ठ हा प्रश्न मुळातून सोडविण्याच्या भरीस साधुसंत पडले नव्हते. ब्राह्मण आणि ईश्वरभक्तांच्या लढ्यात साधूसंतांचा जय जरूर झाला. आणि भक्ताचे श्रेष्ठत्व ब्राह्मणाला मान्य करावे लागले. रामदासा सारख्या संतांनी देखिल ब्राह्मण धर्म, वर्णवर्चस्व आणि ब्राम्हण जातीची महती गाण्यातच आपली सारी हयात घालविली.

" गुरु तो सकळांसी ब्राह्मण । जरी तो झाला क्रियाहीन ।।
तरी तयासीच शरण । अनन्यभावे असावे ।।
ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोची भगवंत ।।

पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्ये करूनी ॥
असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथे मानव बापुडे किती ॥
जरी ब्राह्मण मूढमति । तरी तो जगद्वंद्य ॥
अंत्येज शद्वज्ञाता बरवा । परी तो नेऊन काय करावा ॥
ब्राह्मणासन्निध पुजावा । हे तो न घडे की ॥ "

ज्ञानेश्वर स्वतःला जातिभेद न मानणाऱ्या नाथपंथाचे अनुयायी होते. त्यांनी आध्यात्मिक लोकशाहीच्या बाजूने प्रस्थापिताविरुद्ध बंड केले आणि शंकराचार्या-प्रमाणेच वर्णाश्रमधर्म सावरून धरला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्राह्मणेतरांच्या अवनतीचे कारण सत्ता व ज्ञान यांच्या अभावात आहे. असे त्यांना फुल्यांच्या प्रमाणेच जाणविले. हिंदुस्थान हा देश म्हणजे केवळ सामाजिक आर्थिक विषमतेचे माहेरघर आहे. आणि हिंदू समाज हा एक मनोरा असून एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला आहे. पण या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाहीं. एका ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.

> " भारत स्वतंत्र होण्याने सर्व कार्यभाग साधेल असे नाही. भारत हे असे राष्ट्र बनले पाहिजे की, ज्यात प्रत्येक नागरिकाला धार्मिक, आर्थिक आणि राजकीय हक्क सारखे असून व्यक्ति विकासाला प्रत्येक नागरिकाला वाव मिळेल. इंग्रजी राज्याविरुद्ध घेतलेला आक्षेप ब्राह्मणांच्या मुखात एकपटीने शोभतो. तर तोच आक्षेप ब्राह्मणी राज्यांनी एका बहिष्कृताने घेतल्यास हजारपटीने शोभेल म्हणून असे स्वराज्य द्या की, त्यात थोडेबहुत आमचे राज्य आहे "

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र हिंदू समाजाच्या पुनर्घटनेची मागणी आपल्या चळवळीतून सुरू केली. जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या चळवळीतून हिंदू समाजाच्या समग्र पुनर्रचनेचा आग्रह धरला. मनु-स्मृती ही हिंदूंच्या धार्मिक, सामाजिक आणि नैर्बंधिक नियमांचा संग्रह होता. मात्र अस्पृश्यांवर सामाजिक, आर्थिक व धार्मिक अमानुष गुलामगिरीचे निर्बंध घातलेले होते. अस्पृश्य म्हणजे एक मूर्तिमंत महापातक आहे असे मनुस्मृतीचे सांगणे होते. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृतीची होळी केली त्याचे हे कारण होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या बुद्धीवादाच्या बळावर दलित समा-जाला माणूसपणाचा दर्जा मिळवून देण्याची प्रचंड मोठी चळवळ उभी केली. त्यांच्या धर्मांतराचा निर्णय दलितांना मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठीच होता. धर्मांतर करतांना त्यांनी दलित समाजाला बजावलं होतं.

" बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक भाग आहे. या देशाची संस्कृती, इतिहास यांच्या परंपरेला धोका लागणार नाही अशी मी खबरदारी घेतली आहे. मी आपली प्रतिज्ञा पूर्ण केली आहे. बौद्धधर्म सांभाळण्याची मोठी जबाबदारी तुमच्या शिरावर पडली आहे. आणि जर तुम्ही कडकपणे व उदात्तपणे तत्वे पाळली नाहीत तर महार आणि बौद्धधर्माचे वाटोळे केले असे जग म्हणेल "

या सर्व सामाजिक चळवळींचा भाग म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी १९५९ साली एक क्रांतीकारी निर्णय घेतला. आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या फीमध्ये सवलत देण्याचा. त्याचा निकष जात नाही, धर्म नाही तर आर्थिक दुर्बल घटक म्हणून. एकदा यशवंतरावजींना कुणीतरी मुलाखतीमध्ये प्रश्न विचारला होता, ' राजर्षी शाहू महाराज नसते तर काय झालं असतं ?' यशवंतरावजीनी सांगीतलं ' आज हा जो यशवंतराव आहे तो यशवंतराव तुम्हाला दिसला नसता आणि हा यशवंतराव कुठेतरी कऱ्हाडच्या माळावर, कृष्णेच्या काठावर डोक्याइतकी उंच काठी हातात घेऊन गाई-म्हशींच्या मागे फिरला असता ' त्यांच्या या विचाराचे स्मरण मला यासाठी होते. आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या फी माफी करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी बाळासाहेब देसाई शिक्षणमंत्री होते, यशवंतरावजी मुख्यमंत्री होते. शेतकरी, दलित, आदिवासी सगळया सामान्य कुटुंबातील लाखो मुलं महाविद्यालयाच्या दारात आली. महाविद्यालयाच्या दालनात आली. कदाचित तो निर्णय घेतला नसता तर बा. ह. कल्याणकर हा तुमच्यासमोर विचार मांडायला आला नसता. तर मी माझ्या गोगदरी या गावात थांबलो असतो. फारतर माझ्या गांवाचा मी सरपंच झालो असतो नाहीतर आमच्या केशवराव धोंडगे यांचा कार्यकर्ता झालो असतो इतकंच

यामुळं मला यशवंतरावजींच स्मरण यावेळी येतं. त्यांच्या विचाराचं मोल मला जाणवतंय.

यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्रात झालेल्या या सर्व सामाजिक क्रांतीच्या चळवळीचं चांगलं भान होतं. राजकारणाच्या धकाधकीत राहूनही जोतिराव फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचं मोल ते जाणत होते. राजकारणाशी तडजोड करीत असतांनाच गरीब समाजाची मोडतोड होणार नाही याची ते काळजी घेत होते. यशवंतरावजींनी आपल्या सबंध हयातीत सत्ता सोडली नसेल पण गरीब माणूस आपल्या धोरणातून सोडलेला नाही. अगदी गरीब कुटुंबातून प्रेमाच्या श्रीमंतीवर मोठा झालेला हा नेता होता. माणसाविषयीचं अतूट नातं त्यांच्या आईने त्यांच्यावर केलेल्या संस्कारातून निर्माण झालेलं होतं. ते म्हणतात त्या प्रमाणे त्यांची आईच त्यांची शाळा होती. प्रेमाचा संस्कार हाच त्यांचा विचार होता. ते एके ठिकाणी म्हणतात

" महाराष्ट्रातील बहुसंख्य वस्ती खेड्यात आहे, आणि त्यात मराठा समाज बहुसंख्येने जास्त असल्याने महार-चांभार-ब्राह्मण-सुतार-माळी इत्यादि अल्पसंख्यी लोकांचे रक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांवर आहे.

यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचं राज्य मराठी रयतेचं राज्य होईल याची ग्वाही दिलेली होती. महाराष्ट्राच्या लोकशाहीनं भारताला दिलेला हा नेता अष्टपैलू होता, समाजातील सर्वसामान्यांच्या प्रश्नांचं वास्तवाचं भान त्यांना होतं. साहित्य-संस्कृती-कला, ज्ञान आणि विज्ञान यावर त्यांची अपार श्रद्धा होती. लोकशाहीमध्ये अज्ञान नसते. तर लोकशाहीमध्ये संवाद असतो, संभाषण असते. विचारांची आणि मतांची देवाण-घेवाण असते. हे समजून घेऊनच त्यांनी लोकशाहीला जाणतं नेतृत्व दिलं " कोणाही कार्यकर्त्याने आंधळे असू नये, आंधळा दुनियेत हिंडू शकेल पण आंधळ्याच्या मागे दुनिया जाऊ शकणार नाही " हे त्यांचं सांगणं होतं.

हा जो सबंध चळवळीचा दृष्टीकोन तो अगदी वेळ थोडा असल्यामुळं आज आणि उद्या मी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

म. जोतिराव फुले महात्म्यांचे महात्मा आहेत. भारतातील अनेक समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी लोकांच्या प्रश्नांकडे थोड्याशा अंतरावरून लोकांपासून दूर राहून पाहिले. जोतिराव फुले मात्र प्रत्यक्षतः सामाजिक चळवळीच्या संघर्षातच उभे होते. ते केवळ समाज प्रबोधक अगर सुधारक नव्हते तर त्यांची कृती आणि विचार क्रांतिकारकाचे होते. त्यांच्या या क्रांतिकार्याचा प्रवास प्रबोधनापासून केवळ सुधारणावादापर्यंतच होऊ शकला नाही. तर सुधारणावादापासून बंडखोरीपर्यंत आणि बंडखोरीपासून ते क्रांतिपर्यंत होऊ शकला. महाराष्ट्राच्या विधानभवनासमोर जो फुल्यांचा शेतकरी पोषाखातील भव्य असा पुतळा पाहिल्यानंतर आपणाला आनंद वाटतो. शेतकरी पोषाखातील महात्मा फुले आपल्या हातात पुस्तक घेऊन उभे आहेत. जणू शेती संस्कृतीचं मस्तकच त्यांच्या रूपानं विधानभवनासमोर उभं आहे. ज्या शेती संस्कृतीपर्यंत, शेतकऱ्यांच्या झोपडीपर्यंत ज्ञान आणि विज्ञान पोहोचलेलं नव्हतं अशा संस्कृतीमधून हा उभा राहिलेला महापुरुष एका विशाल क्रांतीचं प्रतिक म्हणून आज आपणाला क्रांतीचा संदेश देत उभा आहे. ज्यांनी महाराष्ट्रात अगदी पहिल्यांदा सांगीतलं शोषण मुक्तीसाठी ज्ञानाची लोकशाही पाहिजे म्हणून. लोकशाही राजवट येण्याच्या शंभर वर्षे अगोदर हा लोकांचा तत्ववेत्ता लोकशाही मूल्यांची बीजे या मातीत पेरत होता. रयतेच्या विकासासाठी शैक्षणिक समानतेच तत्त्व प्रत्यक्ष कृतीतून राबवत होता. कोणत्याही समाजातली कर्तृत्ववान माणसं ही पावसासारखी आकाशातून येत नाहीत. समुद्रा-

वरून जसे ढग यावेत आणि पाऊस कोसळावा तसं नेतृत्व आकाशातून उतरतं नाही. वडाचं प्रचंड झाड आपल्या मुळ्या मातीत रोवून त्या मातीतले जीवनसत्व आपल्या मुळ्यांनी शोधून आकाशदिशेने वाढत जाते तशी मोठी माणसं आपल्या बौद्धिक जाणीवा सर्वसामान्यांच्या मनात रोवून ही माणसं मोठी होतात. जोतिराव फुले आज नाहीत. पण त्यांचा विचार, त्यांची कृती आणि त्यांनी निर्माण केलेली सामाजिक समतेची संस्कृती आपणाला एक क्रांतीपाठ शिकवत सामाजिक कार्याची प्रेरणा देते.

जोतिराव फुले काय अथवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर काय ? या दोघांचे विचार म्हणजे एकोणीस आणि विसाव्या शतकातील जणू हे दोघे दोन सूर्य आहेत. सामान्य माणसाला जीवनवादाचा प्रकाश देणारे हे दोघे प्रकाशयात्री आहेत. " ज्ञान म्हणजे प्रकाश असं बुद्धानी अडिच हजार वर्षापूर्वी सांगीतलं होतं." फुले आणि आंबेडकरांनीही ज्ञानाचं अमोघ शस्त्र वापरल्याशिवाय शोषणापासून मुक्ती नाही हे सांगितलं. ज्ञानाशिवाय इथलं माणूसपण वाढणार नाही. हा शोध त्यांच्या चळवळीचं मुख्य सूत्र होतं. नाहीतर आपल्या देशात काय परंपरा होती. बहुसंख्य लोकांनी अज्ञानाची परंपरा चालवायची. संस्कृती निर्माण करणा-या सामान्य जनांनी संस्कृतीच्या लाभापासून दूर राहायचं हीच आमची परंपरा होती. तिला धर्माची बैठक होती, धर्माचा आधार होता. जातीसाठी माती खावी ही प्रवृत्ती होती. जाचक रूढी आणि दैववाद यांच्या साखळदंडात समाजाचे पाय बांधून ठेवलेले होते. सामान्य माणसाच्या कष्टातून निर्माण झालेल्या संस्कृतीवर मूठभर वर्गाची मांड घट्ट बसलेली होती. या वर्गाने सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक भुईकोट निर्माण केले होते. आणि या जन्मजात तत्त्वावर आधारलेल्या भुईकोटाचे किल्लेदार स्वतःला भूदेव म्हणून घेणारे लोक होते. या भुईकोटाच्या पायाखाली सामान्य माणूस गाडला गेलेला होता. त्यानेच निर्माण केलेल्या संस्कृतीपासून तो तोडला गेला होता. अगदी साध्या आणि सामान्य गरजेपासून तो मोडला गेला होता. अशा सामान्य माणसांच्या स्मशानावर आमची धार्मिक आणि सामाजिक विषमतेची संस्कृती उभी होती, वर्णवर्चस्व होतं सामाजिक विषमता होती. स्त्री दास्य होतं, आर्थिक अन्याय होता. सर्व तऱ्हेची गुलामगिरी बहुसंख्य समाजावर लादलेली होती. सर्व तऱ्हेचं आणि सर्व पातळीवरचं लोकांच हे शोषण होतं.

ब्राह्मणांच्या इशाऱ्यावर नाचणारी आमची देव संस्था गरिबांचा निवद खात गप्प होती. देव आणि दैववाद गरिबांच्या मानगुटीवर बसवून हा पोटार्थीवर्ग सावलीत बसून तूप पोळी खात होता. सर्वसामान्य माणसांच्या शोषणाचा परिणाम मूठभर वर्गाचं स्वर्गीय सुख हेच होतं. जात आणि धर्माचे लोढणे सर्वसामान्यांच्या गळ्यांत बांधून हा मूठभर वर्ग सांस्कृतिक मिरासदारीवर जगत होता. चातुर्वर्ण्याच्या

पायावर उभ्या राहिलेल्या सामाजिक विषमतेला पहिला लढा बुद्धांनी दिला होता विषमतेमध्ये वाकल्या गेलेल्या समाजाला मोडून काढून समतावादी नवा-समाज निर्माण करण्याचं स्वप्न हे बुद्धांनी पाहिलं होतं. माणूस एकमूल्य आहे. हे ही बुद्धान सांगीतलं. मी देव मानत नाही, स्वर्ग नावाची गोष्ट अस्तित्वात नाही आणि मी सर्वज्ञ नाही. हे सांगत माणसाची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी बुद्ध लढला. माणसाच्या स्वाभाविक समतेचा आग्रह बुद्धांनी धरला आणि ही सामाजिक विषमता मानवनिर्मित आहे. म्हणून ती संपवली पाहिजे असा पहिला हादरा-पहिला सुरुंग सामाजिक विषमतेच्या पायाशी बुद्धांनी लावला होता. " माणसाच्या सर्व प्रश्नांची मुळं त्याच्यातल्या अज्ञानामध्ये आहेत " हे ही बुद्धानं सांगीतलं होतं. भारतीय समाजाला जडवादी आणि मानवतावादी तत्त्वज्ञानाची परंपरा फार जुनी आहे. त्यात चार्वाकाचा विचार आहे, सांख्य तत्त्वज्ञान आहे. बुद्धाचं सामाजिक तत्त्वज्ञान आहे, त्याबद्दल आज मला काही बोलता येणार नाही. कारण तो विषय वेगळा आणि मोठा आहे. या सर्व वैचारिक पार्श्वभूमीवर जोतिराव फुले ज्ञानाच्या बाबतीत काय म्हणतात ते पाहिलं पाहिजे. जोतिराव फुले म्हणाले.

" विद्येविना मति गेली । मति विना नीति गेली
नीति विना गती गेली । गती विना वित्त गेले
वित्त विना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले.

अगदी कमीत कमी शब्दात ज्ञानाच्या प्रकाशाची महत्ता आणि शूद्रांवर झालेल्या अनर्थाचं कारण त्यांनी अगदी अर्थपूर्ण पद्धतीने सांगीतलं आहे. ते पुढे म्हणतात.

" सर्वाचा निर्मिक आहे एक धनी । त्याचे ऋण मनी धरा सर्व ।।"

शूद्र आणि अतिशूद्र समाजाच्या सर्वस्पर्शी शोषणाविरुद्ध आणि गुलामगिरी विरुद्ध घणाघाती हल्ला करणारा भारतातील पहिला क्रांतीकारक म्हणूनच जोतिराव फुले यांचे मूल्यमापन करावं लागेल.

सर्वसामान्य जनांना विद्येची संधी नाही. म्हणून त्यांचा बौद्धिक विकास होत नाही. बुद्धीचा विकास नाही म्हणून जीवनविषयक नीतिपासून ते दूर आहेत. म्हणून त्यांच्यात प्रगती नाही आणि गतीही नाही. सर्व सामान्य जनांच्या अधो-गतीचं कारण एका अविद्येच्या तत्त्वामध्ये आहे. यावरून मी जोतीराव फुले यांना Philosopher of the masses (रयतेचा तत्त्ववेत्ता) असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

शिक्षणाच्या समान संधीच्या शिवाय पारंपारिक ग्रामीण समाजामध्ये परिवर्तन होऊ शकणार नाहीं याची खात्री जोतिराव फुले यांना झालेली होती. शेतीवर जगणाऱ्या समाजाला फक्त शेती संस्कृतीचं ज्ञान असते. शेतकरी माणस प्रत्यक्ष जीवनातील अनुभव, रोजचं निरीक्षण, अनुमान आणि अंदाज यातून मानवी

जीवनाचं ज्ञान मिळवतात. शेतीवर जगणारा हा समाज जीवनाच्या प्रत्यक्ष संघर्षात असतो. शेती संस्कृतीत रममाण झालेल्या थोर कवयित्री बहिणाबाई अगदी सहज उत्स्फूर्तपणे तत्त्वज्ञान बोलून जातात.

" आला सास गेला सास । जीवा तुझ रे न्यारं तंतर ।।
जीवन मरण म्हणजे । दोन सासातील अंतर ।।

जीवनाविषयींचं प्रचंड आकलन झाल्याशिवाय अगदी सोप्या पद्धतीनं बोलणं कठीण आहे. बहिणाबाई एका कवितेत म्हणतात.

" सोन्या चांदीनं मढला मारवाड्याचा बालाजी ।
शेतकऱ्याचा इठोबा पानाफुलांमंदी राजी ।।
आरे,बालाजी इठोबा एक जर देव ।
गरीबीनं समरितीनं केला भेद भाव ।। "

मार्क्सचे एकही पुस्तक न वाचणारी बहिणाबाई आमच्या समाजाच्या वर्गभेदावर नेमके बोट ठेऊन जाते. त्याचे कारण ग्रामीण संस्कृतीमध्ये ज्ञान आहेच. शिक्षणाचा अभाव असणाऱ्या या समाजामध्ये व्यावहारिक शहाणपणातून आलेली निकोप अशी जीवनदृष्टी आहे. जोतिराव फुले यांना ग्रामीण समाजापर्यंत नवीन तंत्र आणि तंत्रज्ञान पोहोचवून परिवर्तन करायचं आहे. अनुभवातून मिळालेल्या ज्ञानाला नव्या तंत्रज्ञानाची जोड मिळाली तर ग्रामीण समाजात परिवर्तन होऊ शकेल ही त्यांची खात्री होती.

जोतिराव फुले रांगड्या ग्रामीण भाषेत त्यांचे सारे विचार मांडतात हे त्यांचे वैशिष्टय आहे. ज्या समाजात परिवर्तन हवं आहे. त्या समाजाचा परिवर्तनाचा विचार त्यांच्याच भाषेत त्याना सांगीतला पाहिजे, याची जाणीव त्यांना होती. या वेळी मला गौतमबुद्धांनी बौद्ध भिखू महासंघाला सांगितलेल्या विचाराची आठवण होते. बुद्ध म्हणाला

" तुम्ही तुमचे विचार लोकांच्याच भाषेत सांगत चला "

जोतिरावांनी आपले सारे विचार लोकांच्याच भाषेत सांगीतलेले आहेत. भाषा विचाराचे कसोटीवर त्यांचे विचार श्रेष्ठ आहेत. दलित वाङमय श्रेष्ठ कां आहे. कारण ते आपल्या स्वतःच्या भाषेत बोलते म्हणून. नाहीतर आमच्याकडे काय पद्धत होती.

" जे जे आपणासी ठावे । ते ते संस्कृतात लपवावे ।। अज्ञानी करून सोडावे । बहुजन ।। " ही आमची पद्धत होती. इंग्रज आल्यानंतर ते ही बदललं " जे जे आपणासी ठावे । ते ते इंग्रजीत लपवावे ।। लोकापासून ज्ञान दूर ठेवावे । लोक शाही ही ।। अशी एका बाजूला संस्कृत भाषा आमच्या डोक्यावर होती. आणि डोक्यात फक्त अज्ञान होतं. ती देवाची भाषा होती, आणि वेद हे अपौरुष होते.

त्यामुळे भारतीय समाजजीवनांत वैचारिक क्रांतीच्या सा-या वाटा अशा रीतीनं बंद करून टाकल्या होत्या. सत्याण्णव टक्के रयत अज्ञानाच्या काळोखात पशुतुल्य पातळीवर तडफडत होती. शोषण, शोषण आणि शोषण हेच तिचं जीवन झालं होतं. पशुतुल्य कष्ट उपसणं हीच त्यांची संस्कृती होती. स्त्रिया, अस्पृश्य, शेतकरी आणि कष्टकरी समाज केवळ घाम गाळण्यासाठी जगत होता. घाम, अश्रू आणि शोषण हाच त्या समाजाचा हजारो वर्षांचा इतिहास होता. जोतिराव फुले आले आणि अज्ञानाच्या चाकावर धावणाऱ्या अंधश्रद्ध इतिहासाला त्यांनी थांबविलं. ते आले आणि रयतेच्या जीवनात तांबड फुटलं. त्यांनी भारतीय संस्कृतीच्या मक्तेदारांना ठणकावलं. वेद हे ईश्वरनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत. गुलामगिरीमध्ये ते म्हणतात–

> " भट जोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रास कसकसे फसवून खातात व ख्रिस्ती उपदेशक आपल्या निपक्षपाती धर्माच्या आदराने अज्ञानी शूद्रास खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्यमार्गावर आणतात या सर्व गोष्टीविषयी 'म्या' एक लहानसे नाटक करून सन १८१५ सालात दक्षिणा प्राईज कमिटीस अर्पण केले."

गुलामगिरीतच ते पुढे म्हणतात–

> " कित्येक भटांनी चव्हाट्यातील मारुती सारख्या महावीराच्या देवूळी रात्री बसून मोठा धार्मिकपणाचा डौलू घालून वरकांती ज्ञान सांगण्याचा भाव दाखवून आतून भागवतासारख्या ग्रंथातील खोट्यानाट्या गोष्टींचे पुरावे अज्ञानी शूद्रास सांगून त्यांची मने भ्रष्ट करून त्यांनी त्या बळीच्या मतानुयायी लोकांच्या वाऱ्यास देखील उभे राहू नये म्हणून उपदेश करून उगीच तरी बसले ! नाही. पण त्यांनी संधी साधल्याबरोबर त्याच ग्रंथातील भाकडकथा सांगून एकंदर सर्व अज्ञानी लोकांच्या मनांत इंग्रजी राज्याचा द्वेष भरवून त्यांनी या देशात मोठमोठाली बंडे उपस्थित केली नाहीत काय ?"

जोतिरावांनी ब्राह्मणप्रणीत ईश्वरशाहीला सुरुंग लावला. त्यांच्या लांड्या-लबाड्या चव्हाट्यावर आणल्या. ईश्वरशाहीच्या विरोधात त्यांच्या विचारांची निर्मिकशाही त्यांनी उभी केली. आणि सांगितलं, ईश्वर आणि माणसाच्यामध्ये दलालांची गरज नाही. ईश्वराला पर्यायी म्हणून निर्मिक हा शब्द त्यांनी वापरला. निर्मिक म्हणजेच निसर्ग आणि निसर्ग म्हणजे भौतिकवाद. ईश्वरशाहीच्या नांवानी हजारो वर्षे चालत आलेले वेदप्रामाण्य त्यांनी झुगारून दिले. ऋग्वेदाच्या पुरुष-सूक्तात सांगीतलं होतं, ब्राह्मण हे ब्रह्मदेवाच्या मुखातून जन्मले. क्षत्रीय बाहूपासून जन्मले, वैश्य मांड्यापासून जन्मले. शूद्र हे पायापासून जन्मले, पंचम मात्र कुठून

आले हे वेदकर्त्यांना अजून ठाऊक नाही. मनुष्यसमाजाविषयीचा सत्य विचार निर्भिडपणाने सांगणे हे जोतिरावांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ब्रह्मदेव, विष्णू आणि अवतार कल्पना लोकांच्या डोक्यांत कोंबून त्यांच्या अज्ञानावर आपलं पोट चालवणं या बेछूट हिंदूशाहीवर जोतिरावांनी आपल्या तोफा डागल्या. शोषित समाजाला आपल्या जीवनांत उभे करण्यासाठी जोतिरावांना ज्ञान आणि शिक्षणातील समानसंधी हेच क्रांतीकारी शस्त्र वाटत होतं. समाजाची अर्धी लोकसंख्या असलेल्या स्त्रिया, त्यांचा होणारा अमानुष छळ, स्त्रीदास्य आणि बाल विवाह, विधवा विवाहाला बंदी आणि मातृत्वाला शूद्रता प्रदान करणारी भ्रष्ट व्यवस्था इचा समूळ उच्छाद करण्यासाठी या शोषणाचं आणि अन्यायाचं मूळ जोतिरावांना सापडलं होतं. सत्य विचारावर आधारित नवा विचार, या नव्या विचाराचा विवेक बाळगणारा नवा माणूस जोतिरावांना ज्ञानाच्या चळवळीतून निर्माण करावयाचा होता. त्यांनी ब्राह्मणशाहीवर प्रहार करतांनाच ब्राह्मणशाहीच्या अतिरेक झालेल्या पेशवाईतील अवकळेवरही प्रहार केले. इंग्रज भारतात आले आणि ब्राह्मण नोकरशाहीच्या मगरमिठीत भारतीय जनता सापडली. देशी आणि विदेशी शोषणकर्त्यांचं आक्रमण भारतीय जनतेवर सुरू झालं. या पार्श्वभूमीवर फुले म्हणतात–

> " इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत. ते आपल्या जन्मास पुरतील म्हणून कोणाच्यानेही सांगवत नाही. यास्तव या लोकांचे राज्य या देशात आहे तोच सर्व शूद्रांनी जल्दी करून भटांच्या दास्यत्वातून मुक्त व्हावे या मध्ये थोडा शहाणपणा आहे."

शूद्राला पशूपेक्षा नीच वागविले म्हणून जोतिरावांचा हा सात्त्विक संताप माणसाला माणूसपणाची वागणूक द्या यासाठी होता. पेशवाईच्या अस्तानंतर फुले यांचा जन्म झाला ही वस्तुस्थिती होती. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत पेशव्यानी कहर केलेला होता. दुसऱ्या बाजीरावास कंगाल बुद्धीचा कलिपुरुष हे नांव होतं. इशारा या आपल्या पुस्तिकेत पेशवाईचं वर्णन करताना जोतिराव सांगतात–

> " थोडकेच दिवसामागे म्हणजे आर्य पेशवे यांचे शेवटील कुलदीपक पुरुष रावबाजीचे कारकीर्दीचा अस्त होईपर्यंत शेतकरी लोक शेतसारा देण्यास थोडेसे चुकले तर त्यास उन्हामध्ये ओणवे करून पाठीवर एक मोठा धोंडा द्यावा अथवा त्या शेतकऱ्याच्या बायकोस त्याच्या पाठीवर बसवावे आणि खालून त्यास मिरच्याचा धूर द्यावा "

ते आणखी पुढे वर्णन करतात–

> " ते प्रजा याचा अर्थ काडीकस्पट, ढेकूण अथवा काही एक प्रकारची जनावरे समजत. त्यांचा उपयोग म्हटला म्हणजे त्यांनी राजे व त्यांच्या जातीचे लोकांकरीता, त्यांचे स्त्रियांकरीता व मुलाबाळां-

करीता धान्य उत्पन्न करावे व वस्त्रे विणावीत. त्यांच्या करीता उन्हातान्हात खपावे आणि त्यास ऐष आरामाच्या ज्या गोष्टी लागतात त्या सर्व पुरवाव्यात "

" स्वातंत्र्याची किंमत देऊन बाजीरावांनी आपल्या देहाचा बचाव विकत घेतला " असे उद्‌गार वसईच्या तहानंतर ग्रँडडफ यांनी काढलेले होते.

अन्याय, अत्याचार, शोषण, भ्रष्टाचार, अस्पृश्यांची गुलामगिरी, शेतकऱ्यांची पिळवणूक, स्त्रियांना भोगदासींचा दर्जा, स्त्रियांचा गुलामाप्रमाणे बाजार हे पेशवाईचे वैशिष्ठ्य होते. इ. सन १८०० ते १८०१ मधील खालील नोंद पेशवाईच्या चालू असलेल्या धुमाकूळावर पुरेशी प्रकाश टाकणारी आहे.

" तालुके रत्नागिरी येथे (शिल्की) कुणबीनी फार आहेत. त्या पैकी सरकार कामास जरुरातील धडधाकट पाहून शिलकेस राखणे. बाकी राहतील त्या चौकशीने प्रोक्त करणे, यात केवळ निकामी म्हाताऱ्या विकत न घेई अशा असतील त्या दरकारदाराचे विद्यमाने सोडून देणे, म्हणून नारो अनंत व विठ्ठल नारायण मामलेदार तालुके मजकूर यांचे नांवे. " " पुण्यातील बहुतेक गृहस्थांच्या घरी कुळबीनी, लेकावळे व गुलाम असत " असे विधान लोकहितवादीनेही केले आहे.

जोतिराव फुले यांच्या प्रत्येक कृतीला त्यांचा विचारांचा आधार होता. आणि त्यांच्या प्रत्येक विचाराला कृतीतील अनुभवाचं सामर्थ्य होतं. कॉर्लमार्क्स म्हणाला होता–

" जग हे कसं आहे हे जगातील अनेक तत्त्ववेत्यानी सांगीतलेलं आहे. फक्त प्रश्न आहे, आहे ते जग कसं बदलायचं याचा "

कॉर्लमार्क्सच्या वरील विचाराचं उत्तर जोतिराव फुले यांनी १८४८ साली दिलं. हा जो आमचा समाज बदलायचा आहे ना? तो अशा पद्धतीने बदलायचा की ज्या समाजात सर्वसामान्य माणसाला ज्ञान घेणे हा त्याचा प्राथमिक अधिकार असेल. प्रत्येकाला शिकण्याची संधी मिळेल. सुसंस्कृत जीवन जगण्याचा अधिकार मिळेल आपल्या माहितीसाठी मी आवर्जून एक संदर्भ देतो आहे. १८४८ साली लंडन म्युझियमच्या लायब्ररीमध्ये बसून कॉर्लमार्क्स ॲकॅडेमिक गोष्टी लिहीत होता. जगातील कामगारांच्या हातात समाजवादाचं क्रांतीकारी शस्त्र देत होता. जगातील कामगारांनो एक व्हा असं सांगत होता. कामगारांचं राज्य आलं पाहिजे याचा आग्रह मांडत होता, त्याच वेळी जोतिराव फुले पुण्यातील भिडे यांच्या वाड्यात अस्पृश्य मुलींची पहिली शाळा चालवत होते. भारतीय माणसांनी काढलेली भारतातील ती पहिली शाळा होती. इतर अनेक शाळा चालल्या होत्या पण एका भारतीय माणसाने शूद्र आणि अतिशूद्र मुलींच्यासाठी काढलेली मुलींची पहिली शाळा म्हणजे

जोतिरावांची पहिली शाळा होय. भाग्य विधाता, भारतीय स्त्रियांच्या शिक्षणाचं पहिलं ज्ञानपीठ ज्याला आपण म्हणू ते जोतिराव फुले कॉर्लमार्क्सचा क्रांती विचार मांडत होते. तो क्रांती करण्यासाठी कुठे गेला नाही. त्यांच्या विचारातलं सामर्थ्य हातात घेऊन लेनीन यांनी रशियामध्ये कम्युनिष्ट क्रांती घडवून आणली. जोतिराव फुले, ज्याला भारतीय समाजाचा सामाजिक मार्क्स असं म्हणू, त्यांनी भारतीय सामाजिक क्रांतीचा क्रांती विचारही केला. विचार क्रांतीही केली आणि तशी प्रत्यक्ष कृतीही केली. सत्यविचार, सत्यवर्तन आणि सत्यधर्म व सद्सतविवेक किती अव्वल दर्जाचा असतो हे त्यांनी आपल्या कृतीशील प्रयोगातून सिद्ध केलं.

भारतीय समाज व्यवस्थेसंबंधीचं त्यांचं आकलन अचूक आहे. सामाजिक विषमतेनं बरबटलेली हजारो जाती जमातीमध्ये वाटलेली, श्रेष्ठत्व आणि कनिष्टत्वाच्या भावनेवर तरलेली सामाजिक, सांस्कृतिक अन्यायानी जिचा पाया पक्का आहे त्या जन्मतत्त्वाचं मूळ शोधणाऱ्या व्यवस्थेसंबंधीचं अचूक असं भान त्यांच्या विवेचनामध्ये आहे. त्यांच्या मताशी शंभर टक्के कोणी सहमत होईल न होईल हा प्रश्न नाही. त्यांनी समाज व्यवस्थेसंबंधीचा नीटपणे विचार केला होता. मुळात जाऊन भारतीय समाजव्यवस्था तपासली होती. हा जो अस्तित्वात असलेला समाज आहे. तो अन्याय आणि शोषणावर आधारीत आहे. म्हणून हा समाज आम्हाला नको आहे, हे सांगतांना जोतिरावांनी नवा समाज कसा असेल या संबंधीचं चित्रही आपल्या मानवतावादी विचारांतून स्पष्ट केलं. समाजाची पुनर्रचना झाली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ पशुतुल्य जीवन होय, हे त्यांचं मत होतं. समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्य लोकांचं पारतंत्र्यच होय, असा त्यांचा विचार होता. ज्ञानाशिवाय मुक्ती नाही आणि मुक्तीशिवाय स्त्रीत्वाला अर्थ नाही आणि त्यासाठी स्त्रीशिक्षणाशिवाय पर्याय नाही अशी त्यांची धारणा होती. ज्या समाजव्यवस्थेचा पाया सामाजिक समता आहे तोच चांगला समाज होय. ज्ञानाचं स्वातंत्र्य हीच त्या समाज जीवनाकडे जायची पाऊलवाट आहे. यावर त्यांचा विश्वास होता. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये कुणाचीच मक्तेदारी नको म्हणून त्यांनी ज्ञानाच्या मक्तेदारावर वैचारिक तोफा डागल्या आणि ज्ञानावर जगणारा नवा समाज निर्माण करणं यातच त्यांनी आपलं जीवनध्येय मानलं. कारण ज्ञानावर जगणारा समाज निर्माण केल्याशिवाय स्वातंत्र्यावर जगणारा समाज निर्माण होत नाही याचं त्यांना भान होतं. ज्ञान हे मूर्तिपूजेपेक्षा श्रेष्ठ आहे हा जोतिराव फुले यांच्या शैक्षणिक विचाराचा प्राण होता.

जोतिराव फुल्यांनी धर्मग्रंथावर टीका केली. नवमानवतावादावर आधारित समाजरचना हवी हा आग्रह धरला. आणि आपले ध्येय गाठण्यासाठी सत्यशोधक समाज ही संघटना उभी केली. या तिन्ही गोष्टी जोतिराव फुल्यांनी केल्या. भारतीय

समाजाचं व्यवस्थित आकलन करून घेतलं. तिच्यासंबंधीच्या टीका-टिपणी तयार केल्या. गुलामगिरी हा ग्रंथ जर पाहिला तर भारतातील स्त्रिया आणि बहुसंख्य दलित आदिवासी समाजाचा तो स्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे. तो जर मुळातून आपण वाचला. त्यातील नवमानवतावादाचा, मानवी मुक्तीचा, शोषण मुक्तीचा आशय गाळून बोलता येत नाही. भाषा रांगडी आहे, नांगरी आहे. मी तर नेहमी म्हणतो, प्रत्येकाने आपल्या आईबापाच्या भाषेत बोललं पाहिजे. संस्कृती या शब्दाची फोड जोतिराव फुल्यांनी अशी केली, जी सर्वकृत असते ती संस्कृती होय. जगातील प्रत्येक भाषा लोक निर्माण करतात. आणि आम्ही साहित्यिक मग तिला थोडीशी झळाळी देऊन, कलाकुसर करून, रंगरंगोटी करून तिला आम्ही ग्रंथिक भाषा बनवितो. 'गुलामगिरी' हा स्त्रियांचा, दलितांचा, आदिवासींचा, काम करणाऱ्या माणसांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे. त्यांनी सबंध व्यवस्थेची चिरफाड केली की तुमचे वेद, तुमच्या श्रुती, स्मृती या कशा लबाड आहेत. भटशाही गुलामगिरीच्या पडद्याआड आणि सुधारलेल्या इंग्रजी राज्यात कशी चालू आहे. या संबंधीचा एक विध्वंसक विचार, बंडखोरीला लागणारी सगळी वैशिष्ठ्ये गुलामगिरीमध्ये आहेत. जोतिराव फुले फक्त उदारमतवादी नव्हते, ते समग्र क्रांतीवादी होते. याच व्यासपीठावर आमचे स्नेही माजी आमदार कै. पी. बी. साळुंखे यांनी फार सुंदर विवेचन केलेलं आहे. १८१८ ला पेशवाई बुडाली आणि नातूंच्या हस्ते युनियन जॅक शनिवारवाड्यावर चढविण्यात आला. १६०१ ला पहिलं पुस्तक प्रकाशित झालं ते ख्रिश्चन धर्मावर आधारित पुस्तक आहे. आणि १६०१ ला ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. १८३२ ला मराठीतील पहिलं वर्तमानपत्र 'दर्पण' निघालं. १८३७ ला 'दिग्दर्शन' निघालं, बाळशास्त्री जांभेकरांनी ते काढलं. मराठीतील ते पहिलं वर्तमानपत्र होय.

बाळशास्त्री जांभेकरांनी हिंदू समाजातील आणि धर्मातील उणीवांच्यावर नेमके बोट ठेवले. विशेषतः स्त्रियांच्यावर होणारे अत्याचार ही हिंदूधर्मातील मूल्यांची झालेली लक्तरं होती. स्त्री-शूद्रांच्या शिक्षणाची सुधारलेल्या इंग्रजी राज्यातही परवड होत आहे. हे जोतिराव फुले यांच्या प्रमाणेच जांभेकरांना पटले होते. स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे या जोतिराव फुले यांच्या विचारांशी त्यांच साधर्म्य होतं. 'गुरुणांमाता गरीयेशी' या वचनाची थोरवी फुले प्रमाणेच त्यांना पटली होती. म्हणूनच त्यांनी बाल विवाहाला विरोध, विधवा विवाहाचा पुरस्कार, संमती विवाहाचा आग्रह इत्यादि बाबींचा हिरीरीने पुरस्कार केला.

हा सबंध टप्पा सांगताना पी. बी. नी सांगीतलं की १८१८ ते १८४८ समाजपरिवर्तनाची एक झुळूक महाराष्ट्रात समाजप्रबोधनाच्या विचाराचा भाग म्हणून निर्माण झालेली होती. बाळशास्त्री जांभेकर आपल्या 'दर्पण' मधून 'दिग्दर्शन'

मधून सबंध समाज व्यवस्थेमध्ये सुधारणा झाली पाहिजे असा आग्रह मांडत होते. विधवा विवाह झाले पाहिजेत, बाल विवाह थांबले पाहिजेत, स्त्रियांवरचे अत्याचार बंद झाले पाहिजेत अशा प्रकारच्या धर्मसुधारणा व समाजसुधारणा ते सांगत होते. ही परिवर्तनाची 'झुळूक' होती. पाश्चात्य संस्कृतीचं बेफाम वारं या स्थितीशील समाजावर जेव्हा आदळू लागलं तेव्हा आम्ही गडबडलो, गोंधळलो. आपली स्थितीवादी व्यवस्था दचकली. हे इंग्रज लोक कोठून येतात ? हे आमच्या सर्वज्ञ मंडळीना कळत नव्हत. कलकत्ता हे इंग्लंडमध्ये आहे का इंग्लंड कलकत्यात आहे. हे माहीत नव्हतं. १८५३ साली पहिली रेल्वे जेव्हा भारतात आली. आणि ती पहिली ट्रेन जेव्हा मुंबई ते ठाणा धावली त्यावेळी आमचे सर्वज्ञ लोक तिला भूत भूत म्हणून पळू लागले. वेदामध्ये नव्हतीच ना ट्रेन, आणि काही लोकांनी तर तिला दगडं मारली. ही आमची सगळी अवस्था, वेदाच्या पलिकडे आमचं ज्ञान नाही. लोकांच्या अज्ञानावर आमची श्रीमंती, लोकांच्या अज्ञानावर आमचं जीवनमान, म्हणून आम्ही सुसंस्कृत ! आणि आमच्या पोटासाठी समाज मेला तरी चालेल, तो थांबला तरी चालेल, म्हणून शोषण चालू. आणि अशा ज्ञानाच्या किल्ल्या आमच्या कमरेला आणि त्याचा सुद्धा अभिमान असे. असा सर्व समाज बदलताना ही निर्माण झालेली झुळूक. पी. बी. साळुंखे यांनी सांगीतलं की १८४८ ते १८९५ पर्यंत जोतिराव फुल्यांनी समाजक्रांतीच्या चळवळीचा प्रचंड असा 'झंझावात' महाराष्ट्रात निर्माण केला. हा दुसरा टप्पा महाराष्ट्रातल्या समाज प्रबोधनाच्या चळवळीचा आणि १८९५ ते १९२३ ते २५ पर्यंत राजर्षी शाहू महाराजांनी या चळवळीचं 'वादळ' निर्माण केलं आणि १९२५ ते १९५६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्याचं 'तुफानात' रूपांतर केलं. ते प्रचंड 'तुफान' होतं. महाराष्ट्रातल्या समाजक्रांतीच्या चळवळीच्या टप्प्यांशी मी पूर्ण सहमत आहे. अतिशय सुंदर विवेचन त्यांनी केलेलं आहे. जोतीरावांनी त्या काळी झंझावात निर्माण केला. आज सुद्धा माझ्या औरंगाबाद शहरामध्ये, कऱ्हाड शहरामध्ये तुमच्या आपल्यापैकी किती लोकांची हिंमत आहे. धैर्य आहे, धाडस आहे ? " कोणत्याही विधवेनं आपल बाळतपण माझे घरी येवून करावं. सगळी गुप्तता ठेवली जाईल, म्हणून पाटी लावण्याची " किती लोक हे धाडस आज दाखवतील ? वैचारिक क्रांतीचा आग्रह आपण जरुर धरू, राष्ट्रीय स्वातंत्र्याचा पुरस्कार आपण जरुर करतो, राष्ट्रवादा-बद्दलतर आपण हिरिरीने बोलतो. पण समाज आमूलाग्र बदलला पाहिजे आणि त्यासाठी आपल्यापासून आपण सुरुवात केली पाहिजे, असं मानणाऱ्यापैकी आपण किती लोक आहोत? जोतिराव फुल्यांनी हे सगळं केलं. या सबंध गप्पगार समाजाला जागं केलं, अगदी खडबडून जागं केलं. त्यांनी केवळ मनोरंजनासाठी वाङ्मय लिहिलं नाही तर क्रांतीसाठी साहित्य लिहिलं. 'गुलामगिरी' 'शेतकऱ्याचा आसूड' 'इषारा' 'सार्वजनिक सत्यधर्म' ही पुस्तके लोकांना जाग आणण्यासाठी आणि

लोकांना जाण आणण्यासाठी लिहिली मित्रहो, मी आपल्याला आवर्जून सांगू इच्छितो. श्रेष्ठ वाङ्मयाचं लक्षण काय ? जो लेखक त्याच्या वर्तमानकालीन समाजाला जाण आणून देतो तो लेखक माझ्या दृष्टीने मोठा. आणि जे लेखक पुनरुज्जीवनवादी विचार कलावादाच्या नांवाखाली - या नावाच्या वादाखाली आपले लेखन चालू ठेवतात तेव्हा त्यांना बाजारामध्ये फक्त पुस्तक न्यायचं असतं, त्यांना पैसा हवा असतो. खोटी प्रतिष्ठा हवी असते. समाजाचे काही प्रबोधन करावयाचे नसते. जोतिराव फुल्यांनी हे सबंध जे लिहिले ते लोकांना खडबडून जागे करण्यासाठी, लोकांना अस्वस्थ करण्यासाठी. उठा, ज्ञानाची हत्यारे तुमच्या हातात घ्या आणि तुमच्यावर शोषणाचे जे आक्रमण होत आहे ते थांबवा यासाठी जोतिबा फुल्यांनी संघटना बांधली. त्यांचा सर्व विचार प्रत्यक्ष कृतीवर आधारित होता. १८४८ पासून जे शाळा काढण्याचे काम केले ते त्यांनी अठरा शाळा काढल्या. अस्पृश्य मुलांसाठी पहिली शाळा काढणारा पहिला भारतीय जोतिराव फुले. १८८१-८२ चा रिपोर्ट सांगतो की माध्यमिक शाळेमध्ये आणि महाविद्यालयामध्ये एक ही मांग किंवा महाराचा मुलगा हजेरी पटावर नव्हता. आणि आज १९६० साली महाराष्ट्रात जेवढं शिक्षण होतं त्याच्या तीनशेपट शिक्षण महाराष्ट्रात वाढलेलं आहे. लोक म्हणतात गुणवत्ता नाही, सगळं बिघडलं, सूज आली आहे. 'मोनोपली' जाणा-यांचा हा कांगावा आहे. पुणे नगरपालिकेने त्या शाळा नतर चालविल्या. जोतिराव फुले त्यातून बाहेर पडले. किती शाळा त्यानी चालविल्या हा महत्त्वाचा भाग नाही. कर्मवीर भाऊराव पाटलांसारख्या त्यांनी तीनशे शाळा, सत्त्याऐशी होस्टेल्स, तीस पस्तीस महाविद्यालये नसतील काढली त्यांनी ! रयत शिक्षण त्यांच्याच रोपाला आलेलं एक सुंदर फळ आहे. कर्मवीर भाऊराव पाटील. पण भारतीय समाजाची पुनर्रचना करण्यासाठी लागणारी प्रत्यक्ष कृती, अशी जो ज्ञानाची संस्कृती निर्माण करू शकेल, जी सामर्थ्याची संस्कृती निर्माण करू शकेल आणि जी धैर्यशाली माणसांची संस्कृती निर्माण करू शकेल व एक माणूस एक मूल्य या तत्वावर तिचं अधिष्ठान असेल असा एक विवेकबुद्धीचा सुंदर विचार जोतिराव फुल्यांनी दिला.

कॉर्लमार्क्सनी असं म्हटलयं " कोणत्याही समाजात सामाजिक क्रांतीची चळवळ धार्मिक क्रांतीपासून होते. धर्मग्रंथावरील परखड टीकेपासून सुरू होते. डॉ. बाबा-साहेब आंबेडकर म्हणाले की, तुमच्या समाजाची क्रांती व्हायची असेल तर तुमचा समाज धार्मिक बंधनातून मुक्त झाला पाहिजे. तुमच्या धर्मासबंधीच्या ज्या कल्पना आहेत त्यांच्यावर टीका झाली पाहिजे. धर्म ही एक बंद गोष्ट असता कामा नये. ती चर्चेला खुली पाहिजे. या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनो म्हटलेलं आहे, " धर्म हा मनुष्याकरीता आहे. मनुष्य धर्माकरीता नाही. जो धर्म तुम्हास माणूस म्हणून ओळखावयास तयार नाही, जो धर्म तुम्हास पाणी मिळू देत नाही·

तो धर्म या संज्ञेला अपात्र आहे. जो धर्म तुम्हाला शिक्षण मिळू देत नाही, तुमच्या ऐहिक उत्कर्षाच्या आड येतो तो धर्म या संज्ञेला पात्र नाही. जो धर्म आपल्या अनुयायांना आपल्या धर्मबांधवाशी माणुसकीने वागण्यास शिकवत नाही तो धर्म नसून रोग आहे, जो धर्म अज्ञानांना अज्ञानी रहा, निर्धनाना निर्धन रहा असे म्हणतो, तो धर्म नसून शिक्षा आहे." यापुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले " हिंदूधर्म हा दगडांचा धर्म आहे, त्याच्यापुढे कपाळ फोडून घेतले तरी काही उपयोग नाही." पण बुद्धांचा धर्म ज्ञानावर उभा होता. बुद्धधर्म हा बुद्धी–वादावर उभा होता. समाज परिवर्तनाचे ते गतिविज्ञान होतं. महाविज्ञान होतं. आंबेडकर पुढे म्हणाले की, मनूने मनुस्मृती लिहिली असेल. आमचा त्याला आक्षेप नाही, पण ती मनुस्मृती आज तुम्ही प्रमाण मानता याला आमचा आक्षेप आहे. हे आंबेडकरांचं विधान आमच्या देशातल्या व जगातल्या सगळ्या धर्मांना लागू केलं पाहिजे. धर्म ही गोष्ट माणसासाठी आहे, धर्म ही गोष्ट माणसांनी निर्माण केलेली आहे. की, स्वतःच्या समाजजीवनामध्ये त्या माणसाने वागावे कसे यासाठी ? इरावती कर्वे म्हणतात " धर्म म्हणजे माणसाने समाजात कसे वागावे या संबंधीचे नियम, माणसाचे समाजव्यवहारातील नियम " महर्षि व्यास हा एक जागतिक कीर्तीचा कलावंत ज्याला आम्ही प्रतिभावंत मानतो, मानवी जीवना संबंधीप्रचंड निरीक्षण-परीक्षण करणारा हा माणूस. त्यांनी सांगीतलं धर्म म्हणजे " जो समाजाची धारणा करतो तो धर्म" नव्या समाजाला जुन्या धर्माची वस्त्रं बसत नाहीत. जसे व्यक्तीचे वय वाढते तसे समाजाचेही वय वाढते. पाचवी मधल्या मुलाची वस्त्र एस्. एस्. सी. वाल्या मुलाला येणार नाहीत. म्हणून जोतिराव फुल्यांनी गुलामगिरी मध्ये सबंध अवतार कल्पना आमच्या ज्या होत्या त्या धुडकावून लावल्या. तुमचा तो वराह अवतार असेल, कूर्म अवतार असेल, परशुराम अवतार असेल, हे सगळे अवतार लोकांना फसविण्यासाठी निर्माण केले आहेत. त्यांची भाषा अशी तुमच्या कोल्हापुरी रस्त्यासारखी झणझणीत होती.

जोतिराव फुले यांची भाषा त्यांच्या शेतकरी भट्टीच्या मुशीतून ज्या तप्त स्वरूपात बाहेर पडली त्या स्वरूपातच ती ग्रंथामधून प्रसिद्ध झालेली आहे. ते कृतिशील तत्त्वचिंतक असल्यामुळे थंड गोळ्यासारखा पडलेला बहूजनसमाज त्यांनी आपल्या भाषासामर्थ्याने हलविला. जोतिराव फुले यांनी जाती संस्थेविरुद्ध बंड पुकारले, बुद्धीप्रामाण्यवाद, बंधुता आणि समतामूल्ये, शोषणमुक्त नवमानवता-वाद या मूल्यांवर अधिष्ठित सामाजिक पुनर्रचनेचे निशाण फडकविले.

> " धर्म राज्य भेद मानवा नसावे । सत्याने वागावे । ईशासाठी ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी । धरावे पोटाशी । बंधूपरी निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक । भांडणे अनेक । कशासाठी ॥

आपण लक्षात ठेवा जेव्हा माणूस मनापासून बोलतो ना, तेव्हा तो अतिशय स्पष्ट बोलतो. जोतिराव फुले फक्त बुद्धीतून बोलत नव्हते. बुद्धी आणि अंतःकरण यांचं एक मुलायम मिश्रण-रसायन त्यांच्या बुद्धीवादामध्ये झालेलं होतं. मानवते-संबंधी अपार असा गहिंवर, माणसांच्या संबंधी अफाट अशी तडफ, माणसांवर प्रेम करणारा हा लोकांचा तत्त्ववेत्ता, भारतीय सामाजिक विषमतेला सुरुंग लावणारा हा क्रांतिकारक तत्त्वज्ञ ! आता आमच्याकडे वाद आहेत. जोतिराव फुले तत्त्वज्ञ होते का समाजसुधारक होते ? झालं, आमच्या संशोधकाला दोन-चार वर्षे खूप झाली हा वाद करण्यासाठी ! यावर आमची स्कॉलरशिप ! आंबेडकरांची स्कॉलरशिप होतीच पण ती अशी स्कॉलरशिप होती. ' With Social Outlook ' होती. इथं ' सोशल औटलूकच ' नाही. फक्त स्कॉलर-शिपच आहे. पगाराचा घाणा ओढण्यासाठी ! महात्मा फुले यांना तुम्ही स्कॉलर म्हणा त्यांना तुम्ही तत्त्वज्ञ म्हणू नका, तुम्ही क्रांतीकारक म्हणू नका. तुम्ही म्हणजे सारं जग नव्हे. वर्तमानपत्रांच्या अक्षरात मावळणाऱ्यांच्या अभिप्रायाची कोण पर्वा करतो ? आपल्यात आज ते नाहीत पण सबंध एकोणिसाव शतक ज्या माणसाच्या विचारानी गर्जत होतं असा तो एक क्रांतीचा व्याघ्रसिंह होता. दणाणून सोडलं सगळं त्यांनी. गोपाळ गणेश आगरकर तुमच्याच जिल्ह्यातले. त्या आगरकरांच्या बुद्धीवादाची थट्टा केली आमच्या लोकांनी. पण आज आगरकर द्रष्टे ठरले. द्रष्टी माणसं लोकांचे जीवनात आनंद निर्माण करतात. आमच्या वर्ण संस्कृतीचं पुनरुज्जीवन करण्यासाठी राष्ट्राची भाषा ते बोलत नाहीत. मग ते म्हणाले जोतिराव फुले राष्ट्रवादी नव्हते. ते इंग्रजांना मदत करीत होते. म्हणजे ते देशद्रोही होते. म्हणजे आमच्या देशातील स्त्रियांना शिकवू नका म्हणणारा माणूस राष्ट्रवादी, अस्पृश्य माणूस शिकता कामा नये तो अस्पृश्यच राहिला पाहिजे असे म्हणणारा माणूस राष्ट्रवादी. दहा वर्षाच्या मुलीवर जबरी संभोग करण्याचा अधिकार पुरुषाला असावा असं मानणाऱ्यांचा पक्ष घेणारा माणूस राष्ट्रवादी. शेतकऱ्याला पार्लमेंटात पाठवून काय नांगर हाकायचा आहे. असा म्हणणारा माणूस राष्ट्रवादी. स्त्रियांनी शिकलं पाहिजे, अस्पृश्यता गेली पाहिजे, स्पृश्य-अस्पृश्य भेद राहता कामा नये, सगळ्या समाजांनी शिकलं पाहिजे तो माणूस राष्ट्रवादी नाही.

माझा मुद्दा प्रवृत्तीशी निगडित आहे. जोतिराव फुल्यांचा हल्ला व्यवस्थेवर होता. व्यक्तीवर नव्हता. प्रवृत्तीवर होता. कुठल्या एका विशिष्ट जातीवर नव्हता, त्या जातीमधल्या प्रवृत्तीवर होता. अनेक ब्राह्मण माणसं जोतिराव फुल्यांच्या बरोबर होती. काम करत होती. ब्राम्हण्य सोडून ते त्यांच्या सबंध चळवळीला मदत करीत होते. फुल्यांनी त्यांचे आभार मानलेले आहेत. त्यांनी फुले जातीयवादी म्हणणाऱ्याना उत्तर दिले पहिजे.

जोतिराव फुल्यांनी विधवांचे पासून झालेल्या मुलांसाठी बालहत्त्या प्रतिबंधक गृह काढलं. काय अवस्था होती ! गरीब समाजातल्या स्त्रिया विधवा झाल्यातरी तो गरीब समाज लग्न लावून देतो. पण जो उच्च समजला जाणारा समाज आहे. मग तो आमच्या मराठ्यातील देशमुख असेल किंवा ब्राम्हण असेल. अहो सगळी लग्ने आठव्या नवव्या वर्षी व्हायची. खुद्द पेशव्यांची लग्ने बघा, यादी वाचा पेशव्यांच्या लग्नाची, नवऱ्याचे वय बारा वर्षे, व मुलीचं वय आठ वर्षे-दहा वर्षे पंधराव्या वर्षी नवरा मेला की ही विधवा. तिचं केशवपन करायचं आणि तिनं विधवा म्हणून आयुष्यभर तसच राहायचं. तिला विद्रूप केलं जायचं. किड्या-मुंग्या-सारखं जगणं तिच्यावर लादलं जायचं ! मग कुठेतरी तिचा पाय चुकायचा, फसायचा. मग तिनं तळं जवळ करायचं, विहिरीत जाऊन जीव द्यायचा. विष घेऊन आत्महत्या करायची. त्या पापकृत्यामध्ये पुरुषही सहभागी असायचा, पण तो मोकळा असायचा, नामानिराळा रहायचा.

जोतिराव फुल्यांनी पुण्यामध्ये जागोजागी अशी पाटी लावली की, विधवांनी आपली मुलं आमच्या गृहामध्ये आणून सोडावीत, त्यांचं बाळंतपणही आम्ही करू गुप्तता राखू. आणि त्या ब्राम्हण विधवेपासून काशीबाई नवरंगे पासून झालेला 'यशवंत' नावाचा मुलगा त्यांनी दत्तक घेतला .१९५५ साली भारतीय लोकसभेने नात्याबाहेरील व्यक्तीस दत्तक घेण्याचा कायदा मंजूर केला. जोतिराव फुले यांनी स्वातंत्र्य मिळण्याच्या ऐंशी नव्वद वर्षे अगोदर जातीबाहेरील आणि नात्याबाहेरील काशीबाई नवरंगे नावाच्या ब्राम्हण विधवेपासून झालेल्या 'यशवंत' या मुलाला दत्तक घेतले.

" निर्मिचे निर्मिला मानव पवित्र ।
कमि जास्त सूत्र बुद्धीमध्ये ॥
पिढीजाद बुद्धी नाही सर्वांमधी
शोध करा आधि पुरतेपणी ॥१॥"

हे मी तुम्हाला यासाठी सांगतोय - १९५६ नंतरचा महाराष्ट्र. प्रबोधनच थांबलेलं आहे म्हणून सांगतोय, जोतिराव फुल्यांची आठवण आम्हाला आज का होते. जोतीराव फुले ज्या ज्या प्रश्नासाठी आयुष्यभर लढले ते ते सगळे प्रश्न आज सुटायचे राहिलेले आहेत. लोकशाही येऊन आमचे सरकार येऊन सुद्धा, गोरा साहेब जाऊन काळा साहेब आला. प्रवृत्ती तीच चालू आहे. त्या संबंधी मी उद्या जास्त बोलेन.

जोतिराव फुले हे समाजाच्या प्रत्येक प्रश्नांवर विचार करत होते, ते सोडविण्यासाठी झटत होते. प्रश्न जातीचा नव्हता. जे लहान असतात ना ? ते जातीचं डबकं करून त्यात आरामात पोहतात, खातात, पितात. बेडकासारखं त्यांचं

विश्व छोटं असतं यशवंतराव चव्हाणांनी एका ठिकाणी म्हटलेलं आहे " माणसं जन्माने मोठी होत नाहीत. माणसं मोठी होतात त्यांच्या कर्तृत्वानं. " पण इथं तर सगळं कर्तृत्व जातीच्या पाळण्यात ! मराठा मोठा का ? मराठ्यात जन्मला म्हणून. त्याच यश काय ? त्याचे आईबाप मराठा होते मग गर्वसे कहो आम्ही म्हणायचं ' हम मराठा है ' गर्व काय ? ही काय गर्व बाळगायची गोष्ट आहे ? काय चालवलं हे ? या सर्वांच्या पलिकडे जाऊन जोतिराव फुल्यांनी तळातला माणूस उभा करण्यासाठी, सामान्य माणूस उभा करण्यासाठी. त्याला त्याचं हरवलेलं जीवन देण्यासाठी चळवळी केल्या त्यावेळी किती चळवळी चालू होत्या ?

जेव्हा जोतिराव फुले काम करत होते तेव्हा लो. टिळक हे १८५६ ला जन्मले, आगरकर त्यावेळी आहेत, महादेव गोविंद रानडे त्यावेळी आहेत. किती माणसे आहेत ते पहा भारतात त्यावेळी ! महादेव गोविंद रानडे म्हणाले– " जो समाज पन्नास पाऊले पुढे जात नाही. तो समाज पांचशे पाऊले मागे जातो " तर समाज पुढे गेला पाहिजे. मात्र प्रत्यक्ष कृतीमध्ये त्यांनी कच खाल्ली, विधवा विवाह झाले पाहिजेत अशा परिपत्रकावर त्यांनी सह्या केल्या. त्यांची पहिली पत्नी मेल्यानंतर स्वतः ज्यावेळी लग्न करावयाची वेळ त्यांच्यावर आली तेव्हा त्यांनी विधवेशी लग्न करा असे त्यांचे मित्र म्हणाले. पण त्यांनी ते केले नाही. प्रत्यक्ष कृती करण्यासाठी जे मानसिक बळ लागतं ते मानसिक बळ, बौद्धिक बळ, ते सामाजिक धाडस ते जोतिराव फुल्यांच्याकडे होते. ते रानड्यांच्या जवळ नव्हते. जोतिरावांनी कुणाची पर्वा केली नाही.

सगळे त्यांना म्हणाले हे ब्राह्मणद्वेष्टे आहेत. पण टिळकांसाठी त्यांनी फंड जमा केलेला आहे. टिळकांचा सत्कार त्यांनी केलेला आहे. आणि चिपळूणकरांची शाळा अतिशय चांगली चालते म्हणून सरकारने तिला ज्यास्त अनुदान दिले पाहिजे अशी शिफारस केली आहे. ही माणसं मोठी असतात. मोठी माणसं नेहमी साधी असतात. साधं असण्यासाठी जीवन कळावं लागतं, जीवन कळण्यासाठी माणसं वाचावी लागतात. कुठंतरी मळ्यात काम करणारा माणूस. कुठंतरी तळ्यात हरवणारा दलित, आदिवासी, स्त्री ही फुल्यांना दिसत होती. आणि जी आमची महान संस्कृती म्हणतो आम्ही. ज्या रोज आरत्या म्हणतो आम्ही की- भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत. कन्हाडमध्ये आमचं कुणी नाही.

आमच्या औरंगाबाद शहरामध्ये जातीय दंगली मोठ्या स्वरूपात होऊ लागलेल्या आहेत. मागच्या वर्षी झालेल्या दंगलीत आमच्याकडे शेकडो माणसे मेली. संचारबंदी उठल्यानंतर कॉलनी कॉलनीतील माणसं आपसात कुजबुजू लागायची. त्यात हिंदू होते. मुसलमान होते. हिंदू हिंदूंना विचारायचे ' दंगलीत आपली किती माणसं मेली 'म्हणून. मुस्लीम मुस्लिमांना विचारायचे ' अपने कितने लोग मर गये '

म्हणून. म्हणजे दंगलीत मरणारे हे लोक जिवंत होते तेव्हा यांचे कुणीच लागत नव्हते. मेल्यानंतर यांना शोध लागायचा ते आपल्या धर्मातील होते म्हणून. कोणत्याही जातीय दंगलीमध्ये फक्त गरीबच मरत असतात आणि गरीबांची गरीब हीच जात असते. गरीब हाच धर्म असतो. ही आमची पद्धत आहे. बोलायला काय जातं तुमचं माझं. पण कन्हाडमधल्या एकाद्या गरीब पोराला मदत करणं किंवा दलितांची झोपडी पेटली तर ती विझवायला धावून जाणं यासाठी जे मानसिक आणि सामाजिक धाडस लागतं ते आपल्यापैकी कितीजणाजवळ आहे.

जोतिराव फुल्यांनी अशा अनेक गोष्टी केल्या त्याची यादीही इतकी मोठी आहे. भारतातील पहिली मुलींची शाळा त्यांनी काढली, ती शाळा काढणारे पहिले भारतीय ते, आपल्या पत्नीला शिकवून तिला भारतातील पहिली स्त्री शिक्षिका केलं. बालहत्या प्रतिबंधक गृहातील परिचारिका म्हणून त्यांनी काम केलं. सावित्रीबाई फुल्यांना एकदा जोतिराव फुल्यांनी विचारलं की " शाळा चालवायला तुला काही अडचण येते काय ! " त्यांनी सांगीतल की, अडचण येते. भिडे यांच्या वाड्यात शाळा घ्यायला जाते तेव्हा पुण्याचे विशिष्ट लोक त्यांना कॉमेंटस् करायचे, शेण फेकून मारायचे. त्यांनी सांगीतलं, त्यासाठी मला आणखी एक लुगडं पाहिजे. शाळेत जाऊन मी ते लुगडं बदलीन व मग मी मुलींच्या शाळेतील वर्ग घेईन.

आज आमच्या महाविद्यालयाच्यामध्ये, शाळांच्यामध्ये हजारो मुली शिकत आहेत. मी माझ्या विद्यार्थिनींना विचारतो नेहमी की, मुलीनो तुम्हाला सावित्रीबाई फुल्यांचे नांव माहिती आहे काय ? मुली म्हणतात, त्या कवयित्री होत्या. मग मी विचारतो तुम्हाला जया भादुरी-जयाप्रदाचं नाव माहिती आहे काय ? त्या हो म्हणतात. त्या आमच्या बहिणी आहेत. आणि मेहुणा अमिताभ बच्चन ! महात्मा फुले माहीत नाहीत पण निळू फुले माहीत आहेत. माहींत असायला माझा विरोध नाही. आमचं शिक्षण पांढरपेशी वृत्तीतून आम्ही बाहेर काढलेलं नाही. चातुर्वर्णीय प्रेरित अशा मुशीतच त्याला अजून ठेवलेलं आहे.

जे कुणी शिक्षक आहेत त्यांचंच प्रबोधन होण्याची गरज आहे. जे कोणी लेखक आहेत त्यांचंही प्रबोधन होण्याची फार गरज आहे. पण आमच्याकडे असे विद्वान आहेत की ते समाजासाठी लिहित नाहीत. दुसऱ्या विद्वानाला कळावं म्हणून लिहितात. तेवढं अवघड लिहितात. सोपं लिहीत नाहीत. सोपं लिहिलं तर विचारवंत कसले ! मी जरा अवघड बोललो तर तुम्ही म्हणाल ? काय बा. ह. कल्याणकर बोलले ! बघा स्टँडर्ड बोलले ! दुसरा म्हणेल 'स्टँडर्ड बोलले पण काय बोलले ते कळलं नाही ' तिसरा म्हणेल, ' कसं कळेल ते विचारवंत आहेत. तो असा बोलला पाहिजे की, आकाशातून बोलला पाहिजे. की एका विद्वानाने दुसऱ्या विद्वानास कळावे असे बोलायचे. जीवनाच्या अज्ञानाचाच हा अवघडपणा परिणाम होय.

जोतिराव फुल्यांना या स्कॉलरशिपची हाव नव्हती. सबंध समाजाला कळलं पाहिजे म्हणून ते सगळे दुःख समाजाच्या भाषेत मांडत होते. तुम्ही त्याला कलात्मक मूल्ये लावा, लावू नका. त्यामुळं काही आडलं नाही. समाजाची समग्र पुनर्रचना झाली पाहिजे. समाज हा अंधश्रद्धेतून बाहेर पडला पाहिजे. त्याच्या पायातील रूढीचे साप संपले पाहिजेत. त्याच्या व्यक्तिमत्वाभोवती रूढीच्या वाईट चालीरीतीच्या ज्या बेड्या आहेत त्या तुटल्या पाहिजेत. आणि एक मुक्त माणूस, एक सुंदर माणूस, एक नवा माणूस स्वतःच्या कर्तृत्वावर, स्वतःच्या पायावर, स्वतःच्या विवेक बुद्धीवर जगणारा एक छान माणूस निर्माण झाला पाहिजे. अशा समाजाचं एक सुंदर चित्र त्यांच्या डोक्यामध्ये होतं. ते मी मघाशी तुम्हाला सांगितलं.

जे जे गरजू आहेत त्यांना मदत मिळायला हवी. समाजाची गरज त्यांनी ओळखली. मी म्हणालो तत्त्ववेत्ता असो, लेखक असो, कवी असो. कोणीही असो त्यांना समाजाची गरज कळली पाहिजे. त्यांच्यावर दुसरा एक आरोप होता की ते ख्रिश्चन धार्जिणे होते, ते मुस्लिम धार्जिणे होते. त्याचे उत्तर नवाकाळचे संपादक नीळकंठराव खाडिलकर यांनी फार छान दिलेलं आहे. खाडिलकरांनी सांगितलं की, जेव्हा जोतिराव फुले ख्रिश्चन धर्म चांगला म्हणायचे, मुस्लीम धर्म चांगला म्हणायचे याचे कारण तो चर्चेस सर्वांना खुला होता, मोकळा होता.

इथं तसं नाही, इथं वेदाचा शब्द ऐकला की, कानामध्ये तुम्ही तप्त शिसे ओतता. ब्राह्मण स्त्रीचा एका शूद्र माणसाशी विवाह झाल्याबरोबर तुम्ही त्यांच्या मुलाला चांडाळ म्हणता, डोंब म्हणता. मग तुमच्यापेक्षा तो धर्म चांगला आहे. वघा एवढंच फुले म्हणाले. नीळकंठरावांनी सांगीतलं, आई काय म्हणते ! आपल्या मुलाला रागावतांना, अरे तू कसला वेडा, हे बघ, शेजारचा रमेश कसा अभ्यास करतो. याचा अर्थ रमेशची ती बाजू घेते असा नाही. त्याचं जे चांगलं आहे ते आपल्या मुलाला यावं म्हणून ती बोलते. फार छान उत्तर दिलंय त्यांनी ? पण आमची मंडळी म्हणाली, ते ख्रिश्चन धार्जिणे होते, ते मुस्लिम धार्जिणे होते, ते इंग्रज धार्जिणे होते. जोतिराव फुल्यांनी सांगीतलं, हे इंग्रज आज आहेत, उद्या जातील. पण या भटांच्या पासून दास्य मुक्तीसाठी तुम्ही इंग्रजी राजवटीतील फायदे घ्या, पण कायद्याचं राज्य ज्या इंग्रजांचं आहे तिथंच तुमचा फायदा होईल, लवकर मुक्त व्हा.

माधवराव बागलांचं ' महाराष्ट्राचे शिल्पकार ' नावाचं जे पुस्तक आहे त्याच्यामध्ये माधवराव बागलांनी टिळकांबद्दल असं लिहिलंय की, टिळक आजारी पडले आणि जर्जरावस्थेत जेव्हा ते होते तेव्हा ते त्यांच्या मित्राला असे म्हणाले. हा माधवराव बागलांचा विचार ! मोठ्या माणसाचे नांव घेऊन सांगितले म्हणजे माझ्यासारख्या लहान माणसाचे काम सोपे होते. खरा विचार सांगतो. त्यांनी सांगीतला-मांडला म्हणून मी सांगतो तुम्हाला. टिळक असे म्हणाले, " खरंच

पेशवाई पुन्हा येईल कां हो ! " राष्ट्रवादाच्या प्रेरणा कोणत्या, कुणासाठी तुम्हाला स्वराज्य पाहिजे होतं. कुणासाठी तुम्हाला स्वातंत्र्य पाहिजे होतं ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगायचे, इंग्रजांच्या हातून राज्य या देशातल्या मूठभर लोकांच्या हातात जात असेल तर ते स्वराज्य आम्हाला नको आहे. असं स्वराज्य आम्हाला पाहिजे आहे की, या देशातल्या प्रत्येक माणसाला वाटले पाहिजे की, माझं राज्य आहे. म्हणून राष्ट्रवादी चळवळीपासून फटकून ही दोन्ही माणसं वागली. वर्ण संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणाऱ्या माणसापासून ती फटकून वागत होती. काँग्रेस संस्कृतीपासून सुद्धा फुले फटकून होते. जेव्हा काँग्रेसचे अधिवेशन झाले तेव्हा फुल्यांनी त्या शामियान्यासमोर, मंडपासमोर मोठा असा शेतकऱ्याचा पुतळा उभा केला. त्याची अवस्था वर्णन करून सांगितली की, तुमच्या काँग्रेसमध्ये हा जर माणूस नसेल तर काँग्रेस पाहिजे कशाला ? हा सवाल विचारला.

ज्यांना संस्कृतीपासून तोडलेलं आहे., पण ज्याने संस्कृती निर्माण केली. कोणत्याही समाजाची संस्कृती लोक निर्माण करतात. यावर जोतिरावांचा विश्वास होता. आणि मग ते सतत बाजू घेतात शेतकऱ्यांची, विधवांची, परित्यक्तांची. बाल विवाह थांबले पाहिजेत म्हणून सांगतात. विधवा विवाह स्वतः लावून देतात. नुसते व्यासपीठावर बोलत नाहीत आमच्यासारखे ते. म्हणजे जोतिराव फुल्यांनी स्त्रियांची शाळा काढली, अस्पृश्य मुलांची शाळा काढली, विधवा विवाह लावून दिले, बाल विवाह थांबले पाहिजेत म्हणून चळवळी केल्या, लोकांना जागविण्यासाठी पुस्तके लिहिली. लोक जागृती (जागरण) हा त्यांचा हेतू होता. जोतिरावांनी ' दीनबंधू ' हे वर्तमानपत्र काढलं, मुंबईला लोखंडे या मित्राच्या मदतीने कामगार संघटना काढली. ब्राह्मण विधवांचे केस तुम्ही कापू नका (वपन करू नका) म्हणून नाभिकांचा संप घडवून आणला.

जोतिराव फुल्यांचे ब्राह्मण समाजावर फार मोठे उपकार आहेत. त्यांना मराठ्यांनी कधी समजून घेतलं नाही. ज्या पुरोहितशाहीला त्यांनी सुरुंग लावला त्यामुळे ब्राह्मणांचा फायदा झाला. पुरोहितशाही काय होती, गरीब ब्राह्मणं होती बिचारी, भिक्षुकीचा धंदा करायचा, जे कांही मिळेल त्यावर उदरनिर्वाह चालवायचा. वाईट अवस्था होती त्यांचीसुद्धा. जोतिराव फुल्यांचा जेव्हा हल्ला झाला तेव्हा तो समाजसुद्धा विचार करू लागला. ब्राह्मण परिषदा होऊ लागल्या.

जोतिराव फुले यांनी ' सत्यशोधक समाज ' काढला चिपळूणकरांनी १८८८ ला ब्राह्मणसभा काढून जातीय संघटना काढण्याचं विष पेरलं. त्यांनी आपली आत्मटीका सुरू केली. त्यांना पटलं ही पुरोहितशाही म्हणजे काय आहे. आज आहे उद्या नाही. चला आता जीवनाच्या नव्या नव्या क्षेत्रामध्ये पडू. म्हणून ब्राह्मण समाजाचं प्रबोधन त्यांनी सुरू केलं, ब्राह्मण समाज विचार करू लागला. ब्राह्मण

समाजाचं एक अतिशय महत्त्वाचं वैशिष्ट्य असं आहे. तो समाज परिवर्तनाचं नवं वारं चटकन ओळखतो. आणि परिवर्तनाच्या सबंध चळवळीबरोबर तो एकदम बदलून घेतो. स्वतःला तो Renew करून घेतो. इतर समाजाला हलवावे लागते.

ज्या ब्राह्मण समाजाने स्त्री शिक्षणाला विरोध केला. त्याच ब्राह्मण समाजाच्या मुलींचं प्रमाण आज शिक्षणात जास्त आहे. ब्राह्मण समाजातल्या स्त्रियाच आज नौकरीमध्ये जास्त आहेत. आकडेवारी काढा. परदेश गमन म्हणजे पाप असे म्हणणारा ब्राह्मण समाज, परदेशात तेच आज जास्त आहेत. जो समाज बदलतो तो पुढे जातो. पाश्चात्य संस्कृती इथं आली. पाश्चात्य संस्कृतीच्या ज्ञानाचं वारं इथं आलं. आणि त्यामुळं आमचं खोटं ज्ञान, फसवणुकीचं ज्ञान, लबाडीचं ज्ञान उघडं पडलं. जोतिराव फुल्यांनी अतिशय महत्वाच काम जर कोणतं केलं असेल तर या सगळ्या खोटेपणाला उघडं पाडलं, लबाड्या उघड्या पाडल्या. आणि आता लबाड्या करू नका. फार काळ चालणार नाही. आता आम्हाला कळलेलं आहे.

" देव झाले उदंड । पेवाचे मांडिले भंड ।।
भूता देवांचे थोतांड । एकची जाहले ।।
मुख्य देव तो कळेना । कशाचं काहीच मिळेना ।।
एकास एक वळेना । अनावर ।।
ऐसा नासला विचार । कोण पाहतो सारासार ।।
कैचा लहान कैचा थोर । कळेचिना ।।
शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला झाला ।।
लोक कामनेच्या व्रताला ।। झोंबोन पडती ।।
ऐसे अवघे नासले । सत्यासत्य हारपले ।।
अवघे जना एक झाले । चहुंकडे ।।
मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।।
जो जे मती सांपडला । तयासी तोची थोर ।।
असत्याचा अभिमान । तेणें पावीजे पतन ।।
म्हणोनिया ज्ञाते जन । सत्य शोधिती ।।"

ब्राह्मण समाज आपल्या मखरातून उतरून आमचं कांही भलं करील असं वाटत नाही. आता आमचं कल्याण आम्हीच केलं पाहिजे. जोतिराव फुले उच्चवर्णीय समाजाला आम्हाला प्रतिष्ठा द्या अशी भीक मागत नाहीत, त्यांना व्यवस्थेमध्ये स्थान मागायचं नाही. तर व्यवस्थाच बदलायची आहे. कर्णाचा विद्रोह आहे ना ! पण दुर्योधनाने राजा केला की तो त्याच्या बाजूने गेलाच की नाही. त्याला व्यवस्थेमध्ये वाटा पाहिजे होता. जोतिराव फुले कर्ण नव्हते जोतिराव फुल्यांचा विद्रोह नव्या समाजाच्या रचनेसाठी होता. गुलामगिरी मधून

त्यांनी व्यवस्थेवर तोफा डागल्या, सुरुंग पेरले. माणूसपणाची हत्या करून चालणारी तुमची संस्कृती यापुढे आम्ही चालू देणार नाही, अशा प्रकारचा प्रचंड आग्रह धरला. बुद्धीवादाचा आधार दिला सबंध चळवळीला. प्रत्येक प्रश्नांशी खोलवर जाऊन-मुळात जाऊन विचार मांडला आणि प्रत्यक्ष कृतीवर त्यांनी भर दिला. नाभिकांचा संप असेल, दीनबंधू वर्तमानपत्राचं प्रकाशन असेल, विधवा विवाह लावून देणं असेल, बालहत्त्या प्रतिबंधक गृह काढणं असेल, आणि जे जे चांगलं आहे ते ते आपण स्वीकारलं पाहिजे. हा जो विचार असेल त्यांच्याजवळ मिशन होती. म्हणूनच ते रिबेलियन होऊ शकले. यातूनच क्रूसेडर निर्माण होऊ शकतो. म्हणून त्यांच्या कामाची यादी जर आपण पाहिली की त्यांच्या विचारामध्ये, कृतीमध्ये एक सातत्य आहे. इंग्रजालासुद्धा ते म्हणतात की, तुमच्या राजवटीमध्ये जो धुमाकूळ चालू आहे, जे शेतकऱ्यांचे, सामान्य माणसाचे शोषण चालू आहे, ज्यांच्या फंडातून-घरांतून तुम्ही जो शिक्षण कर जमा करता तो त्यांच्या मुलापर्यंत तुम्ही शिक्षण नेत नाही.

"...या बाबतीत जो अनवस्था प्रसंग ओढवलेला आहे, त्याचा काही तरी दोष सरकारच्या पदरी बांधता येईल, अशी वस्तुस्थिती आहे. उच्च शिक्षणार्थ पैशाची आणि सवलतींची खैरात करण्यात आणि सामान्य जनतेच्या शिक्षणाची आबाळ करण्यात सरकारचे जे काय हेतू असतील ते असोत; पण सामान्य जनतेचे न्याय्य हित साध्य करण्याच्या दृष्टीने तसे करणे अनिष्ट आहे, असेच कोणीही म्हणेल. हिंदी साम्राज्याच्या महसुलापैकी फार मोठा हिस्सा धाम गाळणाऱ्या श्रमिक रयतेच्या कष्टामधून उभा राहात असतो, ही गोष्ट सर्वमान्य आहे. एक माहितगार इंग्रज लेखक म्हणतो, "आमचे उत्पन्न शिलकी नफ्यातून येत नाहीं, ते येते मूळ भांडवलातून. ते चैनीच्या वस्तूवरील करांतून. हे उत्पन्न पापाचे आणि अश्रूंचे फळ आहे."

अशा रीतीने मिळविलेल्या उत्पन्नापैकी फारच मोठा हिस्सा सरकार वरिष्ठ वर्गीयांच्या-कारण आज तरी हेच वर्ग त्याचा लाभ उठवीत आहेत, शिक्षणावर मुक्त हस्ताने उधळीत आहे. ही गोष्ट न्यायाला आणि समदृष्टीला धरून नाही. केवळ वरिष्ठ वर्गीयाच्या शिक्षणास उत्तेजन देण्यास सरकारचा हेतू पाहू लागल्यास असा दिसतो की, त्यांच्यांतून जे विद्वान शिकून तयार होतील, ते धनाची अपेक्षा न करता अल्पावधीतच शिक्षण प्रसारास वाहून घेतील, अशी सरकारची कल्पना आहे. "आपण जर वरिष्ठ वर्गीयांत ज्ञानार्जनाची प्रेरणा उत्पन्न केली, तर त्यांची व्यक्तिगत नैतिक पातळी उंचावेल, त्यांच्यात ब्रिटीश सरकारविषयी प्रेमादराची भावना फार मोठ्या प्रमाणावर वाढीस लागेल आणि स्वतःला लाभलेले बुद्धिमत्तेचे वरदान आपल्या देशबांधवा-

मध्ये फैलावावे, अशी अदम्य प्रेरणा त्यांच्या ठायी उप्पन्न होईल, असा या बाबतीत त्यांचा दावा आहे."

सरकारने बाळगलेल्या या हेतूविषयी उपरोल्लेखित लेखकाने पुढे म्हटले आहे, "याहून उदात्त, याहून लोककल्याणकारी आणि याहून आदर्शवादी पण स्वप्नाळू वृत्तीचे तत्त्वज्ञान आपल्या तरी ऐकिवात नाही. फक्त उच्च वर्गीयांच्या पदरी शिक्षणाचे सारेच्या सारे फायदे टाकून वीस कोटी हिंदी प्रजेचे न्यून पूर्ण करू पाहणारी ही मंडळी दुसरी तिसरी कोणी नाही; केवळ सार्वत्रिक शिक्षणाच्या बळावर पश्चिमी जगतात केवढी अद्‌भुत क्रांती घडवून आणता आलेली आहे, हे ज्यांनी चक्षुर्वेसत्य पाहिलेले आहे, अशी ही मंडळी आहे.

हिंदी विद्यापीठांच्या पाठीराख्यांना आमचा सवाल आहे की, आजवरच्या आपल्या अनुभवाच्या शिदोरीतून आपल्या सिद्धांताची सत्यता पटविणारे एक तरी उदाहरण त्यांनी पुराव्यादाखल पुढे मांडावे. श्रीमंतांच्या कित्येक मुलांना त्यांनी सुशिक्षित केले आहे. आणि कांही विद्यार्थ्यांना तर उदंड ऐहिक कल्याण करून घेण्याची साधने उपलब्ध करून दिली आहेत पण त्यांनी आपल्या देशबांधवांच्या उद्धाराच्या महान कार्यासाठी कितीसा हातभार लावला आहे ? सर्वसाधारण जनतेच्या स्थितीत फेर पाडतील, असे कोणते उपक्रम त्यांनी हाती घेतले आहेत ? आपल्या अभागी आणि अज्ञानी बांधवांच्या शिक्षणासाठीं त्यांनी स्वतःच्या घरी किंवा अन्यत्र शिक्षणवर्ग सुरू केले आहेत काय ? की त्यांनी स्वतःला मिळालेले ज्ञान' अडाणी गांवढळांच्या संसर्गाने मलिन होऊ नये, म्हणून त्याला स्वतःची खाजगी देणगी समजून, आपले आपल्याजवळ राखून ठेविले आहे ? सर्वसामान्य जनतेची उन्नती साधावी आणि वरील औदार्याची देशभक्तीने परतफेड करावी, अशा प्रकारची आस्था आपल्या ठायी आहे, याची थोडीतरी लक्षणे, कोणत्या तरी प्रकारे त्यांनी दाखविली आहेत काय ? मग जनतेच्या नैतिक आणि बौद्धिक कल्याणाची प्रगती साधण्यासाठी वरिष्ठ वर्गीयांची शैक्षणिक पातळी वाढली पाहिजे, असा दावा कशाच्या जोरावर केला जातो. ?

वरिष्ठ वर्गीयांच्या बाजूने केला जाणारा हा दावा वस्तुस्थितीवर टिकता, तर सोन्याहून पिवळे होते. मग 'राष्ट्रीय कल्याणाची' वृद्धी झालेली आहे वा नाही, हे दर्शविण्यासाठी नुसती महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या आणि विद्यापीठीय पदव्यांच्या याद्या पुढे केल्या असत्या, तरी काम भागले असते. मग प्रत्येक रेंगलरची गणना राष्ट्रहितैषी पुरुषात झाली असती, जंगलातील शिकारी संबंधीचे कायदे आणि दहा पौंड कर भरणारास मतदानाचा मिळालेला हक्क, यांचा संबंध राज्यघटनेच्या कल्याणकारकतेशी जसा जोडण्यात येतो, तद्वत डीन आणि प्रॉक्टर या पदांच्या नेमणुकीचा संबंध देशहिताशी जोडतां आला असता."

हा तुमचा सारा जो पैसा आहे तो सामान्य माणसाच्या अश्रूंच, घामाचं फळ आहे. जोतिराव फुल्यांचा हा विचार आहे. इंग्रजांना सुद्धा त्यांनी मोकळं सोडलेलं नाही. पण पुरोहितशाहीच्या जागी नवशिक्षित ब्राह्मणांचीच नोकरशाही जेव्हा आली. दोन्हीही व्यवस्थेचं उद्दिष्ट काय होत 'शोषण' शेतकऱ्यांच्याकडून पैसे घेतले जायचे. त्यांची पिळवणूक केली जायची. म्हणजे पुरोहितशाहीच रूपांतर भारतीय नोकरशाहीत झालं. इंग्रज आल्यानतर तर ते दुहेरी पातळीवर शोषण चालू राहिलं. म्हणून जोतिराव फुल्यांनी या दोन्ही व्यवस्थेला विरोध केलेला आहे. आणि म्हणून पेशवाईच्या अस्तानंतर एकदर देशात जे नवजीवनांचं वारं वाहू लागलं त्या नवजीवनाच्या चळवळीशी जोतिराव फुल्यांनी आपला सबंध ठेवला.

त्यावेळी महाराष्ट्रामध्ये किती चळवळी चालू आहेत ते बघा. जोतिराव फुले चळवळ चालवतात आगरकर चळवळ चालवतात. ती कुठली चळवळ आहे. नवभारताची चळवळ आहे. टिळक आणि चिपळूणकर जी चळवळ चालवतात ती कुठली चळवळ आहे. ती पुनरुज्जीवनाची चळवळ आहे. महादेव गोविंद रानडे भांडारकर वगैरे जी चळवळ चालवितात ती उदारमतवादी चळवळ आहे. धर्म-सुधारणा झाली पाहिजे, समाज सुधारणा झाली पाहिजे, पण फुले म्हणाले नाही. सगळी व्यवस्थाच बदलली पाहिजे. उदारमतवाद नाही. जोतिराव फुले उदारमत-वादाच्याकडून, सुधारणावादाच्याकडून ते क्रांतीवादापर्यंत गेले.

ते क्रांतीकारी होते की नाही, परत चर्चेचा विषय. कारण दक्षिण अमेरिकेचा शिक्षण तज्ञ 'पावलो फ्रिअरी' असं म्हणाला "Education is a political action" अतिशय चांगला विचार मांडला पावलो फ्रिअरीनी. उद्याच्या भारतीय समाजाची रचना कशी पाहिजे तर ती ज्ञानावर अधिष्ठित पाहिजे. तळागाळातल्या माणसापर्यंत ज्ञान जर गेलं नाही तर तो पॉलिटिक्स करणारच नाही. Education is a Political action. अमेरिकेचा शिक्षण तज्ञ जॉन डघुई म्हणाला 'Thinking is Problem solving' विचार करणं म्हणजे प्रश्न सोडविणं 'Education is a Promotion' बढती मिळेल पुढे जा ! यशवंतराव चव्हाण काय म्हणाले आमच्या देवगिरी व्याख्यानमालेत येवून 'शिक्षणानं माणूस नवीन होतो' यशवंतराव अधून मधून मजबूत विचार बोलायचे, सोप्या शब्दांत बोलायचे शिक्षणाने माणूस नवीन होतो. ताजा टवटवीत प्रसन्न होतो. सावित्रीबाई फुल्यांनी काय म्हटलेलं आहे. त्यांनी आपल्या कवितेमध्ये फार चांगला विचार मांडलेला आहे –

" माझ्या जीवनात जोतीबा स्वानंद । जैसा मकरंद कळीतला ॥
विषम रचती समाजाची रीती । धूर्तांची ही नीती अमानव ॥

शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा ।
शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा ।।
विद्येविण गेले वाया गेले पशू । स्वस्थ नका बसू विद्या घेणे ।।
शूद्र अतिशूद्र दुःख निवाराया । इंग्रजी शिकाया संधी आली ।।
इंग्रजी शिकूनी जातीभेद मोडा । भटजी भारुडा फेकूनिया ।।
जोतीबाचा बोल मनात परसा । जीवाचा आरसा पहाते मी ।।
वाचे जे उच्चारी तैसा क्रिया करी । तीच नर-नारी पूजनीय ।।
मानवाचे नाते ओळखती जे ते । सावित्री वदती तेच संत ।।

– सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई वदती, मी तुम्हाला यासाठीच त्या कवितेचा उतारा वाचून दाखविला. बी. एड्. होणाऱ्या आमच्या शिक्षकाला ही ब्याख्या माहित नाही. " शूद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा ।। शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हटते पहा ।। जॉन डचुईची ब्याख्या माहित असेल, पॉवलो फ्रिअरीची ब्याख्या माहित असेल, पण गाडगे महाराजांची ब्याख्या मात्र आमच्या बी. एड्. च्या माणसाला माहित नाही. गाडगे महाराज काय म्हणाले- " शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ धोंडा " सोपं बोलले, विचारवंत नव्हते. ' शिक्षणाशिवाय माणूस म्हणजे निव्वळ धोंडां ' हे समजलं महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातल्या सामान्य माणसांना. भाषाप्रभू नव्हते ते, तरी लाखो माणसांना तीन तीन तास आपल्या किर्तनामध्ये ते रंगून ठेवायचे. आणि त्यातून समाजप्रबोधनाचा विचार त्यांच्या डोक्यामध्ये पेरायचा.

हे गाडगे महाराज आम्हा कुणाला भाषाप्रभू वाटले नाहीत. ज्यांनी स्त्रियांना त्यांच्या दास्यातून मुक्त केले, स्पृश्य-अस्पृश्य समाजाला शिक्षणाची गंगा त्यांच्या झोपडीपर्यंत पोहोचविली ते जोतिराव फुलें आम्हाला क्रांतीकारी वाटले नाहीत. आणि म्हणून आम्हाला या सबंध चळवळीचा विचार करतांना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. इंग्रज आल्यानंतर आमच्या देशांत जे नव्या बदलाचं वातावरण निर्माण झालं, नवीन महाराष्ट्राची, नवीन भारताची मागणी जोतिराव फुल्यांसारखी माणसं मांडू लागली. आणि त्यातून नवीन जीवन आकाराला आलं पाहिजे हा जो विचार पुढं आला, त्यात जोतिराव फुले या सबंध समाजक्रांतीच्या चळवळीचे सेनापती होते. त्यांनी सबंध समाजाला धक्का दिला.

माणूसपणाला तुम्ही नाकारता आहांत तुम्ही माणसाला प्रतिष्ठा दिली पाहिजे. आमच्या सर्वसामान्य माणसाला माणूसपणाचे तुम्ही अधिकार दिले पाहिजेत. एवढ्यासाठी त्यांनी फार मोठी आंदोलने केली. ती वैचारिक आंदोलने होती. आणि वैचारिक आंदोलने करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, सत्यशोधक समाजाचा पाया सत्यवर्तन होता. सदाचार, सदसत् विवेकबुद्धी होती. आणि माणूस

येथून तेथून समान आहे हे सूत्र होतं. माणूस एक आहे म्हणून धर्म अनेक कशाला? माणसांचा एकच धर्म पाहिजे आणि तो सत्यवचनी सत्यधर्म. जीवनातील महान सत्याचा शोध, जीवनातील महान सुंदरतेचा शोध, जीवनातील असत्याचा तिरस्कार.

जोतिराव फुल्यांच्या विचारांचं फार मोठं सामर्थ्य आहे. आणि त्यांनी सांगीतलेलं " पशू पक्ष्यांमध्ये जाती आहेत काय?" जोतिराव फुले म्हणाले 'नाही! मग माणसामध्ये जाती असण्याचं कारण नाही. माणसामध्ये असल्याच जाती तर दोन. एक स्त्री आणि एक पुरुष, आणि या दोहोमध्ये जर श्रेष्ठ कोण असेल तर स्त्री! कारण माणूस तिच्यातून येतो. जगातील महान तत्त्ववेत्ते आपण पाहिले. ज्या आईच्या उदरातून आम्ही येतो. नऊ महिने नऊ दिवस त्या पोटात राहतो. ती आम्हाला वाढविते ती आम्हाला घडविते. ती आम्हाला भाषा देते. आम्ही तिला मातृभाषा म्हणतो. त्या आईला आमच्य संस्कृतीने शूद्र केले. तिला जीवनाचे सगळे सुंदर अधिकार नाकारले. म्हणून जोतिराव फुले म्हणायचे ' पुरुष शिकला, ऑफिसमधला शहाणा झाला, स्त्री शिकली तर कुटुंब सुबुद्ध ' आणि समाज म्हणजे असतोच काय? ' अनेक कुटुंबांचं सुंदर संघटन म्हणजे समाज ' जोतिराव फुल्यांनी व्यक्तीच्या पातळीवर, कुटुंबाच्या पातळीवर, माणसाच्या पातळीवर शिक्षणाचा संबंध आणला.

ते समाजिक-सांस्कृतिक विचार करतात. ॲक्शन करतात. जीवन'संबंधी सत्त्याचं महान ज्ञान त्यांना झालेलं होतं. ज्या माणसाला हे महान ज्ञान होते तोच माणूस समाजामध्ये क्रांतीकारी बदल घडवून आणू शकतो. कॉर्लमार्क्स यांनी एका ठिकाणी म्हटलंय ' प्रत्येक गोष्टीबद्दल शंका घ्या ' जोतिराव फुल्यांनी आमच्या समाज-व्यवस्थेमधल्या प्रत्येक गोष्टीबद्दल शंका घेतलेली आहे. परशुराम आहे काय? वराह अवतार काय आहे, पोथ्या काय आहेत, वेद काय आहेत, ते अपौरुष आहेत काय? शंका! म्हणून भारतीय समाजाच्या पुनर्रचनेचं नवं ज्ञान ते मांडू शकले.

त्यांच्या स्त्री शिक्षणाच्या चळवळीचा विचार करतांना मला लेनिनचं वाक्य आठवलं लेनिन आपल्याला माहित आहे. मार्क्सवादाच्या सुंदर बिया त्याने आपल्या रशियाच्या मातीत पेरल्या आणि ज्ञानावर जगणारा सुसंपन्न अशा संस्कृतीवर जगणारा आज एक महान रशियन समाज निर्माण केला. तो लेनिन म्हणतो-"तुमची समाजपरिवर्तनाची चळवळ यशस्वी झाली किंवा नाही याचा निकष काय? आणि त्याचं उत्तर देतो ' तुमच्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीमध्ये किती स्त्रिया सहभागी झालेल्या आहेत त्यांच्यावर ते यश अवलंबून आहे. मला फक्त दलित चळवळ ही एकच चळवळ दिसते. या चळवळीमध्ये दलित पुरुषांच्या बरोबर नव्हेच पुरुषांच्या पेक्षा जास्त चढाओढीनं दलित स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला चळवळीचं स्वरूप आलं आहे. खालच्या तळातल्या समाजाचं वैचारिक अभिसरण चालू आहे ते मी उद्या सांगणार आहे.

माझ्या एका मित्राशी बोलतांना विषय असा निघाला की, गांधी जयंतीचा शिवजयंतीचा विषय निघाला. तो म्हणाला, परिपत्रक काढून जयंत्या साजऱ्या होतात. या जयंत्या साजऱ्या करण्यासाठी आम्हाला परिपत्रके काढावी लागतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एकच जयंती अशी आहे की, जगामधल्या अनेक महान पुरुषांमध्ये सर्वात मोठी कोणती जयंती असेल तर ती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची आहे. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरु आहेत जोतिराव फुले आणि कबीर. हा समाज राजर्षी शाहू महाराज विसरू शकला नाही. आमच्या स्त्रिया जोतिराव फुल्यांना विसरू शकत नाहीत. प्रबोधनकार ठाकऱ्यांचं - बाळ ठाकऱ्यांचं नाही- ' माझी जीवन गाथा ' पुस्तक वाचा तुम्हाला त्या काळच्या समाजाचं वर्णन कळेल.

त्यावेळच्या आमच्या स्त्रियांना साधी पायात वहाण घालून फिरायला सुद्धा मुभा नव्हती. हे जेव्हा वाचलं तेव्हा माझ्या गोगदरी गावातल्या पाराच्या समोरून जाणाऱ्या आमच्या शेतकरी बायका मला आठवतात. पाटील लोक पारावर बसलेले असायचे आणि बायका नदीवर धुणं धुवायला निघायच्या. मंडळी बसलेली, पायात चपला घालून त्यांच्या समोरून जायचं नाही. म्हणजे पारासमोरून जायच्यावेळी तेवढ्या वाहणा (चपला) हातात धरून जायच्या. ते अंतर संपलं की परत वाहणा घालायच्या. वाहणा घालणे हे रांडेचं लक्षण आहे असं उच्चवर्ग समजायचा. स्त्रीपात्र करायला सुद्धा स्त्रिया मिळायच्या नाहीत त्याकाळी. आता काळ बदलला. का बदलला ? महात्मा फुल्यांच्या चळवळीचा हा सबंध रेटा, आंबेडकरी चळवळीचा हा सबंध रेटा. सर्वदूर महाराष्ट्रात पोहोचलेल्या दोनच चळवळी. एक सत्यशोधक समाजाची चळवळ आणि दुसरी आंबेडकरी चळवळ.

आपल्यासमोर हा विषय एवढ्या विस्ताराने मी मांडतो कारण सामान्य माणसाचं अंतःकरण ज्या चळवळीला आहे. ती चळवळ जगातल्या सर्व चळवळी-मधील महान चळवळ आहे. जिचा आधार सामान्य माणूस आहे. म्हणून जोतिराव फुल्यांना आपल्या सबंध समाजक्रांतीच्या चळवळीचं एक हत्यार दिसलं ते शिक्षण. तुमच्या समाजामध्ये बदल घडवून आणायचा असेल तर तुमच्या समाजापर्यंत ज्ञान पोहोचविलं पाहिजे, विज्ञान पोहोचविलं पाहिजे तर तुमचा समाज माणूसपणाच्या योग्यतेच्या पातळीपर्यंत येऊ शकेल. म्हणजे माणसाचं पशूपण संपून त्याच्यातला सुंदर-सुसंपन्न माणूस निर्माण होईल. असा सुंदर माणूस ज्याला मानवी जीवनातलं सुसंपन्न ज्ञान झालेलं आहे. मानवी जीवनामधल्या सुसंस्कृत ज्ञानाशी ज्याचा संबंध आलेला आहे असा एक चांगला माणूस निर्माण होईल. म्हणून जोतिराव फुल्यांनी या चळवळी केल्या. तडजोडी केल्या नाहीत. लेनिननेही एका ठिकाणी म्हटलंय ' जर तडजोडी चालूच राहिल्या तर त्या क्रांतीला खाऊन टाकतील.

चिपळूणकर लिहू लागले की जोतिराव फुल्यांची चळवळ काय हडपसर ते भांबुर्डापर्यंतची, ही काय चळवळ आहे काय ? आणि जोतिराव फुल्यांची भाषा काय गावंढळ आहे ? मराठीचे प्राध्यापक-समीक्षक, दलित आत्मकथनासंबंधी बोलतात तसे चिपळूणकर बोलायचे. ही आत्मकथा रांगडी आहे. कारण त्यांची आहे. रांगडी असणारच. जे जीवन त्यांच्या भाषेत आहे त्यात मांडणारच ते, हजारो माणसांना कळण्यासाठी सोपं लिहावं लागतं. मूठभर माणसासाठी लिहिणं हे ज्ञानाच्या परिवर्तन चळवळीचं गमक नाही. आज चिपळूणकर ह्यात पाहिजे होते. त्यांना कळलं असतं गांवढळ भाषेतून चालणारी चळवळ काय असते ती. चिपळूण-करांचा पुण्याच्या टिळकरोडवर न्यू इंग्लिश स्कूल समोर एक छोटा पुतळा आहे, महाराष्ट्रात एकमेवच आहे. जोतिराव फुल्यांचे पुतळे बघा तुम्ही. पण तरी राग किती आहे जोतिराव फुल्यांबद्दल.

मित्र हो, मला क्षमा करा. आम्हा शिकलेल्या माणसाला शहाणं करायची चळवळ आता उभी केली पाहिजे. यांच्यापेक्षा माझ्या गांवातील निरक्षर माणसं मला परवडतात. घामावर, कष्टावर जगणारी दलित स्त्री, दलित माणूस मला समजतो. पण डॉक्टर झाले, इंजिनिअर्स झाले. पण बनारस मधून काहीतरी गंगेच्या पाण्याच्या बाटल्या आल्यात म्हणून रांगेमध्ये विकत घ्यायला उभे राहिलेत. यांना मी ज्ञान मिळालेली माणसं म्हणत नाही. कोजागिरी पौर्णिमेचे दिवशी आम्ही शिकलेली माणसं या शिकलेल्या माणसामध्ये आता सगळे आहेत. ब्राह्मणाला शिव्या देत देत अनेक नवीन ब्राह्मण झाले आहेत. हा प्रश्न ब्राह्मणांना शिव्या देऊन सुटणारा नाही. ब्राह्मण्य ही एक प्रवृत्ती आहे. आणि ती प्रवृत्ती जवळच्या समाजाला लागते. म्हणजे जेव्हा इंग्रज आमच्या देशामध्ये आले तेव्हा ब्राह्मणसमाज थोडाफार शिकलेला होता. पोथ्या वाचायचा, मंत्र म्हणायचा, मंगलाष्टके म्हणायची हे सर्व संस्कृत होतं. ते लोकांना येत नव्हतं म्हणून ते कळत नव्हतं. आणि म्हणून तो ताबडतोब इंग्रजाला मिळाला.

त्या काळातल्या आमच्या ब्राह्मण लोकांचं पाश्चिमात्यकरण सुरू झालं. म्हणजे तो डायनिंग टेबलवर जेवू लागला. पाटावरचं जेवण संपलं, रामराम संपला, नमस्कार संपला-गुडमॉर्निंग आलं, गुड इव्हिनिंग आलं, वेस्टर्नलायझेशन आलं. आपली भाषा बोलणं अपमान वाटू लागला. गुड मार्निंग-गुड इव्हिनिंग म्हटलं की कल्चर चेंज वाढतो. त्यांच वेस्टर्नलायझेशन झालं आणि त्यांच्या जवळच्या ज्या जाती होत्या. मराठा, माळी, तत्संबंधी त्यांचं ब्राह्मणायझेशन झालं. आणि मग हा सगळा उच्चभ्रूवर्ग आता त्यांच्यात एकटा ब्राह्मण वर्ग नाही. सगळचा समाजातील शिकलेले लोक कोजागिरी पौर्णिमेचे दिवशी दूध गोळा करतात. गच्चीवर जातात चांगल दूध गोठवतात आटवतात. बरोबर रात्रीचे बारा वाजलेलें असतात. चंद्र-

डोक्यावर असतो. चंद्राचं प्रतिबिंब दुधात पडतं. तोपर्यंत वाट पाहतात आणि एकदा चंद्राचं प्रतिबिंब दुधात पडलं तर प्या. मी जेव्हा पाहतो हे, तेव्हा मला आठवतं की १९ जुलै १९६९ ला नील आर्मस्ट्रॉंग हा चंद्रावर पोहोचला, रशिया चंद्रावर पोहोचला. आम्ही भारतीय माणसं एवढी हुशार, कोजागिरीचा चंद्र आमच्या दुधात, दूध आमच्या पोटात, पोट आमचं खाटेवर मुक्काम पोष्ट औरंगाबाद आणि ' परत ' ठेविले अनंते तैसेची रहावे । चित्ती असू द्यावे समाधान ॥

मित्र हो, ही मानसिकता आहे. जोतिराव फुल्यांनी आमच्या समाजाच्या हाडामासाचा भाग झालेली ही जी रूढीशरण मानसिकता आहे, ती मानसिकताच बदलायची चळवळ उभी केली. ही मानसिकता बदलली पाहिजे. या माणसाच्या पायातील रूढीच्या बेड्या तोडल्या पाहिजेत. त्याला अंधश्रद्धेच्या चिखलातून वर उचललं पाहिजे आणि त्याला ज्ञानाच्या रस्त्यावर नेलं पाहिजे. अशा प्रकारची एक मानवकल्याणवर्धक चळवळ उभी केली आणि आमचा भारतीय समाजाचा परत परत जो राजकीय पाडाव झाला, परत परत जी आम्हाला राजकीय गुलामगिरी स्वीकारावी लागली त्याचं कारण आमच्या समाजात आलेली विषमता, आमच्या समाजात आलेलं अज्ञान, आमच्या समाजात आलेली रूढी-शरणवृत्ती, आमच्या समाजातल्या अंधःश्रद्धा, स्त्रीदास्य, निरक्षरता हे सबंध कॅन्सरसारखे रोग आमच्या भारतीय समाजाला आतून पोखरत होते आणि बाहेरून येणाऱ्या मूठभर आक्रमक डोळ्यांसमोर आमचा समाज राजकीय दृष्ट्या पुन्हा पुन्हा कोलमडत होता. पराभूत होत होता.

इतिहास बघा आपला, खैबर खिंडीतून आमच्याकडे कोण कोण आलेले आहेत· तुर्क आले, कुशाण आले, मोगल आले, लोदी आले, गझनी आले, घोरी आले, इराणी-तुराणी आले, पठाण आले. इकडून समुद्रमार्गाने पोर्तुगीज आले, इंग्रज आले, डच आले, फ्रेंच आले, आम्ही मात्र कुठे गेलो नाही. का? समुद्र पर्यटन पाप. गेलो नाही आम्ही. का ? ठेविले अनंते तैसेची रहावे इतकंच. तेहतीस कोटी इथंच, नीळकंठराव खाडिलकर म्हणाले की " चातुर्वर्ण्याला मी ब्राह्मणांची रोजगार हमी योजना म्हणतो " मी मोठ्या माणसाचा आधार देतो. या ब्राह्मणांच्या रोजगार हमी योजनेला जोतिराव फुले यांनी विरोध केला.

सामान्य माणसाला जीवनाची हमी नाही. मग तुम्हाला रोजगार हमी कशाला ? हा त्यांचा सवाल. तुम्ही भूदेव कशासाठी ? तर सर्वसामान्य माणसाला संस्कृत भाषा येत नाही म्हणून ! तुम्ही श्रेष्ठ कशासाठी ? तुम्हाला वेद वाचता येतात म्हणून ! आणि तो शूद्र अतिशूद्र का ? त्याला काहीच येत नाही म्हणून. जो तुमच्या अंगातलं रक्त होणाऱ्या अन्नाला निर्माण करतो, त्याला तुम्ही शूद्र म्हणता ? जी स्त्री तुमच्या समाजाला सभासद पुरविते तिला शूद्र म्हणून अवहेलना

करता ! तिची निंदा करता ! एकोणिसाव्या-विसाव्या शतकामध्ये मनुस्मृतीचे गोडवे गाता ? संपून गेलेल्या समाजव्यवस्थेला परत मांडायचा प्रयत्न करता ? आणि म्हणून जोतिराव फुल्यांच्यावर चिखलफेक करता ? जो महात्म्यांचा महात्मा शोभावा इतका माणूसपणाच्या बाबतीमधला उत्तुंग कीर्तिचा माणूस. तुम्ही तुमच्या जातीचं तक्त सोडायला आजही तयार नाही ? सर्व जातींना समानतेची वागणूक द्या म्हणणारा जोतिराव फुले त्यांच्यावर चिखलफेक आता चालणार नाही.

महाराष्ट्रात आता जोतिराव फुल्यांचा पुतळा उखडून टाकू म्हणणाराचे हात सामान्य माणसे वरच्यावर फेकून देतील. चालणार नाही. बदललं पाहिजे. नवा समाज येवू लागलेला आहे. गांव तिथं शाळा पोहोचलेली आहे, नवा तरुण निर्माण होत आहे. कृपा करून रथाची चाके मागे ओढू नका. घड्याळाचे काटे मागे सरकविण्याचा प्रयत्न करू नका. कोणाला शूद्र म्हणू नका. असा सांगणारा महात्मा आमच्या महाराष्ट्रात झाला, या देशात झाला. हा विचार नव्हता. नव्या माणूसपणासाठी लागणारं हे आमचं रक्त होतं. माणसाचं शरीर जिवंत राहण्यासाठी ताजं रक्त लागतं माणसाला. पण माणसाचं मन जिवंत राहण्यासाठी त्याला विचाराचं रक्त लागतं. त्याला अश्रूंची भाषा माहित पाहिजे. जोतिराव फुल्यांनी स्त्री शोषणाच्या दुःखाचा दर्या आपल्या अक्षरातून, आपल्या शब्दातून, गुलामगिरी मधून तुमच्यासमोर आमच्यासमोर मांडला. दलित शोषित माणसाच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा - कैफियत त्यांनी आपल्यासमोर मांडली. जे शोषण करीत होते, त्यांच्यासाठी जोतिराव फुले लिहीत होतेच पण त्याचबरोबर ज्यांचं शोषण होत होतं त्यांच्यासाठी ज्यास्त लिहीत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे ' गुलामांना त्यांच्या गुलामीची जाणीव करून द्या. तो गुलाम बंड करून उठेल ' महान तत्त्ववेत्ता होमर म्हणाला 'गुलामी' म्हणजे काय ? अर्धा माणूस काढून घेणं. त्याच्यातला माणूस काढून घेणं. आमची संस्कृती काय होती ? त्याच्यातला माणूस काढून घ्यायचा, त्यांचं रक्त हिरावून घ्यायचं, त्याच्यातला बुद्धीवाद दडपून टाकायचा, त्याच्या सृजनशील क्रिया असतील त्या मारून टाकायच्या आणि मग आम्ही कसे शहाणे आहेत ते बघा. ही काय संस्कृती झाली ?

काय काय पद्धती होत्या आमच्यात ? स्त्रियांना शूद्र म्हणणारी आमची पद्धती ! अस्पृश्य माणूस शहरामध्ये कसा यायचा ! दुपारच्या वेळीच का ! सूर्य डोक्यावर असतो. सावली पायाखाली असते ! चार वाजता आला असता तर काय झालं असतं. सावली लांब पडते आणि सवर्ण माणसाच्या पडली अंगावर तर काय झालं असतं. ' विटाळ ' अस्पृश्य माणसानं रस्त्यावर कसं यायचं. कमरेला झाडू बांधून यायचं ! म्हणजे त्याच्या पावलाचे ठसे उमटलेले त्याच्या पाठीमागच्या झाडूनं पुसून

जावेत म्हणून ही जागरूकता ! सवर्ण माणसाचा पाय जर त्याच्या ठशावर पडला तर विटाळ होईल ! अस्पृश्य माणसाने रस्त्यावर थुंकता कामा नये. का ? त्या थुंकीवर सवर्णाचा पाय पडला तर विटाळ होईल. खुद्द एकनाथ सांगतात- महाराच्या पोराला कडेवर घेऊन पाणी पाजले त्याचे काय कौतुक ! पण एकनाथ काय म्हणाले-

" अंत्यजाचा विटाळ ज्यासी । गंगास्नाने शुद्धत्व त्यासी ।।
ते गंगास्नान अंत्यजासी । शुद्धत्वास अनुपयोगी ।। "

मराठी विभागात एकनाथ शिकविला जातो. अस्पृश्य माणसाचा स्पर्श झाला तर गंगास्नान करावं म्हणजे माणूस शुद्ध होतो. पण अंत्यज (अस्पृश्य) म्हणाला मला शुद्ध व्हायचं आहे. गंगास्नान उपयोगी नाही. मित्र हो, ही सामाजिक आणिबाणी आहे. राजकीय आणिबाणीशी आम्ही मुकाबला केला. पण या देशामध्ये लादलेली मनुप्रणीत सामाजिक आणिबाणी आम्ही मोडू शकलो नाही. राजकीय स्वातंत्र्याचा फायदा झाला. पण सामाजिक आणि आर्थिक क्रांतीशिवाय लोकशाही अपेशी ठरते हे आता आम्हाला कळू लागलेलं आहे.

चाळीस ते बेचाळीस वर्षाच्या लोकशाहीचा अनुभव काय ? स्त्री म्हणजे भोगदासी वस्तू, ती पापी, ती कुलटा. म्हणून तिनं विधवा राहिलं पाहिजे. म्हणून तिनं सती गेलं पाहिजे. गुजराथमध्ये काय पद्धत होती. मुलगी जन्माला आली की, तिला घंगाळभर पाण्यामध्ये बुडवून मारलं जायचं, पापी ना ! पण आईला ते फार वाईट वाटू लागलं, निर्दयी वाटू लागलं. पण आपल्याकडे आयडियाच असली पाहिजे. आजचा हा माझा विषय वेगळा असल्यामुळे सगळी थिअरी मी सांगत नाही. आयडिया म्हणून आपणाला इंडिया हे नाव पडलं असं वाटतं मला. तर आईच्या स्तनाला विष लावायचे पण त्याच्या अगोदर एक प्रयोग केला. पाण्यात नका मारू म्हणाले, का ? पाणी म्हणजे अमंगलतेचं वाहक आहे. मग पाण्याच्या ऐवजी घंगाळभर दुधात बुडवून मारलं जायचं. पावित्र्याचा तेवढाच टच. पण आईला तेही वाईट वाटू लागलं. तेव्हा आईच्या स्तनाला थोडं विष लावलं जायचं. म्हणजे मुलगी जन्मली, एकाच वेळी दूध विष एकत्र ! का तर महान संस्कृती.

अजून फार बदल झाला आहे असे समजू नका. लोकशाही स्वातंत्र्याच्या आभाळाखाली जे सरकार भारतात काम करते त्या सरकारमधील एक बेजबाबदार मंत्री म्हणतो ' गर्भजल परीक्षा चालू पाहिजे म्हणून ' आज स्वातंत्र्याच्या बेचाळीस वर्षाच्या आमच्या कारकीर्दीत ही हिंमत होते ! आज शंकराचार्य हैद्राबादला म्हणतात- हैद्राबादचा पाण्याचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर एखादी स्त्री सती गेली पाहिजे. आम्ही गप्प बसतो. आणि राजमाता विजयाराजे शिंदे म्हणतात– ' ज्या स्त्रिया सत्शील आहेत, पवित्र आहेत, तिला जर वाटलं आपण सती जावं

तर त्यात गैर काय ?' राजमाता तुम्ही' ? हिंमत होते तुमची ही ? निषेधाचा ब्र आपण काढत नाही. शिकलेलो म्हणतो आम्ही स्वतःला. आज ही मानसिकता चालू आहे. गर्भजलचिकित्सा हे स्त्रीहत्येचंच पाऊल आहे. एका वेगळ्या सांस्कृतिक आवरणाखाली. एका वेगळ्या प्रागतिक आवरणाखाली तुम्ही मुलीच्या हत्येला प्रोत्साहन देता. हे चाललंय काय ?

त्या काळात जोतिराव फुल्यांनी जी हिंमत, जे धाडस दाखविलं त्यासाठी मला जोतिराव फुल्यांचा विचार महान सामाजिक विचार वाटतो. हे जोतिराव फुल्यांनी केलं, त्यांनी बाजू खंबीरपणाने घेतली. आजही आमचे आई-बाप जे आहेत त्यांचा जर सर्व्हे, घेतला काही सामान्य अपवाद सोडले तर, त्यांना विचारलं की तुम्हाला जेव्हा मुलगी झालीं, विशेषतः पहिली मुलगी झाली, तेव्हा कसं वाटलं. मी औरंगाबादच्या लोकांना प्रश्न विचारला. कन्हाडच्या लोकांना नाही. खरी मतं जर सांगीतली तर वाईट वाटते. आणि मुख्य म्हणजे स्त्रीलाही वाईट वाटतं. कां ? तिच्यावर टेन्शन आहे. आपल्या कुशीत जर वंशाचा दिवा आला नाही, तर नवरा आपल्या उरावर दुसरी सवत आणील. हे टेन्शन आहे. आणि जेव्हा मुलगा होतो पहिल्यांदा स्त्रीला, तेव्हा ती नवऱ्याला हळूच म्हणते, जिंकली की नाही मी. जिंकलं म्हणते ही तिची मानसिक धारणा केलेली आहे या व्यवस्थेनं. मुलगी होणं म्हणजे पाप करणं.

' पुत्र व्हावा ऐसा गुंडा । जो त्रैलोक्यात लावील झेंडा ॥
लग्नांत मागेल हीरो होंडा । आणि म्हातारपणी डोक्यात घालील मोठा धोंडा ॥

पण आमची ग्रामीण माणसं, आमची शेतकरी संस्कृती सांगते ' पहिली बेटी-तूपरोटी ' शहरातील माणसाला आमचा शेतकरी दलित माणूस सांगतो ' पहिली बेटी तूपरोटी ' जीवनात कसं जगावं यांचे आदर्श शहरांतील माणसाने खेड्यातील माणसाच्या झोपडीकडे बघून शिकावेत. ही प्रेम नांवाची गोष्ट आहे. ' पहिली बेटी तूपरोटी ' श्रीमंत लोकांनी आमच्या सामान्य माणसाच्या डोक्यामध्ये विष पेरलं की हुंडा घेतला पाहिजे म्हणून. आता पाटील साहेब, संभाजीराव बाबा (काका) इथं आहेत ते सांगतील त्यांच्या काळात हुंड्याला फार महत्व नव्हतं. भांडवलशाही अर्थव्यवस्थेचं आक्रमण जसं जसं वाढत जाईल, तसं तसं या देशामध्ये स्त्रियांचं शोषण वाढत जाईल. वेश्या व्यवसाय वाढत जाईल. म्हणून जोतिराव फुले स्त्रीसमाजाचे पक्षपाती होते म्हणण्यापेक्षा स्त्री शिक्षणाशिवाय संस्कृती व्यर्थ आहे त्यांचं जीवनासंबंधीचं महान आकलन होतं. सामान्य माणूस हा संस्कृतीचा कणा आहे. आणि या सामान्य माणसाची बाजू घेत घेत जोतिराव फुले विश्वकुटुंबवाद पुढे मांडत असत. सार्वजनिक सत्यधर्मावर मी उद्या बोलणार आहे. जगातला माणूस जोडणारा विचार आहे हा. ' गुलामगिरी ' हे पुस्तक त्यांनी कुणाला अर्पण केले. ते पुस्तक त्यांनी अमेरिकेतल्या

निग्रोंना अर्पण केलं. सामान्य मांणसांच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या मंडळींना अर्पण केलं. ही त्यांची सामान्य माणसाची बांधिलकी.

मित्र हो जवळ, जवळ पावणे दोन तास झालेले आहेत. मी म्हणालो तुम्हाला जोतिराव फुले एका तासात, दोन तासात, चार व्याख्यानांत मांडता येण्यासारखा विषय नाही. मी मला झालेला विचारशोध शेवटचा मानत नाही. आता तुमच्या पर्यंत काही पोहोचवू शकलो तर हे तुमचं यश आहे. मी फक्त निमित्त आहे. राहिलेले विचार उद्याच्या सत्रामध्ये आपण घेऊ. धन्यवाद.

व्याख्यान - दुसरे

१३ मार्च १९८९

शहरातील रसिक मित्रांनो! काल महात्मा जोतिराव फुले यांच्या संदर्भातील सामाजिक विचार आणि त्यांची सामाजिक कृतिशीलता या बाबतीतले काही विचार मी आपल्यासमोर ठेवले. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत हा विषय मांडत असतांना आणि आजच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक संदर्भात जोतिराव फुल्यांच्या विचारांचं मूल्यमापन करीत असतांना एक भान सदैव डोक्यात ठेवावं लागतं ते हे की जोतिराव फुल्यांच्या विचारांची परिपूर्ती आजही व्हायची राहिलेली आहे. यशवंतराव चव्हाण एक महाराष्ट्रातील असे नेते होते की, ज्यांच्या विचारावर सत्यशोधकी चळवळीचा आणि आंबेडकरी चळवळीचा खोलवर असा परिणाम आणि प्रभाव पडलेला होता. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात राहूनसुद्धा गरिबांचे नुकसान होईल असे निर्णय त्यांनी कधी घेतले नाहीत. यशवंतराव सर्व कांही होते पण यशवंतराव गरिबांचे शत्रू नव्हते. या संदर्भात मी शेवटचा संदर्भ बोलतांना बोलेन.

आज एका विशिष्ठ स्वरूपाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पार्श्वभूमीवर आपण जोतिराव फुले यांच्या विचारांचं परिशीलन करीत आहोत. आजचे सामाजिक संदर्भ त्यासाठी आपण तपासून घेत आहोत. हा एका पद्धतीने सत्यशोध आहे. सत्यज्ञान समजून घेण्याचा हा आपला एक प्रयत्न

आहे. सत्यवर्तनासाठी आज जोतिराव फुल्यांच्या विचारांची आवश्यकता किती आहे हे सुद्धा समजून घेणे गरजेचे आहे. आणि म्हणून या सबंध १९५६ पर्यंतच्या क्रांतीकारी तप्प्यांचा अभ्यास करतांना १९५६ नंतरचं महाराष्ट्रातील देशातील चित्र पाहू नका. मी एक जर विधान केलं तर ते अनाठायी ठरणार नाही. विपर्यस्त मुळीच ठरणार नाही. की, यशवंतराव चव्हाणांनी राजकारणासारख्या धकाधकीच्या आणि कॉंप्रोमायझिंग अप्रोच घ्यावा लागणाऱ्या क्षेत्रामध्ये राहूनसुद्धा जेवढ्या प्रमाणांत या चळवळीतील मूल्यांना जोपासता येईल तेवढ्या पद्धतीने जोपासलं. मी संपादित केलेला ' युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण ' हा जो ग्रंथ आहे त्याच्यामध्ये माझी कविता समाविष्ट केलेली आहे. आणि यशवंतराव तुम्ही म्हणून त्यातल्या चार ओळी आजचं व्याख्यान सुरू होण्याच्या अगोदर मी म्हणून दाखविल्या तरी या यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेमध्ये अनाठायी ठरणार नाहीत.

' प्रीतिसंगम ' आजही गातो, त्या कर्तृत्वाची यशोकहाणी ।
कोयना - कृष्णेच्या शिवारातून, ओठांत फुलते हिरवी राणी ।।
यशवंतराव ! आजही वहाते, मळ्यात माझ्या गोदा कृष्णेचं पाणी ।
आवाजच नेत्यांचे जायबंद झाले, कुठे शोधावी तुमची वाणी ? ।।
आज तयांचे बाजार झाले, आणि मने देतात ग्वाही ।
यशवंतराव तुम्ही ' यशवंत ' च, ऐसा नेता होणे नाही ।।

ही कविता त्यांना अभिवादन करण्यासाठी म्हणून मी आपल्यासमोर म्हणून दाखविली. आज जोतिराव फुल्यांच्या ' शेतकरी आसूड ' मधील काही विचार, सार्वजनिक सत्यधर्मातील काही विचार, हंटर कमिशनला सादर केलेल्या शैक्षणिक बाबीसंबंधी त्यांनी जो विचार मांडला त्या संदर्भातले काही विचार आणि त्यानंतर आजचे सामाजिक संदर्भ याचं थोडक्यात विवेचन मी आपल्या समोर करणार आहे. त्या अगोदर आपल्याला जोतिराव फुले यांच्या कार्याची थोडीशी ओळख व्हावी म्हणून थोडक्यांत त्यांच्या कामाची यादी मी आपल्याला वाचून दाखवितो. म्हणजे नंतर आपल्याला कांही मुद्दे समजून घ्यायला सोपे पडेल.

१) १८४८ साली पुण्यात बुधवार पेठेत भिडयांच्या वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. भारतीयांनी ही सुरू केलेली पहिली मुलींची शाळा होती.

२) पत्नीला शिकवून स्त्री शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले भारतीय पहिली स्त्री शिक्षिका आहे.

३) १८५१ साली अस्पृश्य मुलांच्यासाठी भारतीय पातळीवरील भारतीय गृहस्थानी काढलेली पहिली शाळा जोतिराव फुले यांनी काढली.

४) त्यांच्या वडिलांनी त्यांनी मुलींची शाळा सुरू केल्याबद्दल १८९४ मध्ये त्यांना घराबाहेर काढले तरी शिक्षण खुले करण्याचे कार्य त्यांनी सोडलेले नव्हते.

५) १८५१ साली स्वतःच्या घरातील हौद व विहीर अस्पृश्यांसाठी पाणी पिण्यासाठी मोकळा केला.

६) विधवा विवाहाचा पुरस्कार करून १८६४ साली पुण्यात गोखल्यांच्या बागेत रघुनाथ जनार्दन व नर्मदा यांचा पुनर्विवाह लावून दिला.

७) विधवेचे वाकडे पाऊल पडून जन्माला आलेले मूल सांभाळण्यासाठी 'अनाथगृह' १८६३ साली त्यांनीं स्थापन केले.

८) १८६५ साली काशिबाई नामक ब्राह्मण विधवेला आश्रय दिला. तिची प्रसूती गुप्तपणे घडविली तेव्हा स्वतः सावित्रीबाई फुले यांनी मुलाची नाळ कापली. काशिबाईचा हा मुलगा 'यशवंत' यालाच पुढे स्वतःचा दत्तक पुत्र म्हणून जोतिरावाने घेतले.

९) जोतिराव फुले यांनी बालविवाहाला खंबीर विरोध केला.

१०) १८६८ साली रायगडावर जाऊन शिवाजी राजांच्या समाधीचा शोध लावला.

११) १८७३ साली धर्ममूलक विषमता तोडण्यासाठी आणि सत्याचा धर्म पुरस्कारण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन केला.

१२) विधवांचे केशवपन अर्थात मुंडण ही विशेषतः ब्राह्मण समाजातील क्रूर चाल बंद पाडण्यासाठी नाव्ह्यांचा संप आणि बहिष्कार त्यांनी घडवून आणला.

१३) गुलामगिरी, ब्राह्मणांचे कसब, जातिभेद विवेकसार, सार्वजनिक सत्यधर्म, सत्सार, अखंड, शेतकऱ्यांचा आसूड आदि ग्रंथ लिहून धर्मातील जे जे हिणकस, ते ते जाळून टाकले पाहिजे आणि धर्माला शुद्ध स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे यासाठी ते झटले.

१४) लग्न समारंभात वधूवरांना न कळणारे संस्कृत मंत्र म्हणण्याऐवजी आपल्या मातृभाषेत ईश्वराची आराधना करावी असे सांगून लग्न-विधीसाठी सत्यशोधक मराठी मंगलाष्टके त्यांनी रचली.

१५) १८७८ साली मुठा नदीवरील धरण झाल्यावर पाटाचे पाणी घेण्यास शेतकरी तयार होईनात कारण त्यामुळे जमीन निरुपयोगी होते असा त्यांचा गैरसमज झालेला होता. त्यावर जोतिराव फुले यांनी मांजरी येथे दोनशे एकर जमीन घेऊन पाटाच्या पाण्यावर बागाईती करून कोबी, फुलकोबी, संत्री, मोसंबी, बटाटे ही नवी

पिके घेतलीच पण ऊसाचे मोठे पीक घेऊन गूळ तयार केला. पाटाच्या पाण्यावर ऊस भरपूर येतो हा त्यांचा शोध म्हणजे जणू महाराष्ट्रातील साखर उद्योगाचे पहिले पाऊल होते.

१६) ही शेती करतानाच ' शेतकऱ्याचा आसूड ' हे पुस्तक लिहून आणि ' दीनबंधू ' हे वर्तमानपत्र काढून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

१७) शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराने हडप करू नयेत या साठी त्यांनी मोठी चळवळ घडवून आणली ते साल १८७५ हे होतं.

१८) १८७९ साली मुंबईतील गिरणी कामगारांचा पहिला संघ स्थापन झाला. या कामात नारायण मेघाजी लोखंडे या आपल्या मित्राला जोतिरावांनी खास मदत केली.

१९) शेतकऱ्यांच्या व्यथा ब्रिटीश उच्च अधिकाऱ्यापर्यंत पोहोचविल्या. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान मिळावे, त्यांच्या मुलांना परदेशी कृषि प्रशिक्षणासाठी पाठवावे असा त्यांनी आग्रह धरला. १८८३ साली ड्यूक ऑफ् कॅनॉटच्या समोर शिक्षणाच्या संदर्भात आणि भारतीय समाजातील शोषणाच्या संदर्भात परखडपणे आग्रही मागणी मांडली.

मित्रहो, ही यादी आपल्या माहितीस्तव ढोबळ मानाने आपल्यासमोर मी मांडली आहे. ही सर्व लांबच लांब यादी जर पाहिली तर वाटते, भारतीय समाजातल्या प्रत्येक प्रश्नावर जोतिराव फुले यांनी किती खोलवर विचार केलेला होता. ' शेतकऱ्यांचा आसूड ' हे जर पुस्तक वाचलं तर मी नेहमी शेतकऱ्यांच्या, दलितांच्या मुलांना सांगतो की महाविद्यालयात तुम्ही आलात, हजारो वर्षानंतर ज्ञानाची सुवर्णसंधी तुम्हाला मिळालेली आहे. आणि आपण कशासाठी शिकत आहोत याचं उत्तर जर तुम्हाला मिळवायचं असेल तर मुलामुलींनी जोतिराव फुल्यांचं वाङ्मय वाचलं पाहिजे. कारण ' ब्राह्मण सर्वत्र पूज्यते ' हा जो सिद्धांत होता. त्याला तुम्ही हरताळ फासा, हा जोतिरावांचा सर्वसामान्य माणसांना संदेश होता.

अज्ञानाच्या, निरक्षरांच्या अंधःकारातून हा सर्वसामान्य माणूस त्यांच्या जीवनातून त्याला उठवायचा असेल तर त्यांनी स्वतःचा आत्मशोध घेतला पाहिजे. स्वतःमधील सामर्थ्याचा सत्यशोध त्याला आला पाहिजे. आणि ज्ञान हे त्याच्यावरील एक अमोघ अस्त्र आहे अशी एक खंबीर स्वरूपाची धारणा त्यांना मिळालेली होती. पेन्चा ' ह्यूमन लिबर्टी ' हा ग्रंथ वाचून त्यांना प्रेरणा मिळाल्या होत्या. स्कॉटलंडच्या मिशनरींचे काम पाहून सुद्धा त्यांना प्रेरणा मिळालेल्या होत्या. आणि मुंबईला जगन्नाथशेठनी जी पहिली शाळा चालविली होती एका विशिष्ट स्वरूपाची,

त्या शाळेचाही संदर्भ त्यांनी डोक्यात ठेवलेला होता. आणि त्यांच्यामध्ये एक 'रिबेलियन माईंड' ज्याला आपण बंडखोर मन म्हणतो की प्रस्थापित, अन्यायकारक, शोषक, आणि बहुसंख्य म्हणजे ९७% समाजाला वेदना, यातना, व्यथा देणाऱ्या समाज व्यवस्थेला मुळातून बदललं पाहिजे याचा आग्रह धरून होतं.

हा जो एका परिवर्तनाचा नवा शोध जोतिराव फुल्यांना लागला होता, त्याचं सबंध प्रतिबिंब आपणाला त्यांच्या 'गुलामगिरी' मध्ये 'सार्वजनिक सत्यधर्म, मध्ये सांपडते. पण आमच्या डोक्यावर ब्रह्माचं भूत लटकावून ठेवण्यात आलेलं होतं. 'ब्रह्मसत्य जगन्मिथ्या' 'माणसाचं आजचं जीवन हे बुडबुडा आहे. माया आहे ब्रह्म कुठं आहे ? माहित नाही. आत्मा अमर आहे.'

या महाविद्वान बृहस्पतीच्या आधारावरून शूद्रादि अतिशूद्रांच्या कन्या-पुत्रांनी आपल्या मृत माता-पित्यांच्या नांवाने धूर्त आर्य ब्राह्मणांस सुवर्णदान, शय्यादान, छत्रीदान, गोप्रदान आणि जोडे वगैरे दान करूं नये, असे सिद्ध होते.

"अरे बाळा, यांत काय संशय ? कारण शूद्रादि अतिशूद्रांचे माता-पिता जिवंत असतां त्यांनी त्यांस अन्नान्न करावयास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नांवाने धूर्त आर्य ब्राह्मणांस सुवर्णदान दिल्याने त्याबद्दल त्यांच्या मृत पावलेल्या पितरास कोणत्या ठिकाणी आणि केव्हा लाभ होणार आहे ? तसे त्यांनी आपल्या माता-पित्याला वस्त्र-वस्त्र करावयास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नावाने धूर्त आर्य ब्राह्मणांस शय्यादान देवून त्यास नरम बिछान्यावर लोळावयास लावल्याबद्दल त्यांच्या मृत झालेल्या पितरास कोणत्या ठिकाणी आणि केव्हा आराम सुख होणार आहे. तसेच त्यांनी आपल्या माता पित्याला उन्हांत तळतळायास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नांवाने धूर्त ब्राह्मणास छत्रीदान दिल्याने त्याबद्दल त्यांच्या मृत पावलेल्या पितरांच्या अंगावर छत्रछाया कोणत्या ठिकाणी आणि केव्हा पडणार ! आणि तसेच त्यांनी आपल्या माता-पित्याला भर उन्हांत अनवाणी तळतळायास लावून ते मरण पावल्यानंतर त्यांच्या नावाने धूर्त आर्य ब्राह्मणांस जोडे दान दिल्याने त्याबद्दल त्यांच्या मृत झालेल्या पितरांना पादुकासुख कोणत्या ठिकाणी आणि केव्हा होणार? या सर्वांविषयी सिद्ध करता येत नाही. यावरून धूर्त आर्यभटाविषयी बृहस्पतीचे म्हणणे सर्व खरे आहे किंवा खोटे आहे, याविषयी तुझा तूच विचार कर म्हणजे झाले.

जोतिराव फुल्यांनी या सबंध हिंदु तत्त्वज्ञानाला कलाटणी दिलेली आहे. शरीराशिवाय आत्म्याला अर्थ नाही हे जोतिरावांनी सांगीतलं. शरीर असल्याशिवाय तुमच्या आत्म्याला अर्थच प्राप्त होत नाही म्हणून हे मानवी जीवन दुर्लभ आहे. हे मानवी जीवन सुंदर आहे. मग या मानवी जीवनावर जीवनातच प्रेम दिलं पाहिजे. 'सार्वजनिक सत्यधर्मामधला' अतिशय सुंदर विचार कोणता असेल तर

जोतिरावांनी स्वर्ग नाकारला, जोतिरावांनी देव नाकारला, निर्मिक मानला जोतिराव फुल्यांनी देव आणि दैव नाकारले. देव आणि देऊळे नाकारली. त्यांना ती शोषणाची केंद्रे वाटली.

जोतिरावांनी ' सार्वजनिक सत्यधर्मामध्ये ' नीतिचा विचार मांडला. धर्माचा विचार मांडला, स्त्री-पुरुषाच्या संबंधाचा विचार मांडला, स्त्री-पुरुषांच्या अधिकारांचा विचार मांडला, सत्यासंबंधी विचार मांडला. म्हणजे जीवनातल्या विविध पातळ्यावर जोतिरावांनी इतका काही खोलवर विचार केला. 'सार्वजनिक सत्यधर्मामध्ये ' नीतिचा विचार मांडला, तसेच धर्माचा, स्त्री-पुरुषाच्या संबंधाचा, स्त्री-पुरुषांच्या अधिकारांचा, सत्यासंबंधीचा विचार मांडला. म्हणजे जीवनातल्या विविध पातळ्यावर जोतिरावांनी इतका कांही खोलवर विचार केला. ' सार्वजनिक सत्यधर्मामध्ये. त्यांचं ते ' सार्वजनिक सत्यधर्माचं ' पुस्तक जर आपण वाचू लागलो तर आपल्या डोळ्यासमोर फ्रान्सची राज्यक्रांती दिसते, कॉर्लमार्क्सचं तत्त्वज्ञान, रशियन क्रांती दिसते, लोकशाही समाजवादामधील उच्च तत्त्वज्ञानाचे पैलू दिसतात. अशा रीतीनं सार्वजनिक सत्यधर्माचा तेहतीस कलमी कार्यक्रम जोतिरावांनी मांडला आणि सामाजिक विषमतेच्या पायावर उभ्या असलेल्या भारतीय समाजाला त्यांनी फार मोठं चॅलेंज उभं केलं, मोठं आव्हान उभ केलं. मला वाटतं बुद्धानंतर इतकं चंड आव्हान कुणी उभं केलं नव्हतं.

त्यांनी ' सार्वजनिक सत्यधर्म ' मध्ये असा एक विचार मांडला की आर्यभट्ट हे इराण मधून आले, आणि देशस्थ ब्राह्मण आणि इथले शूद्रादि अतिशूद्रांचे जे घटक होते त्यांना त्यांनी आपल्या उच्च जीवनामध्ये सामावून घेतले. कारण इंग्रज वाहेरून आल्यानंतर त्यांनी जसे इथले शिकलेले थोडे जे ब्राह्मण हाताशी धरले. तसंच थोड आणखी आपण मागे गेलो तर जोतिराव फुल्यांचं म्हणणं असं आहे की, इराणमधून ज्या आर्यभट्टाच्या टोळ्या आल्या, त्या मोजक्याच होत्या. पण या सबंध व्यवस्थेवर आपलं वर्चस्व, प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठो या व्यवस्थेतील देशस्थ ब्राह्मण त्यांनी हाताशी धरले. मूलतः ते क्षत्रिय होते. देशस्थ ब्राह्मण हे क्षत्रिय होते. क्षत्रिय म्हणजे ते इथे राहणारे. मग इथल्या व्यवस्थेवर सबंध ताबा मिळविण्यासाठी इराण मधून आलेल्या आर्यभट्टानी त्यांना प्रमोशन दिलं. आणि त्यांना कुलकर्णी, तलाठी, अमकं-तमकं करून व्यवस्थेमध्ये जागा, उच्च स्थानं मिळवून दिली.

जोतिराव फुल्यांचं हे विवेचन वाचतांना आज ज्या पुस्तकाचं प्रकाशन माझ्या हस्ते झालं ते माझे मित्र डॉ. रावसाहेब कसबे यांनी जे ' धर्म आणि इतिहास लेखन ' या विषयावर याच व्याख्यानमालेमध्ये आपले विचार मांडलेले होते. त्या संदर्भात हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे की भारताचा सांस्कृतिक इतिहास, सामाजिक

इतिहास हा नेहमी उच्च वर्णीयांच्या अंगानी लिहिलेला आहे. आणि धर्म हा मूठभर लोकांचे पोटाचे साधन म्हणून वापरला आहे. हा जो सबंध इतिहास दिला गेला तो अतिशय एकारलेल्या पद्धतीने लिहिला गेला आणि म्हणून भारतीय इतिहासाचं पुनर्लेखन करायचं असेल तर सामान्य माणसाच्या झोपडीच्या पायथ्याशी थांबून हा इतिहास लिहावा लागेल.

भारतीय समाजाचा सांस्कृतिक वारसा घडविण्यामध्ये या समाजातील ९७% टक्के बहुसंख्य रयत ज्याला आम्ही राष्ट्र म्हणतो, त्या देशातील कलावंत होते, प्रतिभावंत होते. बारा जोतिर्लिगाची मंदिरे नटविणारे आमच्या सर्वसामान्य शिल्पकारांचे हात हे जनतेतून आलेले कलाकार हात होते. यांचा संदर्भ बाजूला ठेवून केवळ धार्मिक मक्तेदारीच्या नावाखाली शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रियांना पिळवटून टाकलं होतं. आणि या ९७% रयतेचा प्रतिनिधी म्हणून जोतिराव फुले एका क्रांतीसिंहासारखे महाराष्ट्राच्या आभाळाखाली त्या काळात गर्जत होते. स्त्रियांच्या दुःखाला वाचा देत होते. निरक्षर माणसाच्या व्यथा आणि यातनांना त्यांनी साक्षर केलं. हजारो वर्षे ज्यांचे ओठ बंद होते, ज्यांना फक्त जीभच होती, पण ज्ञानाचा उच्चार ज्या जिभेला स्पर्श करीत नव्हता अशा बंद ओठांना त्यांनी सूर्यासारखं उफाळायला लावलं.

जोतिराव फुल्यांचे मूल्यमापन करतांना त्यांनी इथल्या शूद्र, अतिशूद्र, स्त्रिया, सामान्य माणसावर ज्या चातुर्वर्ण्य संस्कृतीचं जे आक्रमण झालं, त्या आक्रमणाला निपटून काढण्यासाठी, उपटून काढण्यासाठी काय केलं पाहिजे म्हणून त्यांनी ' शेतकऱ्यांच्या आसूड ' मध्ये एक वाक्य अतिशय सुंदर लिहिलेलं आहे. 'मूर्ति पूजेपेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे,' पुढे गाडगे महाराज काय म्हणत- ' वेड लागलं जगाला । देव म्हणती दगडाला ।।' संदर्भ बघा, चळीवळीचा कसा असतो ते. मूर्तिपूजेपेक्षा ज्ञान श्रेष्ठे आहे. ब्रह्मापेक्षा जीवन श्रेष्ठ आहे. आणि जीवन हे सुंदरपणे जर उभं करायचं असेल तर ज्ञान हे जीवनामधलं सामर्थ्य आहे. याचा एक सत्यशोध, सत्यज्ञान जोतिराव फुल्यांना झालं.

' सार्वजनिक सत्यधर्माबद्दल ' मी आपल्यासमोर बोलत असतांना जेव्हा ती यादी वाचतो की सार्वजनिक सत्यधर्माची मूल्यें काय ? जोतिराव फुले सांगतात- त्यांच्या भाषेत, ते सांगतात ' माणूस येथून तेथून समान आहे. एक आहे. ' माणूस एक आहे मग धर्म अनेक कशासाठी ! विश्वकुटुंब वादाचा एक मोठा प्रश्न. मानवतेच हे आंतरराष्ट्रीयत्व. पृथ्वीवरचा माणूस एक आहे, त्याची सुख-दुःखं सारखी आहेत. त्याचा घाम, रक्त, त्याच्या यातना, व्यथा सारख्या आहेत. म्हणून तो सारखा आहे. अनेक धर्मांची गरज नाही. दुसरं एक सुंदर वाक्य-एक विचार फेकतात ते आपल्यासमोर-

ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणांशी । उराशी धरावे बंधुपरी ।।

धर्माची सगळी वस्त्र जाळून फेकून देऊन धर्माच्या वस्त्रामधला सगळा वाटला गेलेला समाज, सगळी माणसं एक आहेत. असा एक निर्मिकाचा एकेश्वरवाद जोतिराव फुल्यांनी प्रस्थापित केला. दुसरं तत्त्व काय सांगीतलं, स्त्री-पुरुष समानता. स्त्री-पुरुष समानता हा अतिशय सुंदर विचार जोतिराव फुल्यांनी मांडला. आनंदाच्या आग्रहाखातर महात्मा गौतम बुद्धानें आपल्या धम्म भिक्कू संघामध्ये स्त्रियांना प्रवेश दिला होता. प्रारंभी बुद्ध हा स्त्रियांना आपल्या बौद्ध भिक्कू संघामध्ये घेऊ नये या मताचा होता. पण आनंद आग्रह धरून बसला की, तुम्ही जर म्हणता की धर्म हे सततचं परिवर्तन आहे, तर मग एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या स्त्रियांना मानवीपणा नाकारता कसा ? आणि बुद्ध तयार झाला.

माझे मित्र प्रा. आ. ह. साळुंखे इथं बसलेले आहेत. चार्वाकाच्या तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आहेत. चार्वाकांनीसुद्धा स्त्री स्वातंत्र्याचा अतिशय सुंदर अर्थ सांगितला आहे. त्यानंतर जोतिराव फुले हे एकच असे विचारवंत व तत्त्ववेत्ते होऊन गेले. की त्यांना मानवी जीवनातलं सौंदर्य सांपडलं. की हा मानवी समुदाय सुंदर बनवायचा असेल, मानवी जीवनामध्ये सौंदर्याचा आनंद प्रस्थापित करायचा असेल आणि या सौंदर्यात दडलेलं मानवी सामर्थ्य प्रत्ययाला आणायचे असेल तर स्त्री आणि पुरुष समानता पाहिजे. स्त्रियांच्या बाबतीत आर्यभट्टांनी स्त्रियाना शूद्र केलं. या बाबतीत कुठल्याही स्त्रीला राग येणार नाही इतके चवताळून ते उठतात. हा आपल्या आईचा अपमान ते मानतात. जी आमची जन्मदात्री आहे, जी आम्हाला जीवन देते, मानवी जीवनाचा आम्हाला आकार देते, आशय देते, भाषेच्या रूपाने आम्हाला शब्द देते, नव्हे आम्हाला संस्कृती आणि समाज देते, त्या स्त्रीला तुम्ही शूद्र मानता?

जोतिराव फुले खडबडून समाजाला जागे करतात. हे चालणार नाही म्हणून सार्वजनिक सत्यधर्माचा सुंदर विचार जर कोणता असेल तर तो हा. स्त्री-पुरुष समानतेचा विचार आणि पुरुषाच्या मानाने स्त्रियांजवळ संस्कृती असते. त्या सौशिक असतात म्हणून स्त्रियांच्यासाठी एक विशिष्ट विचार करण्याची पद्धत जोतिराव फुल्यांनी पहिल्यांदा भारतीय समाजात प्रस्थापित केली. नाही तर आमच्या इतिहास काळामध्ये आमच्या प्रत्ययाला काय येतं. गार्गी आहे, लोपामुद्रा आहे, मैत्रेयी आहे, मंडनमिश्रची पत्नी सरस्वती आहे. चार-पांच नांवं स्त्रियांची घेतली की संपला आमचा स्त्रियांचा इतिहास, मग दुसरा इतिहास सुरू होतो. हेमामालिनी आहे, श्रीदेवी आहे. चिक्कार आहेत. नंतर आपले टी. व्ही. वाले आहेत. सिनेमावाले आहेत. ते आपल्यावर फार प्रेम करतात. आपल्या पैशावर फार प्रेम करतात.

जोतिराव फुल्यांनी सार्वजनिक सत्यधर्म सांगत असतांना सोप्या सोप्या पद्धतीनं मानवी जीवनातील सुंदर आशय, त्या सुंदर आशयाच्या छान छान छटा, त्याचं एक वेगळेपण, वैविध्य आणि मानवी जीवनाला सर्व संपन्न सर्वांग सुंदर बनण्यासाठी लागणारा नियमांचा अतिशय मौल्यवान भाग आपण याला म्हणू. समान संधीचं तत्त्वज्ञान आमच्या राज्यघटनेमध्ये आहे. 'सार्वजनिक सत्यधर्मामध्ये' जोतिराव फुल्यांनी समान संधीचं तत्त्वज्ञान सांगीतलं आहे. सामाजिक सहिष्णुतेचं तत्व सांगीतलं आहे. धार्मिक सहिष्णुतेचं तत्त्व सांगीतलेलं आहे. एवढेच नव्हे तर सार्वजनिक सत्यधर्मामध्ये जोतिराव फुल्यांनी वैचारिक स्वातंत्र्याचा आग्रह धरलेला आहे. आणि हा वैचारिक स्वातंत्र्याचा आग्रह स्त्री-पुरुषांना लागू आहे. प्रत्येकाला आपल्या मतानुसार, विचारानुसार, बुद्धीनुसार विचार मांडण्याचं, व्यक्त करण्याचं स्वातंत्र्य आहे. सार्वजनिक सत्यधर्माचं हे सूत्र आहे.

सत्यवर्तन करणाऱ्याविषयी नियम खालीलप्रमाणे

१ ते ३३ नियम

१. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रास उत्पन्न केले. त्यापैकी स्त्री-पुरुष हे उभयता जन्मतःच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहेत, असे कबूल करणारे, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२. स्त्री असो अथवा पुरुष असो, ते आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने या विस्तीर्ण पोकळीतील निर्माण केलेल्या अनंत सूर्यमंडळासह त्यांचे ग्रहोपग्रहास अथवा एखाद्या विचित्र ताऱ्यास अथवा एखाद्या धातू दगडाच्या मूर्तीस निर्मिकाच्या ऐवजी मान देत नसल्यास, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

३. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने निर्माण केलेल्या एकंदर सर्व वस्तूंचा यच्चयावत प्राणीमात्रांस उपभोग घेऊं न देता, निरर्थक निर्मीकास अर्पण करून त्याचे पोकळ नामस्मरण जे करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

४. आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याने निर्माण केलेल्या एकंदर सर्व प्राणीमात्रांस समस्त वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेऊन त्यांस निर्मीकाचा आभार मानून त्याचे गौरव करू देतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

५. विश्वकर्त्याने निर्माण केलेल्या प्राणीमात्रांस जे कोणी कोणत्याही प्रकारचा निरर्थक त्रास देत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

६. आपल्या सर्वांच्या निर्मीकाने एकंदर सर्व स्त्री-पुरुषांस, एकंदर सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केले आहेत. त्यातून एखादा मानव अथवा काही मानवांची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरी करू शकत नाही व त्याप्रमाणे जबरी न करणारास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

RAO CHAVAN MUMBAI

७. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांस धर्म व राजकीय स्वतंत्रता दिली आहे, ज्यापासून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान करता येत नाही, अथवा जे कोणी आपल्यावरून दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरांस पीडा देत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

८. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व प्राणीमात्रांस निर्माण केले आहे. त्यापैकी हरएक स्त्रीने एका पुरुषांस मात्र आपला भ्रतार करण्याकरिता वजा करून, तसेच हरएक पुरुषाने एक स्त्रीस मात्र आपली भार्या करण्याकरिता वजा करुन एकंदर जे सर्व स्त्री-पुरुष एकमेकांबरोबर मोठ्या आवडीने बहीण भावंडा-प्रमाणे आचरण करतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

९. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व स्त्रियांस अथवा पुरुषांस एकंदर सर्व मानवी हक्काविषयी आपले पाहिजेल तसे विचार, आपली पाहिजेल तशी मते बोलून दाखविण्यास, लिहिण्यास आणि प्रसिद्ध करण्यास स्वतंत्रता दिली आहे. परंतु ज्या विचारांपासून व मतांपासून कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याच तऱ्हेचे नुकसान मात्र होऊ नये म्हणून जे खबरदारी ठेवितात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१०. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या व्यवस्थेवरून एकंदर जे सर्व स्त्री-पुरुष दुसऱ्याच्या धर्मासंबंधी मतांवरून अथवा राजकीयसंबंधी मतांवरून त्यास कोणत्याही प्रकारे नीच मानून त्यांचा छळ करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

११. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुषांस एकंदर धर्मासंबंधी गांवकी अथवा मुलकी अधिकाराच्या जागा त्यांच्या योग्यतेनुरूप व सामर्थ्यानुरूप मिळाव्यात, म्हणून त्यास समर्थ केले आहेत असे कबूल करणारे त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१२. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या नियमास अनुसरून एकंदर सर्व मानव स्त्रीपुरुष धर्म, गांवकी व मुलकी यासंबंधीची प्रत्येक मानवाची स्वतंत्रता, मालमत्ता, सरक्षण आणि त्याचा जुलमापासून बचाव करण्याविषयी जे कोणी बाध आणीत नाहीत. त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१३. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या मातापित्याचा वृद्धापकाळी परामर्ष करून इतर मानववृद्ध शिष्टांस सन्मान देतात, अथवा मातापित्याचा परामर्ष करून इतर मानववृद्ध शिष्टांस सन्मान देणारांस बहुमान देतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१४. स्त्री अथवा पुरुष जे वैद्यांच्या आज्ञेवाचून अफू, भांग, मद्य वगैरे अमली पदार्थांचे सेवन करून नाना तऱ्हेचे अन्याय करण्यास प्रवृत्त होत नाहीत, अथवा ते सेवन करणारास आश्रय देत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१५. स्त्री अथवा पुरुष, जे पिसू, ढेकूण, ऊं वगैरे कीटक, विंचू, सरपटणारे सर्प, वाघ

सिंह, लांडगे वगैरे आणि त्याचप्रमाणे लोभी मानव दुसऱ्या मानव प्राण्यांचा वध करणारे किंवा आत्महत्त्या करणारे खेरीजकरून जे स्त्री अथवा पुरुष दुसऱ्या मानव प्राण्यांची हत्त्या करीत नाहीत अथवा हत्त्या करणारास मदत देत नाहीत त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१६. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या हितासाठी दुसऱ्याचे नुकसान करण्याकरिता लबाड बोलत नाहीत अथवा लबाड बोलणारास मदत करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१७. स्त्री अथवा पुरुष, जे व्यभिचार करीत नाहीत अथवा व्यभिचाऱ्यांचा सन्मान ठेवीत नाहीत. त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१८. स्त्री अथवा पुरुष, जे हरएक प्रकारची चोरी करत नाहीत अथवा चोरास मदत करीत नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

१९. स्त्री अथवा पुरुष, जे द्वेषाने दुसऱ्याच्या घरास व त्यांच्या पदार्थास आग लावीत नाहीत अथवा आग लावणाऱ्यांचा स्नेह करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२०. स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व जगाच्या हितासाठी धर्मपुस्तक तयार केले आहे, म्हणून मोठ्या बढाईने वाचाळपणा करितात परंतु ते धर्मपुस्तक आपल्या बगलेत मारून इतर मानवास दाखवित नाहीत, अशा कपटी बढाईखोरांवर जे विश्वास ठेवित नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२१. स्त्री अथवा पुरुष, जे स्वतःच्या हितासाठी न्यायाने राज्य करणाऱ्या संस्थानिकांवर अथवा राज्यावर अथवा एकंदर सर्व प्रजेने मुख्य केलेल्या प्रतिनिधीवर बंड करून लक्षावधी लोकांची कुटुंबे उघडी पाडीत नाहीत अथवा बंड करणारांस मदत देत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२२. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या कुटुंबासह, आपल्या भाऊबंदास, आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस आणि इष्टमित्र साथ्यांस मोठ्या तोऱ्याने पिढीजाद श्रेष्ठ मानून आपल्यास पवित्र मानीत नाहीत आणि एकंदर सर्व मानवी प्राण्यांस पिढीजाद कपटाने अपवित्र मानून त्यांस नीच मानीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२३. स्त्री अथवा पुरुष, जे पूर्वी कपटाने लिहिलेल्या ग्रंथाच्या वहिवाटीवरून काही मानवासंच पिढीजाद दास मानीत नाहीत अथवा दास मानणाऱ्यांचा बोज ठेवित नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२४. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या लोकांचे वर्चस्व मुद्दाम राहण्याकरितां शाळेमध्ये शिकविताना इतर लोकांच्या मुलांबरोबर दुजाभाव करण्याचा धिःकार करीतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२५. स्त्री अथवा पुरुष, जे न्यायाधिशाचा हुद्दा चालवितांना अन्यायी लोकांचा, त्यांच्या अन्यायाप्रमाणे त्यास योग्य शिक्षा देण्यास कधीही पक्षपात करीत नाहीत अथवा अन्यायाने पक्षपात करणाऱ्यांचा धिःकार करितात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२६. स्त्री अथवा पुरुष, जे शेतकी अथवा कलाकौशल्य करून पोटे भरणारांस श्रेष्ठ मानितात, परंतु शेतकरी वगैऱ्यांस मदत करणारांचा आदरसत्कार करितात, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२७. स्त्री अथवा पुरुष, जे चांभाराच्या घरी का होईना, बिगाऱ्यांचा धंदा करून आपला निर्वाह करणाऱ्यांस तुच्छ मानित नाहीत; परंतु त्याकामी मदत करणारांची वहावा करितात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२८. स्त्री अथवा पुरुष, जे स्वतः उद्योगधंदा न करतां निरर्थक धार्मिकपणाचा डौल घालून अज्ञानी जनांस नवग्रहांची पीडा दाखवून त्यांस भोंदाडून खात नाहीत अथवा तत्संबंधी पुस्तके करून आपली पोटे जाळीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

२९. स्त्री अथवा पुरुष, जे भाविक मूढांस फसवून खाण्याकरिता ब्रह्मर्षींचे सोंग घेऊन त्यांस अंगाराधुपारा देत नाहीत, अथवा तत्संबंधी मदत करीत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

३०. स्त्री अथवा पुरुष, जे कल्पित देवाची शांती करण्याचे निमित्ताने अनुष्ठाने बनून अज्ञानी जनांस भोंदाडून खाण्याकरितां जपजाप्य करून आपली पोटे जाळीत नाहीत, अथवा तत्संबंधी मदत करणारांचा बोज ठेवित नाहीत, त्यांस सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

३१. स्त्री अथवा पुरुष, जे आपली पोटे जाळण्याकरिता अज्ञानी जनांत कलह उपस्थित करीत नाहीत अथवा तत्संबंधी मदत करणाऱ्यांच्या सावलीसदेखील उभे राहत नाहीत, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

३२. स्त्री अथवा पुरुष, जे आपल्या सर्वांच्या निर्मिकाने निर्माण केलेल्या प्राणी-मात्रापैकी मानव स्त्री-पुरुषांमध्ये कोणत्याच तऱ्हेची आवडनिवड न करतां त्याचे खाणेपिणे व लेणें-नेसणे याविषयी कोणत्याच प्रकारचा विधीनिषेध न करितां त्यांच्याबरोबर शुद्ध अंतःकरणाने आचरण करितात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

३३. स्त्री अथवा पुरुष, जे एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांपैकी कोणाची आवड निवड न करितां त्यातील महारोग्यास, पंगूस व पोरक्या मुलांस आपल्या शक्त्येनुसार मदत करतात अथवा त्याला मदत करणाऱ्यांस सन्मान देतात, त्यास सत्यवर्तन करणारे म्हणावेत.

' सार्वजनिक सत्यधर्मामध्ये ' मानवी हक्काचा आणि मानवी प्रतिष्ठचा आग्रह आहे. नवमानवतावादाचा आशय कॉर्लमार्क्सने जरूर दिला असेल. भारता–मध्ये मानवेंद्र रॉयनी नवमानवतावाद सांगीतला असेल, पण मानवेंद्र रॉयच्या अगोदर जोतिराव फुल्यांनी नवमानवतावाद सांगीतला आहे. हे जे मी म्हणालो याच्यामध्ये काडीचीही अतिशयोक्ती नाही. मी समाजशास्त्राचा विद्यार्थी म्हणून आपल्याला हे सांगतो. जेव्हा त्या सार्वजनिक सत्यधर्मातील जंत्री आपण पाहतो. तर मला असं वाटतं, ' ही तर आमची भारतीय राज्यघटना आहे.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे तर घटनातज्ञ होते, बॅरिस्टर होते, डॉक्टर होते, पी. एच्. डी. होते, डॉक्टर ऑफ सायन्स होते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदव्यांचे अलेक्झांडर होते. त्यांनी राज्यघटनेमध्ये जागतिक पातळीवरच्या सुंदर लोकशाहीचा आशय ओतण्याचा प्रयत्न केला. आपल्या राज्यघटनेमध्ये, आमची राज्यघटना निर्माण होण्याच्या पाऊणशेवर्षे अगोदर जोतिराव फुल्यांनी जे जे सांगीतलं ते ते आमच्या भारतीय राज्यघटनेमध्ये आणावं लागलं. द्रष्टे पुरुष आपल्या काळाच्या पुढे असतात हे जोतिराव फुल्यांनी सिद्ध केलं.

सामन्य माणसं आपल्या पोटापुरतं पाहतात, आणि त्यालाच ते राष्ट्र म्हणतात. आपल पोट म्हणजेच राष्ट्र. जोतिराव फुल्यांची ' सार्वजनिक सत्यधर्मा ' मधील व्याख्या फार सुंदर आहे. राष्ट्र म्हणजे काय ? ' राष्ट्र म्हणजे एकमय लोक ' शब्दरचना बघा किती सोपी आहे. राष्ट्र म्हणजे एकमय लोक. एका भूखंडामध्ये राहणारी सगळी माणसे जेव्हा आम्ही सगळे एक आहोत. एकमय शब्दाचा अर्थ काय ? एकमय शब्दाचा अर्थ असा की, एका विशिष्ट मातीच्या तुकड्यावर राहणारी माणसं जेव्हा आम्ही सगळे एक आहोत असे राहतात तेव्हा त्याला एकमय म्हणतात. जोतिराव फुल्यांनी राष्ट्रवादाचा जन्म आकाराला येत असतांना राष्ट्राची अतिशय सुंदर व्याख्या केली. राष्ट्र म्हणजे एकमय लोक.

आपल्याकडे राष्ट्र एक आहे पण लोक मात्र अनेक आहेत. आपल्या समाज व्यवस्थेचं वैशिष्टय असं की, आपल्या देशात पांच हजार जाती आहेत. साधं-सुधं कांहीच नाही. इंडियामध्ये तेहतीस कोटी देव, प्रचंड देव, कमतरताच नाही, संतोषी माता, आता दलित बायकांच्या अंगात बाबासाहेब येऊ लागलेत. झाले बाबासाहेब देव, मोठ्या माणसाला आम्ही सोडत नाही. कुणाच्या अंगात आता शिवाजी महाराज यायला लागलेत. तुम्ही ऐकताय आता. कुणाच्या अंगात जयभवानी आली. तेहतीस कोटी देव, आमच्या देशातील जातींची लोकसंख्या पांच हजार, १९८६ साली भारताची लोकसंख्या पंच्याऐंशी कोटी. सालांची आणि लोकसंख्येची अशी स्पर्धा चालू आहे. पंच्याऐंशी कोटी लोक त्यांच्या पांच हजार जाती, या पांच हजार जातीच्या डोक्यावर ब्राह्मण. एका महाराष्ट्रामध्ये ४२ भटक्या जमाती.

भारतामधील ब्राह्मणांमध्ये किती पोटजाती. आहेत. नऊशे पोटजाती. म्हणजे ब्राह्मण तरी एक आहेत काय ? देशस्थ ब्राह्मण थोडे जवळ आहेत. पण कोकणस्थ चित्तपावन यांच वेगळच चालतं. कोकणस्थ आणि चित्तपावन ब्राह्मण काय म्हणाले, आम्ही सगळ्या ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ आहोत. म्हणाले. कां ? डायरेक्ट परशुरामाचे वंशज आहोत म्हणाले. मध्ये आधी नाही. माणसांचे वंशज नाहीत परशुराम ? आणि या परशुरामाचे शिवधनुष्य सीतेने पळविले, आणि सीतेला रावणाने पळविले. कमाल आहे एवढ्या चिमुरड्या पोरीची. परशुरामाचे शिवधनुष्य तिनं घोडा म्हणून घेतल. म्हणजे परशुराम एवढा श्रेष्ठ होता मग आमुची चिमुरडी सीता. हे शिवधनुष्य घेऊन, रावण जेव्हा उभा राहिला तेव्हा ते शिवधनुष्य रावणाच्या उरावर पडलं (हे जोतिराव फुल्यांच म्हणणं आहे, माझ मत सांगत नाही मी इथं.) म्हणजे चिमुरड्या पोरीने जे शिवधनुष्य काठीत घोडा उडविण्यासाठी खेळलं, ते शिवधनुष्य रावणाच्या छातीवर पडलं. म्हणजे रावण सीतेला घेऊन गेला. सीतेन शिवधनुष्य उचललं आणि सीतेला रावण घेऊन गेला. कळलं ? याला ब्रह्मभोग म्हणतात.

जोतिराव फुल्यांनी सांगीतलं हे सगळं रामायण. ' सार्वजनिक सत्यधर्म ' हे पुस्तक तुम्ही जर वाचलं तर आपणाला पटायला लागतं, लॉजिकली किती क्लॅरिटी आहे जोतिराव फुल्यांच्या या विचारात. लॉजिकली, साईन्टिफिकली ही थिअरी क्लिअर, माणूसपणाचं तत्त्व जोतिराव फुले कुठं सोडत नाहीत. त्यांच्या सबंध विचाराला बुद्धीवादाचा पाया आहे. आणि म्हणून ते गीतेला उत्तर देताना म्हणतात " श्रीकृष्ण हा जर तुमचा ईश्वर आहे, तर हा मथुरेच्या गौळणी जेव्हा नदीमध्ये नागव्या होऊन स्नान करतात तेव्हा हा श्रीकृष्ण त्यांची लुगडी घेऊन लपून बसतो. याला ईश्वर म्हणता?"

जोतिराव फुले असं म्हणतात की जगामधला कुठलाही धर्म शेवटचा नाही आणि जगामधल्या धर्म ग्रंथामध्ये जे सांगीतलंय ते अंतीम सत्य नाही. बुद्ध हेच म्हणतो. कुठलाही वाद हे सततचे विकसित होणारे तत्त्वज्ञान असते. जोतिराव फुले यांचे सबंध विचार सामाजिक क्रांतीचे महाविज्ञान आहे. त्यांच्या सार्वजनिक सत्यधर्मामध्ये जर आपण बारकाईने अभ्यास केला तर आम्हाला असं सांगण्यात आलेलं आहे की इंग्रजीमध्ये लिहिलं की फार चांगलं. संस्कृत मधून लिहिलं की त्याहून फार चांगलं. आणि आपल्या सोप्या भाषेत लिहिलं की फार वाईट, उथळ आहे. जोतिराव फुल्यांनी आपल्या महाराष्ट्रातला जो ९७ टक्के समाज जी भाषा बोलतो, त्याच्या जिभेवरती जी भाषा खेळते, जी लाखो लाखो माणसांचा श्वास आहे त्या त्या भाषेमध्ये शब्दांना प्राण दिला आणि सर्वसामान्य माणसाच्या दुःखांना वाचा फोडली. तोफेतून सुटलेल्या गोळ्यासारखा तो विचार भिडतो आपणाला आणि वाटायला लागतं की जोतिरावांचा विचार बरोबर आहे.

मधाशी मी आपणाला सांगत होतो, एकट्या ब्राह्मण समाजात नऊशे पोटजाती महाराष्ट्रात आहेत. ब्राह्मणानंतर मराठे, मराठ्यांच्यात शहाण्णवकुळी, त्या शहाण्णव कुळीमध्यें पंचमकुळी, त्या पंचमकुळी पश्चिम महाराष्ट्रात जास्त, राजवंशी मराठे, मराठ्यामध्येही फरक ! राजघराण्यामध्यें मराठे, मग दुसरे देशमुख मराठे, मग नंतर पाटील मराठे, मग नंतर अक्करमाशी मराठे ही मराठ्यामध्ये कॅटेगिरी. पण मराठ्यांचे बरे आहे. त्यांच्यामध्ये प्रमोशन आणि डिमोशन आहे. कुणब्याच्या खिशात पैसा खेळू लागला की तो ताबडतोब पाटील होतो. पाटलाकडे आणखी थोडी अतिरिक्त संपत्ती आली की ते देशमुखांशी नाती जोडतात. पण देशमुख काय म्हणतो, की पाटलाची मुलगी आम्ही करतो, पण आमची मुलगी पाटलाला देत नाही. श्रेष्ठत्वाचं आणि कनिष्ठत्वाच वारं आमच्या डोक्यात आजही आहे.

चित्तपावन ब्राह्मण म्हणाले आंम्ही श्रेष्ठ, आम्ही ईश्वराचे वंशज. मराठे म्हणाले आम्ही राजवंशीय मराठे. माळ्यामध्ये माझ्या एका शिक्षक मित्राच्या घरी मी जेवायला गेलो, तर मी विचारले तुम्ही कोणते माळी, ते म्हणाले आम्ही फुल माळी. फुलमाळी म्हणजे काय ? तर ते म्हणाले आम्ही जिरे माळ्यापेक्षा मोठे. जिरे माळी म्हणजे काय ? तर जे जिरे पिकवतात ते जिरे माळी. आम्ही फुल माळी. इतकेच म्हणून ती बाई थांबली नाही तर ती बाई म्हणाली की आम्ही मराठ्यांच्या पेक्षा श्रेष्ठ आहोत. ' कसं काय ?' आम्ही फुलमाळी आहोत ! आम्ही देवाच्या जवळ आहोत. देवाला काय आवडतं तर फूल आवडतं. देवाला फूल आवडतं म्हणून आम्ही देवाला आवडतो. मराठ्यांच्या पेक्षा आम्ही मोठे. भांडणे आहेत. कोण मोठे कोण नाही !

माळ्याला विचारलं तर ते म्हणाले आम्ही तेल्यापेक्षा श्रेष्ठ, तेल्याला विचारलं ' तुझं काय बाबा ', ते म्हणाले आम्ही कोळ्यापेक्षा श्रेष्ठ, कोळ्याला विचारलं तुझ काय ? ते म्हणाले आम्ही चांभारापेक्षा श्रेष्ठ, चांभाराला विचारलं तुमचं काय ? ते म्हणाले आम्ही महारापेक्षा श्रेष्ठ ! महाराला विचारलं तुमचं काय ! तर ते म्हणाले मांगापेक्षा श्रेष्ठ आहोत. मांगाला विचारलं तुम्ही ! तर ते म्हणाले, आम्ही उकलवारापेक्षा श्रेष्ठ आहोत. उकलवाराला विचारल तर ते म्हणाले आम्ही भंग्यापेक्षा श्रेष्ठ आहोत. आणि भंग्याला विचारल ! बापू तुझं काय ? तो म्हणाला ' माझ्या डोक्यावर राष्ट्रीय एकात्मता आहे ! किती स्तरावर, किती पातळ्यावर या समाजाच्या चिरफळ्या झाल्यात.

या समाजाचे तुकडे तुकडे झाले आणि परत या सगळ्या जातीमध्ये सगळ्या पुरुषांची एक जात महाभयंकर, ते स्त्रियांना आपल्यापेक्षा हीन मानतात. आता आमचे दलित मित्र जोरात लिहितात. चांगली गोष्ट आहे. पण दलित स्त्रियां-

बाबतीत त्यांची भूमिका काय ? ती अशीच असली पाहिजे. सवर्णांच्या विरोधामध्ये आम्ही विद्रोही करू पण आमच्या बायकोने आमचं ऐकल पाहिजे. बाकी इतर सपाटून काम. सपाटून झोप. राष्ट्र मजबूत होते. स्त्री म्हणजे पायाची दासी, स्त्री म्हणजे भोग्य वस्तू आणि इथे जोतिराव फुले स्त्री-पुरुष समानतेचा सिद्धांत मांडतात. स्त्री पुरुषांच्या स्वाभाविक स्वातंत्र्याचा विचार मांडतात. माणसामाणसामधील स्वाभाविक समतेचा विचार मांडतात. माणूस-माणूस एकमूल्य आहे म्हणून मानवी प्रतिष्ठेचा विचार मांडतात.

मी तुम्हाला काल जे बोललो होतो, जोतिराव फुल्यांचा आग्रह भ्रष्ट, टाकाऊ विषमतेच्या पायावर उभ्या असलेल्या समाजव्यवस्थेवर स्थान मिळवायचा नाही. तर नवी व्यवस्था निर्माण करण्याचा त्यांचा ध्यास आणि नवी समाज व्यवस्था निर्माण करण्याचे साधन म्हणून सार्वजनिक सत्यधर्म त्यांनी सांगीतला. Truth आम्ही त्याला ट्रुथ म्हणतो. मग त्यानी सांगताना शिक्षणाचा अर्थ सांगीतला. ते म्हणाले, शिक्षण म्हणजे काय ? आम्हाला अवघड व्याख्येमध्ये शिक्षणाचा अर्थ सांगीतला जातो. बी. एड्. कॉलेज मध्ये आमचे जेव्हा शिक्षक शिकतात ते ज्ञाना-पेक्षा मेथडला फार महत्व देतात. ज्ञान मेलं तरी चालेल. मेथड जिंदाबाद राहिली पाहिजे. पण जोतिराव फुल्यांनी आमच्या बी. एड्. कॉलेजेसना न समजलेल्या शिक्षणाचा अर्थ तेव्हा सांगीतला.

जोतिराव फुले असे म्हणाले की " ज्या शिक्षणामुळे माणसाला खरं काय खोटं काय कळतं ते शिक्षण " " काळ्या शिवारात खपणारी, काळ्या शेतीत काम करणारी आमची लक्ष्मी. काळी माय म्हणजे माझी सरस्वती अशी म्हणणारी. जोतिराव फुल्यांनी शिक्षणासंबंधीची शेतकरी समाजाची दुरावस्था सांगीतली. भाकर, मिरच्यांचा चटणीचा त्याच्यावर लालबुंद गोळा, ती शिळी भाकर खाणारा शेतकरी, सायंकाळी कोरड्यास भाकर खाणारा शेतकरी, गरज पडल्यास मिठाच्या खड्यासोबत भाकर, खाणारा शेतकरी. मित्र हो ' शेतकऱ्याच्या आसूड ' मध्ये शेतकरी समाजाचे जे वर्णन जोतिराव फुल्यांनी केलेलं आहे, तो शेतकरी माझ्या गांवात आजही आहे. माझ्या गावाकडे मी जेव्हा बघतो तेव्हा ते मला महारोग्याच्या हातावर पडलेल्या पांढऱ्या फटक चट्ट्यासारखं माझं गांव मला भेडसावू लागते.

माझ्या लहानपणचं माझं गांव. ज्या गांवाच्या भोवती विहिरी, तळी, मळे भरलेले होते. आमच्या गांवच्या चिरेबंदी वाड्याला ऊसाचे, केळीचे मळे लगडलेले होते आमच्या गांवातील स्त्रिया तृप्त मनाने विहिरीमधील पाणी भरत होत्या. गांवात ताकाचे डेरे घुमत होते. त्यावर लोणी येत होतं. तूप येत होतं. आता फक्त आमच्या गावाच्या शाळेवर लिहिलंय ' आजचा बालक उद्याचा राष्ट्रचालक ' त्याच्या ओठांतलं दूध पळवितो दूध संचालक. आमच्या गावातल्या शाळेत लिहिलंय

'आजचा शिक्षक हा राष्ट्राचा शिल्पकार आहे' पगार वाढवतांना हाहाःकार आहे. काय चाललयं हे ! स्वातंत्र्याची बेचाळीस वर्षे आम्ही प्रवास करून सुद्धा आम्हाला प्राध्यापकांचं वर्कलोड किती असावं हे ठरविता आलं नाही. कुठले शिक्षण तज्ञ ?

शेतकरी समाजाचे-कष्टकरी समाजाचे, सत्त्याण्णव टक्के माणसांचं-स्त्रियांचं अंतःकरण घेऊन जेव्हा जोतिराव फुले लिहितात. आमचे कांही स्कॉलर त्यांचे भाषेतील व्याकरण शोधतात. त्यातलं अंतःकरण पहात नाहीत. व्याकरण अवघड प्रतिमांचा आकृतीबंध, व्यामिश्र, अनुभूतीची प्रतिकारिता, कळलं का ? विद्वान माणसांनाही कळत नाही. मी पाहिलं माझ्या कंधार तालुक्यामध्ये. प्रत्येक गांव तिथं पाटी लागलेली आहे बीज गुणन प्रक्षेत्र. बीयांचं शेत म्हटलं असत तर यांना पोलिसांनी पकडून नेलं असतं का? भू विकास बँक - कुठला शेतकरी असा म्हणतो की, मी आता सकाळी भूवर चाललो आहे. 'शेती विकास बँक' म्हटलं असतं तर काय नुकसान झालं असतं ! राष्ट्राचं बोलायचं नाही. संस्कृत भाषा नंतर इंग्रजी भाषा आणि महाराष्ट्रात मराठीला अवदसा. आणि जी मराठी आहे ती अशी बीज गुणन प्रक्षेत्र, समकर्ता कार्यालय, कळलंच नाही काय म्हणालेत ? काय म्हणालेत ? काय चाललय !

म्हणून जोतिराव फुल्यांनी आपल्या सोप्या, सरळ ,काळजाला भिडणाऱ्या भाषेमध्ये सामान्य माणसाचे दुःख, अश्रू, व्यथा, यातना, त्यांचे मनोगत, प्रश्न सगळ्यांना अतिशय व्यवस्थित शब्दबद्ध केलं. जे आम्ही आज वाचतो किंवा जोतिरावांनी त्यावेळी जे जे सांगीतलं, त्याच्या पैकी कितीतरी काम व्हायचंय. शेतकऱ्याच्या आसूड मध्ये सरकारला शिफारसी करतांना जोतिराव फुल्यांनी सांगीतलं की, शेतकऱ्यांच्या बांधावर तुम्ही बंडिंग करा, ज्यामुळं पडणाऱ्या पावसाचं पाणी विहिरीना जाईल. हे तेव्हा सांगीतलं होतं. आता जे पाझरतलाव नावाची गोष्ट आपण बांधतो ना, पाझर तलाव शेतकऱ्यासाठी रोजगार हमीची योजना जोतिराव फुल्यांनी त्याकाळी सूचित केलेली आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना परदेशी पाठवून त्यांना नवं शेतीचं प्रगत तंत्रज्ञान शिकवा. उपकारकर्त्या सरकारनं हे करावं.

शेतकरी समाजाला तलाठ्याच्या, कुलकर्ण्याच्या जाचातून वाचवावं, शेतकऱ्यांच्या पैशातून जमा होणारा लोकल फंड फक्त आर्यभट्टांना शिकविण्यासाठी वापरू नका, तो शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वापरा हे त्यावेळी जोतिराव फुल्यांनी सांगीतलं. मित्र हो, जोतिराव फुले ज्यांना आर्यभट्ट म्हणतात आणि आर्यभट्टांनी क्षत्रियापासून, वैश्यापासून सर्वांचं द्विजत्त्व काढून घेतलं म्हणतातना त्याचा नवा सामाजिक संदर्भ असा आहे. तुम्हाला पटतो की नाही तो पहा. वैद्यकीय, खाजगी

वैद्यकीय आणि इंजिनियरींग कॉलेजेस काढणे म्हणजे सर्व सामान्य मुलांचे द्विजत्व काढून घेणे. द्विजत्व म्हणजे ज्ञानाचा विचार. तोच जर एकदा काढून घेतला तर तुम्हाला रानामाळातून भटकण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. आज सुद्धा जोतिराव फुल्यांचा पुतळा ज्या महाराष्ट्राच्या विधान भवनासमोर उभा आहे. त्या जोतिराव फुल्यांच्या पाठीमागून निघणारी परिपत्रके काय सांगतात ?

प्रवरानगर, वारणानगर, कृष्णा सहकारी सा. कारखाना, खाजगी वैद्यकीय महाविद्यालये या वर्षी नवीन वैद्यकीय महाविद्यालयास परवानगी मिळाली. तुमच्या एरियातल्या पतंगराव कदमांना. त्याची ट्यूशन फी गरिबांच्या मुलांना परवडावी म्हणून फक्त दीड लाख ठेवलेली आहे. बी. शंकरानंद काल जे शिवाजी विद्यापीठात बोलले ' ही दुकाने थांबवा ', कोणाला बोलले ? स्वतःशी ! कोणी थांबवा ? अहो सत्तेवर तुम्हीच आहात ना ? आमचे जुने समाजवादी काँग्रेसचे लोक विनोदी बोलू लागलेत. ते म्हणतात ' अन्यायाचा प्रतिकार करा, कुणी ' गांव तेथे शाळा नेऊ या ! ' कुणी ? अहो तुम्ही आता विरोधी पक्षात नाही. सत्ताधारी पक्षात आहात. बी. शंकरानंद दिल्लीहून शिवाजी विद्यापीठात येतात आणि युवक महोत्सवात बोलतात की ही खाजगी इंजिनिअरींग आणि वैद्यकीय दुकाने बंद करा. मी त्यांचे अभिनंदन करतो. खाजगी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय कॉलेजेस काढणे म्हणजे द्विजत्व काढून घेणं. ही लोकशाहीतली वतनदारी आहे. मोंगलाई आहे. सर्व सामान्यांच्या मुला-मुलींचा शिकण्याचा अधिकार काढून घेणं, व्यावसाईक शिक्षणा–पासून त्यांना दूर ठेवणं, म्हणजे उद्याच्या शिक्षण संधीपासून दूर ठेवणं. आपणाला पटलं तर बघां.

मित्र हो, जोतिराव फुल्यांनी ज्या सामाजिक समतेचा आग्रह धरला ती सामाजिक समता आमच्या शिक्षणामध्ये नाही, ती समाजात येणार नाही ! ज्या शिक्षणामुळे आम्ही एक नवा माणूस बनवितो तिथेच आम्ही समता आणलेली नाही. समाजात ते दिसणार नाही. आणि म्हणून आर्थिक दृष्टचा धनदांडग्यांच्या हातात आम्ही चिपळूणकरांनी सांगितलेल्या ज्ञानाच्या किल्ल्या देत आहोत. जोतिराव फुल्यांच्या चळवळीला संकुचित करणारा हा आजचा सामाजिक संदर्भ आहे.

म्हणून जोतिराव फुले शेतकऱ्यांच्या आसूडमध्ये सरकारला ज्या सूचना देतात, त्या वाचतांना मला आठवलं की शिवाजी महाराज एका आज्ञापत्रांत लिहितात की, शेतकऱ्यांच्या कणसाला हात लावू नका, शेतकऱ्याच्या सुतळीच्या तोड्याला हात लावू नका. तुम्ही जेव्हा झोपाल तेव्हा तुमचे दिवे मालवून झोपा, नाहीतर काय होईल उंदीर तुमच्या दिव्यातील वात तोंडात पकडेल आणि शेतकऱ्याची कडव्याची गंज जळून खाक होईल. ऐसे करू नका. वनविभागाच्या बाबतीत सुद्धा शिवाजी महाराजांनी जे मुद्दे मांडलेत तेच जोतिराव फुले मांडतात. म्हणजे वन–

खात्याचा अभ्यास, कृषि खात्याचा अभ्यास, जलसंपत्तीचा अभ्यास, शिक्षणाचा अभ्यास, स्त्रियांच्या शिक्षणाचा अभ्यास, सामान्य माणसाला मदत करण्याचा अभ्यास.

चांगल्या राजकारणाची व्याख्या काय ? चांगलं राजकारण कशाला म्हणतात जे सर्वांसाठी उपयोगी आहे. चांगलं आहे. त्यालाच चांगलं राजकारण म्हणतात. जे उपयोगी आहे, स्वतःसाठी चांगलं आहे त्याला लोकशाहीत सुद्धा वाईट राजकारण म्हणतात. जोतिराव फुल्यांनी या सबंध चळवळीमधून सामान्य माणसाला मदत करण्याचं राजकारण केलं. १८८३ साली " ड्यूक ऑफ कॅनॉट " जेव्हा पुण्याला आला. राणी व्हिक्टोरियाचा मुलगा ड्यूक ऑफ कॅनॉट; हा ड्यूक ऑफ कॅनॉट जेव्हा आला तेव्हा हरी चिपळूणकरांनी एक मोठा समारंभ पुण्यामध्ये भरविला. स्वागत समारंभ, राजपुत्राचा स्वागत समारंभ, आणि सबंध सरंजामदारांना, देशमुखांना, जहागिरदारांना, इनामदारांना निमंत्रणे पाठविली. जोतिराव फुले पुण्यामधील बडी आसामी असल्यामुळे जोतिराव फुल्यांना सुद्धा ते निमंत्रण गेले.

जोतिराव फुले राजपुत्राच्या समारंभास कसे जावेत ? लंगोटी, हातात काठी खांद्यावर घोंगडी, वाराबंडी, मुंडासं, खिशात निमंत्रणपत्रिका. निघाले. पोलीसांनी अडवलं, त्यांची अडचण झाली. आत सोडाव तर हा माणूस काय भिकार पोशाखात आलाय. राजपुत्राचा स्वागत समारंभ, हा माणूस कोण ? तेवढ्यात हरि चिपळूणकरांनी पाहिले. ते धावत धावत आले नी त्यांना सन्मानानं व्यासपीठावर नेलं. १८८३ सालाची गोष्ट. जोतिराव फुले अस्खलीत इंग्रजीमध्ये पंधरा मिनिटे राजपुत्राला उद्देशून बोलले. काय बोलले ? पुणे मतदारसंघातून तिकीट द्या म्हणाले ? नाही. जोतिराव फुले असे म्हणाले की " ड्यूक ऑफ कॅनॉट, तुझ्या आईचे राज्य आमच्यावर चालू आहे. तुझ्या आईच्या साम्राज्यामध्ये असं म्हणतात सूर्य सुद्धा मावळत नाही. जेव्हा तू इंग्लडला जाशील तेव्हा तुझ्या आईला आमचा निरोप सांग. आई, ज्या मोठ्या देशावर आपलं राज्य चालू आहे. त्या देशातील ९७% टक्के रयत गुराढोरांसारखी निरक्षर आहे. "

तिकडे सात समुद्राच्या पलिकडे आई तरी होती. इथं आता स्वातंत्र्यानंतर ४२ वर्षे आईही राहिलेली नाही. सातासमुद्राच्या पलिकडच्या इंग्रजांच्या विषयी एक उदाहरण मी आपल्याला सांगतो. १८५७ सालचं बंड आपल्या लक्षात आहे. ज्याला जोतिराव फुले बंड म्हणत नाहीत. हे बंड ज्याला काहीच मिळत नाही म्हणून झालेलं बंड होतं तर १८५७ सालची दुसरी घटना आम्हाला माहिती नाही. १८५७ साली धारवाडला एक प्रसंग घडला. अस्पृश्य समाजातला एक माणूस. त्याने आपल्या पाच-सहा वर्षाच्या मुलाला घेतलं, त्याचं बोट धरलं आणि शाळेत गेला. मुख्याध्यापकाला म्हणाला, मला माझ्या मुलाला तुमच्या शाळेत शिकवायचं

आहे. मुख्याध्यापक ब्राह्मण गृहस्थ होते. ते म्हणाले, अरे बाबा तुझ्या मुलाला मी जर प्रवेश दिला तर सवर्णांची मुलं येणार नाहीत. शाळा बंद पडेल. मग आमचं काय? पण तो ब्राम्हण जरी असला तरी त्या मुख्याध्यापकामधला जो शिक्षक होता त्याच्या बुद्धीला पटलं नाही. म्हणून त्यांनी मुंबईच्या गव्हर्नरला पत्र लिहिलं की माझ्या शाळेमध्ये असा एक प्रसंग घडलेला आहे. अस्पृश्य समाजातला मुलगा आहे. त्याला शाळेत प्रवेश पाहिजे आहे. पण सामाजिक स्थिती अशी आहे की, त्या मुलाला मी जर प्रवेश दिला तर सवर्णांची मुलं येणार नाहीत. मी काय करू ते सांगा. गव्हर्नरनी पत्र पाहिलं.

गव्हर्नरनी कळवलं ठीक केलं. शाळा बंद पडत असेल तर प्रवेश नको. शाळा चालू ठेवा. पण तो या मुख्याध्यापकापेक्षा कायद्याचं राज्य मानणारा इंग्रज होता. त्याला वाटलं आपण चुकीचं पत्र पाठविलं. म्हणून त्यांनी मद्रासला व्हाईसरॉयला पत्र पाठवलं की धारवाडच्या शाळेत एका अस्पृश्य समाजातल्या मुलाला प्रवेश पाहिजे आहे. मुख्याध्यापकांच पत्र अस आहे अस्पृश्य समाजातील मुलाला प्रवेश दिला तर शाळा बद पडते. प्रवेश देऊ नये तर अन्याय होतो. आपण ब्रिटीश कायद्यासमोर सगळे नागरिक समान असे म्हणतो. मार्गदर्शन करा. आताप्रमाणे तेव्हा सुद्धा श्रेष्ठी होते, तेव्हा मद्रासच्या व्हाईसरॉयनी गव्हर्नरला लिहिलं तुम्ही मूर्ख आहात. आणि त्यांनी सातासमुद्राच्या पलिकडे असलेल्या इंग्लडमधील कॅबिनेटला पत्र लिहिलं की भारतातल्या शाळेमध्ये अस्पृश्य मुलांना प्रवेश मिळत नाही. अस्पृश्य मुलं ज्ञानापासून वंचित राहतात. निर्णय द्या. १८५७ सालच्या इंग्लडच्या कॅबिनेटचा निर्णय आहे. भारतातील कोणत्याही शाळेमध्ये ज्या शाळांना सरकारची ग्रँट मिळते. ग्रँटेबल सगळ्या शाळेमध्ये अस्पृश्य मुलांना जर प्रवेश दिला नाही तर ग्रँट बंद केली जाईल.

राष्ट्र म्हणजे एकत्रच लोक. लोकलफंडातून जमा होणारा पैसा कुणाच्या शिक्षणावर खर्च केला जात होता. पाश्चीमात्यकरण होणाऱ्या ब्राह्मणावर. म्हणून जोतिराव फुल्यांना दोन्ही पातळ्यावर लढायचं होतं. सातासमुद्राच्या पलिकडच्या ब्रिटीशांशी लढायचं होतं. तो विदेशी वसाहतवाद होता. पण हा विदेशी वसाहत-वाद असलेला इंग्रज कायद्यासमोर सगळे नागरिक समान आहेत असं म्हणत होता. सतीची चाल बंद करावी म्हणून कायदा करीत होता. विधवांचे विवाह लागले पाहिजेत म्हणून कायदा करीत होता. म्हणून जोतिराव फुले समाजाला म्हणायचे अरे इंग्रजांचं राज्य आहे तोपर्यंतच शिकून सवरून मोकळे व्हा आणि आर्यभटांच्या दास्यातून मोकळे व्हा. समजणार नाही ही लढाई.

इंग्रज आल्यावर विदेशी वसाहतवाद म्हणून इंग्रजांची सत्ता आणि इथली पुरोहितशाही इंग्रज नोकरशाहीत रूपांतरीत झाली. पुरोहितशाहीचं रूपांतर

अलगत नोकरशाहीत झालं. पेशवाई बदलली, पुरोहित सगळे बदलले. पण दोन्हीची एक गुणवत्ता असलेली एक नवीन नोकरशाही निर्माण झाली. ती सर्वसामान्यांपर्यंत कायदे जाऊ देत नाही. आजही आमचे मंत्री म्हणतात, काय करावं हो, सचिव ऐकत नाहीत. आज त्यांच्या सचिवांच्या हातात राज्य आहे आणि म्हणून जोतिराव फुल्यांना ब्राह्मणांचा देशी वसाहतवाद मोडून काढावयाचा होता आणि सर्वसामान्य माणसांच्या स्त्रियांच्या हातामध्ये ज्ञानाची साधने पोहोचवायची होती.

हे करीत असताना जोतिराव फुल्यांना खालच्या तळातल्या माणसांनी ब्राह्मणांचं अनुकरण करू नये, ब्राह्मणांसारखं त्यांनी होऊ नये, कारण नवे ब्राह्मण हे जास्त भयंकर आहेत हे आज दिसतं आपणाला. दारुच्या दुकानातसुद्धा आज सत्यनारायण होतो. तुमच्याकडे होतो की नाही मला माहित नाही. औरंगाबादला होतो. मी इथलं बोलत नाही. तर दारुच्या दुकानाचं ओपनिंगसुद्धा सत्यनारायणानं. गणपतीत तर अगदी सत्यनारायण आणि 'माळ्याच्या मळ्यामध्ये कोण ग उभी' गाणं. मला कळत नाही आमच्या देवाला सुद्धा हे कधीपासून आवडू लागलं. इथं तिथं हे आज आमचं अज्ञान आहे. तर त्यांना संस्कृतीकरणाची प्रक्रिया थांबवून ठेवावयाची होती की हे भ्रष्ट डोके नको, इथ काय ज्ञान होतं ?

मी नेहमी सांगतो ज्ञान हे रातराणीच्या फुलासारखं असतं. ज्ञानाचं कार्य रातराणीच्या फुलासारखं असतं. ज्ञान हे रातराणी ही जशी अंधारातही फुलते तसं ज्ञानी माणूस जिथं आहे त्याचा गंध येतो. रातराणीच्या फुलाच्या वासाची झुळूक लांब येते. दोन चार फर्लांगावर येते. ज्या माणसाजवळ नवं ज्ञान आहे त्या माणसाच्या कर्तृत्वाचा गंध सुद्धा समाजापर्यंत तसा पोहोचतो. पण ज्याला आम्ही ज्ञान म्हणत होतो ते ज्ञानच नव्हते. बहुसांख्यिक लोक पारतंत्र्यात होते. त्यांच्या हातामध्ये ज्ञानाची सत्ता नव्हती. म्हणून जोतिराव फुल्यांना या सर्वसामान्य माणसाच्या मुक्तीचे एकमेव अमोघ शस्त्र सापडलं होतं - एज्युकेशन, शिक्षण.

शिक्षण हा जोतिराव फुल्यांनी ज्या ज्या चळवळीचा विचार केला त्या चळवळीचा पाया होता, आधार होता. आणि त्यातून कृतिशीलता होती. " नॉलेज प्लस ॲक्शन इज इक्वल टू कल्चर " असं ते सूत्र होतं. जोतिराव फुले एका बाजूला विचार मांडत होते. दुसऱ्या बाजूला चळवळी करीत होते. नवमानवतावादाचं आंदोलन ते चालवत होते. सर्वसामान्य माणसापर्यंत ज्ञान हा त्याचा प्राथमिक अधिकार आहे. तो पोहोचला पाहिजे हे सांगत होते. हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनामध्ये जोतिराव फुल्यांनी सांगितलं प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचं पाहिजे. प्राथमिक शिक्षण हे सरकारच्या हातात पहिजे आणि प्राथमिक, माध्यमिक सगळं शिक्षण हे प्रत्येक माणसाचा अधिकार पाहिजे.

लोकल फंडातून पैसा जमा होतो तो शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या मुलांच्या शाळांवर खर्च झाला पाहिजे. लोकशाही समाजवादी प्रणालीतसुद्धा हंटर कमिशनला जे निवेदन दिले जोतिराव फुल्यांनी, त्या मधल्या मूल्यांचं प्रतिबिंब आज महाराष्ट्रातील शिक्षण जेव्हा पाहतो त्यावेळी, परवां - शरदराव बोलले की, महाराष्ट्रामध्ये एस. एस. सी. पातळीवर ८४% मुले गळतात. माध्यमिक पातळीवर ५५% गळतात. मुख्यमंत्रीच बोलल्यामुळे सरकारी आकडेवारी प्रमाण मानायला हरकत नाही. चौथीपर्यंत जी मुलं जातात त्यांच्यापैकी ८०% गळतात आणि १५% मुलांपैकी ३% मुले महाविद्यालयात येतात. ज्ञानाची लोकशाही निर्माण केल्याशिवाय भारतीय लोकशाही यशस्वी होणार नाही. जोतिराव फुले यांच्या शिक्षणासंबंधीच्या विचारांचा हा आजचा सामाजिक संदर्भ आहे. ज्या समाजातल्या शिक्षणामध्ये समता नाही त्या समाजात समता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फार सुंदर विचार मांडला. लोकशाही म्हणजे काय ? लोकशाही म्हणजे सामाजिक समता. सामाजिक समता ही स्वातंत्र्याची पहिली पायरी आहे. ती स्वतंत्र लोकशाही समाजाची कोनशीला आहे या पातळीवर आपण विचार केला पाहिजे.

१९८६ साली भारत सरकारचे New perspective of Education जाहिर झालं. भारतामध्ये आज १५० च्या जवळपास विद्यापीठे आहेत. बारा हजार ते साडे बारा हजार पर्यंत महाविद्यालये, सिनियर कॉलेजेस आहेत. अडीच लाख सिनियर कॉलेजेसचे प्रोफेसर्स आहेत. यांना आपण विचारलं की तुमच्यापैकी किती लोकांनी न्यू परस्पेक्टीव्ह ऑफ एज्युकेशन वाचलंय ? फार कशाला आपल्या पार्लमेंटात ५५० खासदार आहेत. त्यांना विचारा तुम्ही New Perspective of Education वाचलं का हो. मी औरंगाबादच्या खासदारांना विचारलं की मला New Perspective of Education ची कॉपी द्या. ते म्हणाले जेव्हा ते पास झाले तेव्हा मी होतो. आमच्या प्रतोदाने सांगितले हात वर करा. आम्ही हात वर केला. ही पॉलिसी काहीही न वाचता हात वर करणे. This is Education Policy, no Policy that is new Education Policy. कुणीच वाचली नाही. त्यात M. A, M. Com. ला जाणाऱ्या मुलांना आता Interance Examination आहे. करता काय ?

महाराष्ट्रामध्ये आता नुकतांच ३७ दिवसांचा संप पार पडला. त्यावेळी मोर्चा निघाला कॉलेजेस सुरू करावी म्हणून ? कुणी पत्रक काढलं ? कुठंतरी निषेध झाला ? नाही. परमिट रूमची दुकाने बंद झाली तर मोर्चे निघतील. का ? राष्ट्र मजबूत होते. प्राध्यापकांना शिकवायचे नाही याला म्हणतात New

Education Policy. मॉडेल स्कूल्स, काळा, गुबगुबीत तुकतुकीतं इंग्रज निर्माण करण्यासाठी चौथीच्या पाचवीच्या परीक्षेनंतर त्यांच्यातलं मेरीट पहा, कुठं असते मेरीट ? जांभळाच्या झाडावर चढून जांभळं तोडण्यात आहे. मे महिन्याच्या भर उन्हाळ्यात गाडी वाटेने जो धुरळा (फुफाटा) असतो, तो नागव्या पायांनी चालून परीक्षा देणारी जी मुलं असतात तेथे असते मेरीट. प्राध्यापकांची मुलं आमची पाचशे रुपये, हजार रुपये देऊन ट्यूशन लावतात. एक्स्ट्रॉ कोचिंग खरेदी करतात. त्याला आम्ही मेरीट म्हणायचं. तीन टक्के मुलांबद्दल मला बोलायचं नाही. हा बदल आहे. पण ही मॉडेल स्कूल्स काढलीत. आमची New Education Policy जोतिराव फुल्यांच्या सबंध शैक्षणिक तत्वज्ञानाचा संकोच आहे. काही मुलांसाठी चांगली शाळा आणि अनेक मुलांसाठी शाळाच नाही.

उच्च शिक्षण

सरकार उच्च शिक्षणासाठी सढळपणे तरतूद करीत असले, तरी त्याने बहुजन समाजाच्या शिक्षणाची हेळसांड चालविली आहे, अशी हाकाटी गेले काही दिवस सर्व देशभर चालू आहे. उच्च शिक्षण पदरात पडल्याने ज्या वर्गाचा प्रत्यक्ष फायदा झालेला आहे, अशा वर्गातील लोकांनी ही हाकाटी मान्य केली नाही, तरी ती काही अंशी न्याय्यच म्हणावी लागेल. असे असले तरी सध्याच्या परिस्थितीत उच्च शिक्षणासाठी करीत असलेली मदत सरकारने तोडावी, असे कोणीही देशहितेच्छू म्हणणार नाही. त्याची एवढीच इच्छा असणार की, प्रजाशासनाखालील एक वर्गच्या वर्ग संपूर्णपणे दुर्लक्षिला जात असल्याने, अन्य प्रगत वर्गाबरोबरच, या उपेक्षित वर्गाच्याही प्रगतीची तितकीच आस्था सरकारने दर्शविली पाहिजे. हिंदुस्थानातील शिक्षण अद्यापि बाल्यावस्थेत आहे. उच्च शिक्षणार्थ दिले जाणारे अनुदान थांबविल्यास, तेही एकंदर शिक्षणप्रसाराच्या दृष्टीने विघातकच ठरेल.

उच्च आणि श्रीमंत वर्गात, ब्राह्मण, प्रभू इत्यादी जातीत व विशेषतः जे लोक लेखणीवर उपजीविका चालवितात, अशा वर्गात सध्या शिक्षणाची गोडी उत्पन्न झालेली आहे. या वर्गाच्या बाबतीत होणारी सरकारी मदत क्रमाक्रमाने कमी कमी करीत नेणे शक्य आहे. परंतु ज्या मध्यम आणि कनिष्ठ वर्गामध्ये शिक्षणाची म्हणण्यासारखी प्रगती अद्यापि झालेली नाही, अशा वर्गाचे अनुदान थांबविल्यास ती एक आपत्तीच ठरेल. अशांचे अनुदान थांबविल्यास नाईलाजास्तव त्या लोकांना नालायक आणि संकुचित दृष्टीच्या शाळांमध्ये प्रवेश मिळवण्या-वाचून दुसरे गत्यंतर नाही आणि त्यामुळे एकंदर शैक्षणिक कार्याचीच हानी झाल्यावाचून राहणार नाही. तसेच कोणत्याही पातळीवरची शिक्षणव्यवस्था खाजगी यंत्रणेकडे सोपविणे इष्ट ठरणार नाही. यापुढे बहुत काळपर्यंत, धंदेशिक्षण असो, वा कारभार विषयक शिक्षण असो, सर्व पातळीवरच्या शिक्षणयंत्रणा सरकारी

नियंत्रणाखालीच राहणे योग्य ठरेल. प्राथमिक आणि उच्च या दोन्ही पातळ्यांवरील शिक्षणाचे संवर्धन होण्यासाठी आवश्यक असणारी आस्था आणि कृपादृष्टी केवळ सरकारच दाखवू शकेल.

लोकशाहीतही शाही लोकांसाठी शाही शाळा आणि गरीबांचेसाठी शाळाच नाही. भारतामधल्या ३७% प्राथमिक शाळांना स्वतःच्या इमारती नाहीत. महाराष्ट्रामध्ये सतरा हजार शाळा एक शिक्षकी आहेत. त्या शिक्षकांच्या मागे काय आहे. अल्पबचत तुम्ही करा, कुटुंब नियोजन तुम्ही करा, राष्ट्रीय जनगणना तुम्ही करा, फक्त शाळा तुम्ही घेऊ नका. मित्रहो, हा आजच्या शिक्षणामधला सामाजिक संदर्भ उद्याच्या लोकशाहीला बाधा आणणारा आहे. लोकशाही मूल्यांना हरताळ फासणारा आहे. कुणी बोलावं ? तेव्हा म्हणता येत होतं, इंग्रज फार बेजबाबदार आहेत म्हणून आता आम्हीच आहोत ना ! आमच्या मतातून सरकार येतं. सरकार आमच्या इच्छेचं प्रतिनिधीत्व करतं. सरकार लोकशाहीतल्या लोकांना जबाबदार असतं. 'सार्वजनिक सत्यधर्मातला' समाज सामाजिक, धार्मिक सहिष्णुता असलीच पाहिजे याचं प्रतिपादन करणारा आहे. नेशन म्हणजे मूठभर लोकांच्या पोटाकडे जाणारा रस्ता नाही. राष्ट्र म्हणजे एकमेव समाज. अशा प्रकारची सुंदर व्याख्या करून जोतिराव फुल्यांनी या महाराष्ट्रामध्ये Age of religion चे रूपांतर Age of Reason मध्ये केलं, आणि म्हणून हा जोतिराव फुल्यांचा सामाजिक चळवळीचा संदर्भ आम्हाला आठवतो. सत्यशोधक चळवळ असो, आंबेडकरी चळवळ असो, ही समाजवादी लोकशाहीची चळवळ आहे, असा विचार आपण बोललात, तुम्ही म्हणाल, या चळवळीला आज काय अडसर आहे.

१९५६ पर्यंत टप्पे आपण काल पाहिलेत. १८१८ ते १८४८ बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रामध्ये प्रबोधनाची पहाट निर्माण केली होती, सुरू ठेवली होती. १८४८ ते १८९५ जोतिराव फुल्यांनी महाराष्ट्रामध्ये नवजीवनाची चळवळ उभारली. आगरकर आणि फुले दोघेही नवजीवन चळवळीचे पुरस्कर्ते होते. त्यांनी त्या चळवळीच्या वाऱ्याचं रूपांतर झंझावातात केलं. १८९५ ते १९२५ महर्षि विठ्ठल रामजी शिंदेंच्या सारखी माणसं नंतर पुढं आली. पण त्याअगोदर राजर्षि शाहू महाराजांनी या झंझावाताचं रूपांतर वादळांत केलं आणि १९२५ ते १९५६ पर्यंत महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सांस्कृतिक सामाजिक क्रांतीच्या चळवळीचं रूपांतर वादळांत केलं. १९५६ नंतर लोकशाही आली. गांव तिथं शाळा आली. काळच बदलला. लोकांच्याकडे विद्यापीठे निघाली. ज्ञानाची साधनं लोकांच्याकडे चालली. शिक्षण झोपडयापर्यंत वाहू लागलं. आणि काल मी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये १९६० च्या मानाने तीनशेपट शिक्षण वाढलं. ज्ञान वाढलं. समाजापर्यंत ज्ञान वाहू लागलं. पण आमच्या डोक्यातील अंधश्रद्धा, आमच्या डोक्यातील धर्मव्यथा,

आमच्या डोक्यातलं सामाजिक आर्थिक न्यायासंबंधीचं भान नसणं, रूढी शरण असणं, देव आणि देऊळवादी असणं, हे काही आमच्या डोक्यातून गेलं नाही. १९५६ नंतरची महाराष्ट्रातील समाजक्रांतीची चळवळ आजच्या भ्रष्ट लोकशाही मुळे क्षीण झाली आहे. देशामधल्या ५०, ६० धनदांडग्या वर्गानं आमची संसदीय लोकशाही विकत घेतलेली आहे.

आजही जोतिराव फुले यांचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार प्रत्यक्ष कृतीमध्ये आणायचे आहेत. शेतकरी समाज आजही जोतिराव फुले यांनी ' शेतकऱ्यांचा आसूडमध्ये ' वर्णन केलेल्या शेतकऱ्यासारखाच आहे. धर्माचा प्रभाव अंधश्रद्धा, अज्ञान आणि दारिद्र्य त्यांच्या पाचवीला पुजलेलं आहे. उलट जोतिराव फुल्यांच्या काळातील शेतकऱ्यापेक्षा अधिक देशोधडीला लागलेला आहे. लोकसंख्या वाढली, आणि जमिनींचं विभाजनही वाढलं. मात्र जमिनीत वाढ झाली नाही. जुने वाडे, घरं पडत चालली ते परत बांधण्याचं आर्थिक बळ नाही. ' इडापिडा जाऊदे, बळीचं राज्य येऊदे ' अशी आळवणी करत तो आपलं अक्षरशत्रू जिणं कसं-बसं जगतो आहे. त्यांच्या मुलामुलींना शिक्षण नाही. बायकांना आरोग्य नाही. शेतकरी, शेतमजूर आणि दलीतांच्या स्त्रिया शौचासाठी उकिरड्यावर आणि रस्त्याच्या कडेला आजही बसतात. ही बाब आमच्या स्वातंत्र्याला लाजेनं मान खाली घालायला लावणारी आहे. " मुलं म्हणजे देवाचं देणं " मुलींना जीवनभर भाकरी तर बडवायच्या आहेत. मग त्यांना शिकवाच कशाला " अशा अंधश्रद्धा आणि खुळचट परंपरा सांभाळत तो आपलं जीवन कसंबसं जगतो आहे. निकृष्ट दर्जाचं जीवनमान असं म्हणण्यापेक्षा त्याला जीवनमानच राहिलेलं नाही. रोजगार हमी शिवाय रोजगार नाही, पशुतुल्य कष्टाशिवाय पर्याय नाही, त्यांच्या स्त्रियांना माणूसपणाचा दर्जा नाही. घरादारात स्वच्छता नाही. मानवी जीवन कसं असू नये याचे उदाहरण म्हणून त्यांच्या जीवनाकडे बघता येईल. हा अज्ञानी दोन बैला-पाठीमागील तिसरा बैल. तिसऱ्या बैलाच्या दर्जाचा जसा मानवी पशू म्हणूनच जगतो आहे. पूर्वीच्या तुलनेनं ग्रामीण भागात व्यसनाधीनता वाढलेली आहे. दारु गुत्त्याच प्रमाण वाढलेलं आहे. पण उत्पन्न मात्र वाढत नाही ही शोकांतिका आहे.

आजही ग्रामीण भागात अस्पृश्यता आहे. अस्पृश्यांची हलाखीची स्थिती आहे. त्यांच दारिद्र्य आणि त्यांची दुःखं इतर माणसांप्रमाणे माणसांचे हक्क देऊन दूर करण्याची आजही गरज आहे. पेशवाईतील निर्दयतेसारखीच नवी राजकीय निर्दयता त्यांच्या डोक्यावर टांगत्या तलवारीसारखी आहे. शेतकरी, दलित आणि अस्पृश्य यांचा कर्जबाजारीपणा वाढत चाललेला आहे. दारू पिण्याचं प्रमाण वाढलेलं आहे. त्यामुळे त्यांची दुःखं आणि समस्या वाढत चाललेल्या आहेत. जोतिराव फुले म्हणतात. " नगरपालिकेने बराच पैसा खर्च करून लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या

उद्देशाने बराच मोठा नोकरवर्ग नेमला आहे. लोकांचे आरोग्य सांभाळण्याच्या दृष्टीने तसे एक खाते सुद्धा चालवीत आहे. तथापि ज्या पुणे शहराला दारुचे गुत्ते परिचित नव्हते, त्यात आता भरवस्तीत दारुचे गुत्ते उघडल्यामुळे लोकांच्या नैतिक अधःपाताची सर्व बीजे पेरली जात आहेत. त्यामुळे शहराचे आरोग्य सांभाळणे हा जो नगरपालिकेचा एक उद्देश आहे, त्याला बाधा येत आहे.

"दारुचे व्यसन हे नागरिकांच्या नैतिक आचरणाला बाधक आहे. एवढेच नव्हे तर त्यांच्या आरोग्यालाही अतिशय अपायकारक आहे. हे माझे म्हणणे बहुतेक लोक आपखुषीने मान्य करतील. दारुचे गुत्ते शहरात उघडल्यापासून दारुबाजी इतक्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे की, त्यामुळे अनेक कुटुंबांचा संपूर्ण नाश झाला आहे. आणि ह्या दुर्गुणाला आता शहरात सराईतपणा आला आहे."

"ह्या व्यसनाच्या प्रसारास काही प्रमाणात तरी आळा बसावा, म्हणून मी नगरपालिकेला अशी सूचना करतो की, नगरपालिकेने या दारु गुत्त्यांवर ते ज्या प्रमाणात हानी करतात, त्या प्रमाणात कर बसवावा. मला असे कळते की, कुठल्याही नगरपालिकेने अशा गुत्त्यांवर कर बसविलेला नाही. मात्र त्यांच्यावर मध्यवर्ती सरकारचा कर असतो. या बाबतीत आवश्यक तर नगरपालिकेने चौकशी करावी. माझा हा ठराव नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवल्यास मी आभारी होईन." जोतिराव फुल्यांचे वरील विधान आजही अंमलात आणण्याच्या दर्जाचे आहे.

ग्रामीण भागातील दलित शेतकरी स्त्री पुरुषांना आमच्या आर्थिक नियोजनांने वाऱ्यावरच सोडलेलं आहे. स्वातंत्र्याच्या ४२ वर्षात काही चांगलं झालं नाही असं मला म्हणायचं नाही. आमच्या अधिक अपेक्षा वाढविण्याइतकं थोडं फार यश आमच्या स्वातंत्र्याला आलेलं आहे. मात्र ग्रामीण भागातील शेतकरी, शेत मजूर, अल्पभूधारक, स्त्री कामगार, वाड्यातांड्यांवर राहणारे आदिवासी यांच्यापासून आमच्या स्वातंत्र्याचे लाभ दूर राहिलेले आहे. त्यांच्या मुलामुलींना शिक्षण नाही. चांगल्या शाळा नाहीत, शिकवायला चांगले शिक्षक नाहीत, पुरेसे खडू फळे नाहीत. आवश्यक तेवढे शालेय साहित्य नाही. मुलामुलींना खेळण्यास अद्यावत क्रीडांगणे नाहीत. गावापर्यंत ग्रंथ पोहोचत नाही. गावाला ग्रंथालय नाही. ज्ञान संस्कृतीपासून आमचं शेतीजीवन असं दूर भरकटलेलं आहे. आमच्या खेड्यात थोडेफार रस्ते आता पोहोचत आहेत. निवडणूकीच्या प्रचारासाठी पुढाऱ्यांना आपल्या गाडीनं जाता यावं यासाठी रस्ते झालेत हे चांगले झाले. आमच्या शेतीजीवनातील स्त्री पुरुष सांस्कृतिक जीवनापासून दूर उन्हात जळत आहेत. आणि आमच्या राज्यकर्त्यांच्या मतदानाचं शेत म्हणून ते जगत आहेत.

स्त्रियांची स्थिती आणखी हलाखीची आहे. त्यांच्याकडे आजही मानवी व्यक्तिमत्व म्हणून पाहिलं जात नाही. मुलं निर्माण करणार शेत म्हणून, पुरुषांच्या उपभोगाची दासी म्हणून, त्यांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. हुंड्यासाठी आमच्या तरुण मुलींना जाळलं जातं, आमच्या देशातील स्त्रियांना आपले संसार थाटण्यासाठी पुरुष नावाच्या शरीराला विकत घ्यावं लागतं. हा आमच्या महान संस्कृतीचा दर्जा आहे. गर्भजल परीक्षा आल्यामुळं आमच्या मुलींना आता लग्न होईपर्यंत सुद्धा जगू द्यायची इच्छा नाही. ती गर्भामध्येच असताना गर्भजल परीक्षा करून गर्भपात करायचा हे नवं शास्त्र आमच्या पुरुषप्रधान संस्कृतीला सापडलेलं आहे. केवळ बंदी आणून जमणार नाही तर स्त्री पुरुषाचे प्रबोधन करण्याची मोठी गरज निर्माण झाली आहे.

स्त्री पुरुषासंबंधी बोलतांना जोतिराव फुले म्हणतात. "याचे कारण, निर्मीकाने निर्माण केलेल्या चमत्कारीक मोह उत्पन्न करणाऱ्या भवसागरात तरंगून मजा मारणारे क्षणिक उभयंता मानवप्राणी आहेत. त्यातून स्वभावेकरून स्त्रीची जात भिडस्त असल्यामुळे ती प्रथम एका पुरुषास सलगी करण्यास सवड देते. आणि ती सलगी हा कामार्थी पुरुष इतका वाढवितो की, अखेरीस स्त्री स्वतः होऊन त्यास आपला मदतगार, वाटेकरी, सखा करिते, आणि तीच सृष्टी नियमांस अनुसरून आपल्यातील सर्व मुलांचे तर काय, परंतु आर्यभटांतील नाडबंद ब्रह्मचारी शंकराचार्यांच्या तोलाच्या मुलांचेसुद्धा आपल्या उदरी कांकू केल्याशिवाय निमूटपणे नवमास रात्रंदिवस सतत ओझे वागविते. तीच आपल्या सर्वांस जन्म देणारी होय. आपले मलमूत्रादि काढून आपल्या सर्वांचे लालन व पालन करून आपल्या सर्वांचा परामर्ष करणारी होय. आपण सर्व पंगू लाचार असतां सर्वकाळ आपली काळजी वाहते व तिनेच आपणा सर्वांस चालावयास व बोलावयास शिकवले. यावरून एकंदर आबाल वृद्धात म्हण पडली आहे की, सर्वांचे उपकार फिटतील परंतु आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाहीत. यावरून निःसंशय पुरुषांपेक्षा स्त्री माझ्या मते श्रेष्ठ आहे."

ग्रामीण मुलींच्या शिक्षणासाठी स्वतंत्र योजना करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांच्या मुलामुलींना शिष्यवृत्त्या देणे, ग्रामीण मुला-मुलींसाठी नोकऱ्यामध्ये राखीव जागा ठेवणे. ग्रामीण नियोजनाशी निगडीत अभ्यासक्रम तयार करणे. ग्रामीण मुलां-मुलींचे साठी वसतीगृहे बांधणे, नवीन ज्ञान विज्ञानाच्या आणि तंत्रज्ञानाच्या सांस्कृतिक पर्यावरणाची निर्मिती त्यांच्यासाठी उपलब्ध करून देणे, त्यासाठी शिक्षणाचं राष्ट्रीयकरण करणे. आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, जोतिराव फुले हे स्त्री शिक्षणाचे, शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचे, आणि मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार करणारे. पहिले भारतीय शिक्षणतज्ञ आहेत.

म. जोतिराव फुल्यांचा ' शेतकऱ्याचा आसूड ' घेऊन शेतकरी संघटनेचे नेते आपणच त्यांचे वारसदार आहोत असं सोंग घेऊन सध्या महाराष्ट्रभर फिरत आहेत. निदान शेतीमालाच्या प्रश्नावर शेतकऱ्यात ते जागृती करीत आहेत. ही गोष्ट अभिनंदनीय आहे असं मी तरी मानतो. पण त्यांच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी असलेला जिव्हाळा हा पुतना-मावशीच्या उमाळ्यासारखा आहे हे मी आपणाला नम्रपणे सांगू इच्छितो. हे नेते चातुर्वर्ण्याबद्दल बोलत नाहीत. हिंदुत्वाच्या पुनर्जीवनाबद्दल बोलत नाहीत. जातिभेद अस्पृश्यता यासंबंधीही चकार शब्द काढत नाहीत. मी वर सांगितलेल्या सर्व प्रकाराबद्दल ते गप्प आहेत. मग ते कसले आहेत जोतिराव फुल्यांचे वारसदार. सत्तेवर जाणार नाही असं बोलत बोलत, राजकारणात गेलो तर खेटराने मारा असे सांगणारे हे नेते राजकारणातील नवे दलाल, जोतिराव फुल्यांचा शेतकऱ्यांचा आसूड शेतकऱ्यांच्याच पाठीत मारणारं राजकारण करीत आहेत. वरकरणी कळवळा दाखवीत आहेत.

आज देशभर जातीयवादाचा धुमाकूळ चालू आहे तीन टक्के असलेला ब्राह्मण वर्ग ६२ टक्के सार्वजनिक क्षेत्रामधील नोकऱ्यामध्ये मांड ठोकून बसलेला आहे. चातुर्वर्ण्याचं पुनरुज्जीवन स्वातंत्र्याच्या नावाखाली छुप्या पावलानं केलं जात आहे. गरीब समाजाचे सामाजिक आणि आर्थिक शत्रू आपापल्या मक्तेदाऱ्या टिकवून ठेवणारं राजकारण लोकांच्या हिताची भाषा वापरीत, करत आहेत. " गर्व से कहो हम हिंदू है " हा नवा हिंदू " फ्यूरर " महाराष्ट्राच्या क्रांतिकारक मातीत वाढत आहे. भारतीय स्वातंत्र्याला श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी भगवं ग्रहण लावलेलं आहे. प्रबोधनकार ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या समाजाला शंभर वर्षे पुढे नेणारा विचार मांडला तर त्यांचे हे दिवटे चिरंजीव महाराष्ट्रातील समाजाला बाराव्या शतकात घेऊन जात आहेत. छत्रपतींना खिशात घालून महाराष्ट्राचे आम्ही छत्रपती होऊ हा फुकाचा, अभिमान ते बाळगून आहेत. विरोधी पक्षांच्या अपयशी पाठीवर आलेली ही फुटकुळी आहे. येत्या विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर ती फुटणार आहे.

जोतिराव फुले नेते होते, आंबेडकर नेते होते. त्यांच्यानंतर १९५६ नंतर महाराष्ट्रात वसंतरावदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई नेतृत्व करीत होते. पण आज आमच्या परिवर्तनाच्या चळवळी ठप्प झाल्या, क्षीण झाल्या आहेत. नैराश्याचं वातावरण पसरलं आहे. लोकांच्या पासून ज्ञान दूर नेण्याचा प्रयत्न आजही चालू आहे.

सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी पडावे, असे व्यावहारिक नाही. कारकून आणि शिक्षक मोठ्या प्रमाणावर पैदा होण्यास मात्र ते उपयुक्त ठरणारे

आहे. शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचेही सारे लक्ष वाजवीहून फाजील प्रमाणात मॅट्रीकच्या परीक्षेवर केंद्रीत झालेले असते. विद्यार्थ्याला त्याच्या भावी आयुष्यक्रमांत स्वतंत्र जीवन आक्रमिण्यास, लायक बनविण्यास उपयोगी पडावे असे व्यावहारिक अंगच या अभ्यासक्रमाला नसते. एकंदर देशातील ज्ञानप्रसाराचा विचार केल्यास प्रवेश परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फारशी मोठीच नसली तरी, सरकारी नोकऱ्यांच्या गरजेचा विचार केल्यास, ही संख्या मोठीच म्हणावी लागेल. शिक्षण सार्वत्रिक आणि सर्वांच्या सहज आवाक्यातले असते, तर ही संख्या याहूनही मोठी होऊ शकली असती. यापुढील काळात ती तशी वाढावी आणि ती तशी वाढेल अशी मला अशा आहे.

उच्च शिक्षणाची व्यवस्था अशी असावी की ते घेणे सर्वांना सुलभपणे परवडावे. मॅट्रिक परीक्षेला नेमलेल्या विविध विषयांवरील पुस्तकांच्या याद्या मद्रास आणि बंगाल या प्रांतातील सरकारी गॅझेटात जशा प्रसिद्ध केल्या जातात तशाच येथेही प्रसिद्ध करण्यात याव्या. खाजगी रीतीने अभ्यास करून परीक्षेला बसण्यास मान्यता देऊन मुंबई विद्यापीठाने जनतेला एक प्रकारचे वरदानच दिले आहे. असेच वरदान अधिक उच्चतर परीक्षांच्या बाबतीतही विद्यापीठाचे अधिकारी उपलब्ध करून देतील, अशी मी आशा बाळगतो. बी. ए. आणि एम. ए. वगैरे पदवीपरीक्षांच्या बाबतीत खाजगी रीतीने अभ्यासाला मान्यता मिळाल्यास अनेक तरुण खाजगी रीतीने अभ्यास करण्यात आपला वेळ सार्थकी लावतील आणि त्यामुळे ज्ञानप्रसारास आणखी मोठ्या प्रमाणावर हातभार लागेल. अनेक प्रकारच्या कारणास्तव ज्यांना कॉलेजमध्ये जाऊन पुढील शिक्षण सुरू ठेवणे परवडत नाही. अशी कित्येक उदाहरणे सध्या दिसून येतात. विद्यापीठाने खाजगी अभ्यासाला मान्यता दिल्यास एकंदर देशाचे कोटकल्याण होईल व उच्चशिक्षणाप्रीत्यर्थ सरकारी खजिन्यावर पडणारा बोजाही पुष्कळ प्रमाणात हलका होईल.

ज्ञानाच्या बाजारपेठा मांडल्या जात आहेत. दलिताचा मुलगा, चांभाराचा मुलगा, शेतकऱ्याचा मुलगा आजही महाविद्यालयापासून दूर ढकलला जात आहे. परिवर्तनाच्या चळवळीच्या आड टी. व्ही. वाले आले, दूरदर्शनवाले आले, रेडिओवाले आले, वर्तमानपत्रवाले आले ही सगळी प्रचार माध्यमं आणि प्रसार माध्यमं प्रतिगाम्यांच्या हातामध्ये आज आहेत. उद्धवराव पाटील एकदा बोलताना म्हणाले, " या देशातील जातीयवादी प्राध्यापक जोपर्यंत मरणार नाहीत तोपर्यंत भारतामध्ये चळवळी होणार नाहीत." पण मी त्याला जोडून असं म्हणतो. आमच्या देशातील प्राध्यापक पुरोगामी, आमच्या देशातील शिक्षक पुरोगामी, पण आमच्या देशातील पत्रकारसुद्धा पुरोगामी होण्याची गरज आहे. आम्ही आता जोतिराव फुल्यांची पुण्यशताब्दी साजरी करणार आहोत. आम्ही आता १९९१ साली

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी साजरी करणार आहोत. हे सगळं आम्ही करणार आहोत.

समाज परिवर्तनाच्या, समाज प्रबोधनाच्या आणि सामाजिक क्रांतीच्या चळवळी आम्ही समारंभामध्ये बंद केलेल्या आहेत. समारंभाच्या बातम्या येतात· समारंभापुरते आरंभशूर राहतो. साऱ्या चळवळी समारंभापुरत्याच गोठल्या आहेत. लोकांपर्यंत प्रत्यक्ष लाभ पोहोचतच नाहीत. अशा प्रकारचे एक दुर्दैवी चित्र तुमच्या माझ्या समाजात आज आहे. अशा वेळी दलितांचा कैवारी, स्त्रियांचा उद्धारक, महाराष्ट्रातील पहिली कामगार संघटना बांधणारा, कार्लमार्क्सचा जाहीरनामा प्रत्यक्ष कृतीमध्ये आणणारा, भारताचा आर्थिक, सांस्कृतिक 'कॉर्लमार्क्स' असे जोतिराव फुले आज हवे होते. कार्लमार्क्स यांची प्रेतयात्रा निघाली तेव्हा दहा माणसं सुद्धा नव्हती. आणि कॉर्लमार्क्सच्या मृत्यूची बातमी एकाही वृत्तपत्राने छापली नाही पण आज १९८३ साली तुम्ही पाहिलं, अर्ध जग कार्लमार्क्सच्या विचाराचा गजर करून दुमदुमत आहे. अर्धी पृथ्वी समाजवाद लोकशाही, स्वातंत्र्य आणि नवमानवतावादाचा आग्रह धरून राज्य करते आहे.

जोतिराव फुले आज आपल्यात नाहीत पण त्यांनी दलित, शोषित, पीडीत, कामकरी, शेतकरी, कष्टकरी गोरगरीब या सर्वसामान्य माणसांना आधार दिला, दिलासा दिला, चळवळ दिली, विचार दिला, ध्यास दिला, प्राण दिला आणि त्या माणसाला जीवन दिलं, त्या माणसांच्या देहामध्ये माणूसपण ओतलं. त्या माणसाचं स्मरण पुन्हा पुन्हा करावं असं वाटणारं स्मरण आहे. ही माणसं मरत नसतात. त्यांचे विचार अमर असतात. जोपर्यंत दुःख शोषण आहे, जोपर्यंत माणसाच्या डोळ्यांत पाणी आहे, अश्रू आहे, जोपर्यंत माणसाच्या घामाची लुबाडणूक होत आहे, तोपर्यंत जोतिराव फुल्यांचा विचार, आंबेडकरांचा विचार कुणीही विसरणार नाही. शेवटी बहिणाबाईची एक ओवी आहे. ती सांगून मी आजच्या व्याख्यानाचा समारोप करतो.

'जग जग माझ्या जीवा । असं जगनं तोलाचं ॥
उंच गगना सारखं । धरित्रीच्या रे मोलाचं ॥

मला वाटतं बहिणाबाईनी जणू जोतिराव फुल्यांसाठीच ही कविता केली असावी. इतकी सुंदर समर्पक कविता त्यांनी आपल्यासमोर मांडली आहे.

मित्र हो तास-सव्वातास होऊन गेलेला आहे. आणि जोतिराव फुल्यांचा सामाजिक विचार आणि सामाजिक संदर्भ मग ते सामाजिक क्रांतीच्या संदर्भातील असो, आमच्या सामाजिक विषमतेच्या संदर्भातील असो, भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या आक्रमणाच्या बाबतीतील असोत, गरीबागरीबांमध्ये फूट पाडण्याच राजकारण असो, अंतर वाढण्याच असो, हे सगळं अंतर वाढत चाललेलं आहे

आणि समतेच्या चळवळी क्षीण होत आहेत. अशा वेळी आपण सर्वजणांनी हा विषय समजून घेतलात. काल आणि आज हा फक्त दोन दिवसापुरतां विषय नाही तर लोकांपर्यंत स्वातंत्र्य पोहोचण्याचा हा विषय आहे. लोकांपर्यंत संस्कृति पोहोचण्याचा हा विषय आहे. त्यालाच चांगला माणूस म्हणतात, जो स्वतःसाठी जगत नाही, दुसऱ्याच्या जीवनामध्ये सुंदरता निर्माण करतो. असा एक चांगला विचार घेऊन आपण सगळे गेलो तर मला वाटते जोतिराव फुल्यांना त्यांच्या समाज परिवर्तनाच्या चळवळींना आपण चांगल्या प्रकारे अभिवादन केलेलं आहे. आपण दोन दिवस माझे विचार अतिशय शांतपणानं समजून घेतले आणि अतिशय जाणतेपणाने दाद दिलीत त्याबद्दल आपणासर्वांचे, कऱ्हाडवासियांचे मी मनापासून आभार मानतो, धन्यवाद !

व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय

व्याख्याते		विषय
वर्ष – पहिले १९७३		
प्राचार्य देवदत्त दाभोळकर,	पुणे	राजकारण आणि समाजजीवन
डॉ. मा. पं. मंगुडकर,	पुणे	भारतीय समाजवाद, काही विचार
प्रा. गं. बा. सरदार,	पुणे	भारतीय समाजवाद,आणि ऐहिक निष्ठा
वर्ष – दुसरे १९७४		
प्रा. ए. एम्. खान, श्री शाहू मंदीर महाविद्यालय, पुणे		भारतीय लोकशाही : काही विचार
श्री. वि. अ. नाईक, माजी न्यायमूर्ती, पुणे,		लोकशाही समाजवाद
कै. सदाशिव बागाईतकर,	पुणे	अविकसित देशातील समाजबादाचे स्वरूप
वर्ष – तिसरे १९७५		
कै. डॉ. भा. शं. भणगे,	मुंबई	आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग
श्री. त्र्यं. कृ. टोपे,	मुंबई	समाज सुधारणेच्या समस्या
डॉ. प्र. चिं. शेजवलकर संचालक, इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च, पुणे		सद्यः स्थिती
वर्ष – चौथे १९७६		
श्री. गोपाळराव मयेकर, माजी शिक्षणमंत्री, गोवा		भारतीय समाजवादाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग (दोन व्याख्याने)
कै. पद्मभूषण धनंजय कीर, प्रसिद्ध चरित्रकार, मुंबई		राजर्षी छत्रपती शाहू आणि नवभारताची मागणी

वर्ष – सहावे १९७८

डॉ. भालचंद्र फडके,	पुणे	डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती

वर्ष – सातवे १९७९

कै. आमदार पी. बी. साळुंखे,	कोल्हापूर	महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे (दोन व्याख्याने)
डॉ. सत्यरंजन साठे,	प्राचार्य, लॉ कॉलेज, पुणे	भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन

वर्ष – आठवे १९८०

डॉ. जनार्दन वाघमारे,	प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर	महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण कालचे, आजचे व उद्याचे (दोन व्याख्याने)
खासदार प्रतापराव भोसले,	माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य	शेतीचे अर्थशास्त्र व त्यातील दुग्ध व्यवसायाचे स्थान

वर्ष – नववे १९८१

मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश, वाई	विज्ञान आणि मानवी मूल्ये (तीन व्याख्याने) पुस्तक रूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – दहावे १९८२

मा. नानासाहेब गोरे,	पुणे	महाराष्ट्र धर्माची नवी व्याख्या (दोन व्याख्याने) पुस्तक रूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – अकरावे १९८३

बॅ. पी. जी. पाटील,	सातारा	(कराड शहरात १२ ते २१ मार्च अखेर जमावबंदी, शस्त्रास्त्रबंदी आदेश जारी केलेला असल्याने नियोजित व्याख्याने होऊ शकली नाहीत.)
मा. तात्यासाहेब कोरे,	वारणानगर	
सौ. शांताबाई किर्लोस्कर,	पुणे	

वर्ष – बारावे १९८४

श्री. वसंत पळशीकर,	मंचर	कार्ल मार्क्स - जीवन, विचार आणि समाजशास्त्र (तीन व्याख्याने) पुस्तकरूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – तेरावे १९८५

डॉ. पंजाबराव जाधव,	पुणे	(रशियाचे राष्ट्राध्यक्ष श्री. कॉन्स्टन-
श्री. द्वा. भ. कर्णिक,	मुंबई	टाईन चेर्नेको यांचे निधनानिमित्त नियोजित व्याख्याने होऊ शकली नाहीत.)

वर्ष – चौदावे १९८६

श्री. द्वा. भ. कर्णिक, रॉयवादी विचारवंत व पत्रकार	मुंबई	१) यशवंतराव आणि महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तन २) यशवंतराव चव्हाण : काँग्रेस संस्कृतीचे उपासक व प्रवक्ते ३) दिल्ली दरबारातील यशापयशाची मीमांसा (तीन व्याख्याने)

वर्ष – पंधरावे १९८७

डॉ. रावसाहेब कसबे,	संगमनेर	धर्म आणि इतिहास लेखन (दोन व्याख्याने)

वर्ष – सोळावे १९८८

ॲड. डॉ. पंजाबराव जाधव,	पुणे	' भारतीय बहुजनसमाजाच्या प्रगतीची वाटचाल ' (दोन व्याख्याने) पुस्तकरूपाने प्रकाशित झाली नाहीत.

वर्ष – सतरावे १९८९

प्रा. बा. ह. कल्याणकर,	औरंगाबाद	महात्मा फुले सामाजिक विचार आणि आजचे सामाजिक संदर्भ (दोन व्याख्याने)

आणि यंदाच्या १९९० व्याख्यानमालेत –

डॉ. राम जोशी, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ	मुंबई	' भारतीय राजकारण अभ्यासाची एक दिशा ' (दोन व्याख्याने)

MUMBAI

'यशवंतराव चव्हाण स्मृती सदन'

कराड नगरपालिका नगरवाचनालय